म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ८०

REFBK-0003830
REFBK-0003830

નિબંધ
૯૦



कै. हरीभाऊ आपटे

बालोद्यान प्रेस, पुणें.

# हरीभाऊंचीं पत्रें

( हरी नारायण आपटे यांनीं श्री. काशीबाई
व
गोविंद वासुदेव कानिटकर
यांस लिहिलेलीं पत्रें )

दोन शब्दः-

श्री. काशीबाई कानिटकर

REFBK-0003830

प्रस्तावनाः-

वाग्भट नारायण देशपांडे

प्रकाशक

ऐक्यसंपादन मंडळ; सातारा

१९२९

किंमत ] [ १॥ रु.

प्रकाशकः—
ऐक्यसंपादन मंडळ.
सातारा.

मुद्रकः—
कृष्णाजी मोरेश्वर जोशी.
सातारा सिटी प्रेस.

आ. नं. ... ता. २८-१-३० ... ग्रं. ... डा. के.

# प्रस्तावना

"**हरीभाऊंचीं पत्रें**" या पुस्तकांत कै. हरीभाऊ आपट्यांनीं आपले परममित्र कानिटकर पतिपत्नि यांना लिहिलेलीं कांहीं पत्रें ग्रथित केलीं असून, एकाद्या व्यक्तीचा खाजगी पत्रव्यवहार प्रसिद्ध केलेलें मराठी वाङ्मयांत हें पहिलेंच पुस्तक आहे असें ह्मणावयास हरकत नाहीं. पाश्चात्य देशांत थोर व्यक्तींचा, लेखकांचा, कवींचा पत्रव्यवहार प्रसिद्ध करण्याची पद्धति असून बहुतेक सर्व प्रसिद्ध स्त्रीपुरुषांचीं पत्रें पाश्चात्य वाङ्मयांत आज उपलब्ध आहेत. परंतु आपल्याकडे असा पत्रव्यवहार अद्यापपावेतों कोणाचाहि प्रसिद्ध नाहीं. याचें मुख्य कारण एवढेंच ह्मणतां येईल कीं, स्वतःचा पत्रव्यवहार तितका काळजीपूर्वक जतन करून ठेवण्याची आपल्याकडे पद्धति नाहीं. परंतु यामुळें चरित्र-वाङ्मयाची मात्र फारच मोठी हानि झाली आहे. कारण चरित्र लिहिण्यासाठीं लागणारें एक खात्रीचें साधन पत्रव्यवहार नष्ट झाल्यामुळें नाहींसें होतें. न्या. मू. रानडे, टिळक, गोखले, नौराजी इत्यादि लोकांचा पत्रव्यवहार जतन होऊन जर तो पुढें येता, तर केवळ त्या व्यक्तींच्या चरित्रावरच नव्हे तर राष्ट्राच्या तत्कालीन राजकीय इतिहासावरहि त्यांच्यामुळें केवढा मोठा प्रकाश पडला असता हें सांगण्याचें कारण नाहीं.

खाजगी पत्रव्यवहार याप्रमाणें जतन करून तो पुढें प्रसिद्ध करण्याची पद्धति आपल्याकडे केव्हां येईल ती येवो; पण त्या स्वरूपाचा पहिला उपक्रम या पुस्तकाच्या प्रकाशनानें केला जात आहे; व त्याचें महत्व या पुस्तकांतील पत्रें वाचतांच वाचकांच्या मनांत बिंबेल. कारण या पत्रांवरून केवळ एकट्या हरीभाऊंच्या चरित्राबद्दलच नव्हे, तर तत्कालीन परिस्थिति व वाङ्मय यांबद्दलही बरीच उपयुक्त व मनरंजक माहिती वाचकांना मिळेल. टिळक-आगरकर वाद, आगरकरांच्या "सुधारका"ची स्थापना, समाजसुधारणेची प्रथमावस्था, तत्कालीन सुशिक्षितांच्या स्त्रीशिक्षणाबद्दलच्या कल्पना, १८९७ चा पुण्यांतला प्लेग, खिस्ती मिशनऱ्यांचें कार्य, इत्यादि अनेक विषयांसंबंधींचे उल्लेख पुढील पत्रांतून वाचकांस आढळतील. हे सर्व विचार अगदीं खाजगी रीत्या-त्यांना पुढें प्रसिद्धी मिळेल अशा हेतूनें किंवा भावनेनें

नव्हे– व्यक्त झाले असल्यामुळें त्यांचें महत्व विशेष आहे. स्त्रियांनीं ग्रंथकार व्हावें कीं नाहीं या विषयावरील तेराव्या पत्रांतील विचार, आणि ख्रिस्ती धर्माच्या आणि मिशनऱ्यांच्या कामगिरीसंबंधीं सव्विसाव्या पत्रांतील विचार वाचकांस उद्बोधक आणि विचारार्ह वाटतील; तसेंच इतक्या अल्पवयांतसुद्धां हरीभाऊंनीं सामाजिक आणि धार्मिक बाबतींत किती कळकळीनें विचार केला होता हेंहि त्यावरून दिसून येईल. यांपैकीं कित्येक, विशेषतः हिंदु-धर्म व गीता यांजबद्दलचे विचार, पृ. ९२ वर व्यक्त केलेले, पुढें अधिक अनुभवानें व वाचनानें हरीभाऊंनीं बदलल्याचें त्यांच्या पुढील कादंबऱ्यां-वरून दिसून येतें. कारण पुढें गीता व वेदान्त यांजकडे त्यांची बरीच दृष्टी वळली; त्याचा परिणाम " **कर्मयोग** " कादंबरींत आढळतो. त्याच-प्रमाणें मेरी कॉरेलीची स्तुती त्यांनीं तिसाव्या पत्रांत केली आहे, तेंही मत अधिक वाचनानें व वाङ्मयाच्या अधिक अध्ययनानें पुढें पालटलें. अगदीं शेवटच्या अपूर्ण पत्रांत व्यक्त केलेले श्री शिवाजीमहाराजांबद्दलचें मतहि पुढें बदलल्याची साक्ष त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या देत आहेतच. तरीपण विचाराच्या मनोभूमिकेचा पाया मात्र लहानपणींच खोल घातला गेला होता; आणि जास्त विचारानंतर किंवा वाचनानंतर मत बदलण्याचा प्रसंग आल्यास त्याला हरीभाऊ दुराग्रहानें मागें घेत नसत, हें मात्र या पत्रांवरून निःसंशय व्यक्त होतें.

या पुस्तकांतील पत्रें १८८६ ते १८९७ पर्यंतच्या १० वर्षांतल्या कालांतील आहेत; आणि तींहि हरीभाऊंनीं श्री. काशीबाईंना जेवढीं लिहि-लीं असतील तेवढीं सगळीं आहेत असें वाटत नाहीं. श्री. काशीबाईंच्या जवळ जेवढीं जतन केलेलीं सांपडलीं तेवढींच या पुस्तकांत प्रसिद्ध केलीं आहेत. हरिभाऊंचा सगळा पत्रव्यवहार उपलब्ध झाला असता तर, अर्था-तच ती फारच आनंदाची गोष्ट झाली असती. पण या पुस्तकांत प्रसिद्ध केलेल्या थोड्याशा पत्रांचासुद्धां त्यांच्या चरित्राला केवढा उपयोग होणार आहे हें सांगावयास नको. आठव्या पत्रांत त्यांच्या गृहस्थितीचा उल्लेख आला असून, त्यांच्या शिक्षणाबद्दलची हकीकतही त्याच पत्रांत नमूद आहे. त्यांचा कॉलेजांतील अभ्यासक्रम रखडत चालल्याबद्दल त्यांच्या चुलत्यांस

फार घाईट वाटत असल्याचे उद्गार त्या पत्रांत वाचावयास सांपडतात; आणि वडील मंडळींच्या टोंचणीमुळेंच कीं काय, बी. ए. होण्याचा आपला निश्चय हरीभाऊंनीं त्याच पत्रांत व्यक्त केला आहे. या निश्चयास अनुसरून त्यांनीं जोरानें अभ्यासास सुरुवात केल्याची हकीकत त्यानंतरच्या तेराव्या पत्रांत आढळते. कारण त्यांत "५ तास पी. ई. परिक्षेचे अभ्यासांत जात" असल्याबद्दल त्यांनीं अभिमानानें लिहिलें आहे. पण त्याच्याच पुढें "२॥-३ तास फ्रेंच वाचनांत जातात; २॥-३ तास एक दुसरी भाषा शिकण्यास आरंभ केला आहे ती शिकण्यांत जातात; १-१॥ तास इतर कांहीं वाचनांत जातात" असें त्यांनीं लिहिलें आहे. या इतर व्यवसायांत जाणाऱ्या वेळेची बेरीजच ७।८ तासांची होते. ह्मणजे अभ्यास नेटानें करण्याचा निश्चय करूनहि त्याला इतर व्यवसायांइतका वेळ मिळत नाहीं! अशा परिस्थितींत "हरी नारायण आपटे आणि परीक्षा यांचें अत्यंत वांकडें" असल्याचें कांहींच आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. तरी पण या वयांतसुद्धां हरीभाऊंचें वाचन किती विस्तृत होतें याची साक्ष बहुतेक प्रत्येक पत्रांत पटते. या पत्राच्या वेळीं हरीभाऊ कॉलेजांत पी. ई. च्या वर्गांत होते. तरीसुद्धां शेक्सपिअर, जॉर्ज इलिअट्, जेन ऑस्टिन, जॉर्ज सँड् इत्यादि विख्यात ग्रंथकारांच्या कृतींशीं त्यांचा निकट परिचय झाला होता. मिल्चें "लिबर्टी," व कॉटनचें "न्यू इंडिआ" वाचल्याचा अकराव्या व चौथ्या पत्रांत उल्लेख आहे. सतराव्या पत्रांत, "प्रिन्सिपल्स् ऑफ सोशिऑलजी" हा स्पेन्सरचा ग्रंथ पहावयाचा राहिला ह्मणून मनोरंजनांतल्या एका निबंधाचीं सारीं चारच पानें घालावीं लागल्याची तक्रार केली आहे; व या निबंधासाठीं "कांहीं नाहीं तरी १०।१२ ग्रंथ पहावे लागले" असेंहि लिहिलें आहे. विसाव्या पत्रांत मॉसिअर रेन्हां याच्या "राष्ट्र ह्मणजे काय" या फ्रेंच व्याख्यानाचा आधार दिला आहे; तिसाव्या पत्रांत ( अर्थात् हें पत्र कॉलेज सोडल्यानंतरचें पुष्कळच पुढलें आहे ) महाभारतावरील एक जर्मन पुस्तक वाचित असल्याबद्दल उल्लेख आहे. मोलिअर वगैरे फ्रेंच ग्रंथकार तर त्यांचे आधींच वाचून झाले होते. हें वाचन खरोखरीच विद्यार्थिदशेंतल्या कोणाहि मनुष्याला भूषणास्पद असून

त्यावरून हरीभाऊंच्या बौद्धिक सामर्थ्याचा उच्च दर्जा स्पष्टपणें प्रतीत होतो. इतक्या ज्ञानसाधनांनीं निर्माण झालेलें त्यांचें लघुकथा व कादंबरीवाङ्मय समाजाला वळण लावणारें निघावें यांत काय आश्चर्य ? एक दोन इंग्रजी कादंबरीकार वाचून लिहावयास धांवणाऱ्या हल्लींच्या अनेक लेखकांनीं हरीभाऊंच्या यशाचें हें मर्म ध्यानांत घेण्यासारखें आहे. तथापि त्याचबरोबर विद्यार्थिदशेंत इतकें अवांतर वाचन व संपादकीय व्यवसाय मागें लावून घेतल्यामुळेंच, कॉलेजचा शिक्षणक्रम पुरा करून वडील मंडळींच्या इच्छेप्रमाणें हरीभाऊंना पदवीधर होतां आलें नाहीं हेंहि तितकेंच खरें आहे. आणि या आपल्या अनुभवावरूनच कीं काय त्यांनीं " **मी** " कादंबरींत शिवरामपंतांकडून भाऊस प्रथम अभ्यास करून मग इतर वाचनलेखनाच्या कामीं पडण्याबद्दल कळकळीचा उपदेश करविला. आतां हरीभाऊ हे इतर व्यवसाय न करितां, सर्वसामान्य विद्यार्थ्याप्रमाणें सरळ मार्गानें अभ्यास करून बी. ए. एल् एल्. बी. होऊन चुलत्यांच्या हाताखालीं मुंबई हायकोर्टांत यशस्वी वकील झाले असते, तर त्यांच्या अत्युत्कृष्ठ कादंबऱ्या मराठी वाचकांस कदाचित् मिळाल्या नसत्या; ह्मणून एकंदर समाजाच्या व वाङ्मयाच्या हिताच्या दृष्ट्या जें झालें तेंच योग्य झालें असें आपण आज ह्मणूं. परंतु हरीभाऊंचें येवढ्याच एका बाबतींत अनुकरण करून स्वतःच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष करणाऱ्या विद्यार्थ्यांत पुढें मात्र खरोखरीचे हरीभाऊ किती निपजतील याची शंकाच आहे !

हरीभाऊंचा लेखनव्यवसाय त्यांच्या अगदीं अल्पवयांतच कसा सुरूं झाला होता त्याची साक्ष या पुस्तकांतल्या पहिल्याच पत्रावरून पटतें. हें पत्र १८८६ सालांतलें असून यावेळीं त्यांचें वय २१ वर्षांचें होतें; व त्याच वेळीं त्यांची ' **मधली स्थिती** ' ही कादंबरी पुणे-वैभवांतून क्रमशः प्रसिद्ध होत होती. या अगदीं नवीन धर्तीच्या कादंबरीनें पुण्यास व महाराष्ट्रास त्यावेळीं कसा चटका लावला होता याचें वर्णन तत्कालीन अनेक लोकांनीं केलें आहे. हरीभाऊंचा हा वाङ्मयसंसार यापुढें उत्तरोत्तर कसा वाढत गेला याचा चटकदार इतिहास या पत्रांतून पहावयास सांपडतो. पुढें बहुतेक प्रत्येक पत्रांत " **मनोरंजना** " च्या व्यवस्थेसंबंधीं व मजकुरासंबंधीं

उल्लेख आहे. हें मासिक जुलै १८८६ त सुरू झालें असें दिसतें. त्यांत श्री. काशीबाईंची **'रंगराव'** व हरीभाऊंची **'गणपतराव'** या दोन कादंबऱ्या सुरू झाल्या. शिवाय इतर छोट्या गोष्टी, मोलिअरच्या नाटकांचीं रूपांतरेंहि हरीभाऊंनीं याच मासिकांतून प्रसिद्ध केलीं. '**मनोरंजन**' मासिकाच्या व्यवस्थेची हकीकत वेळोंवेळींच्या पत्रांतून आलेली अनेक वाचकांना मनोरंजक वाटेल. परंतु हरीभाऊ स्वतः आणि श्री. काशीताई अशा दोन लेखकांचें नेतृत्व असूनहि मनोरंजन यशस्वी झाल्याचें दिसत नाहीं; याचा दोष बहुतेक प्रकाशकांकडे असावा असें दिसतें. त्यानंतर चोविसाव्या पत्रांत (१८८८ सालीं) **करमणूक** नांवाचें स्वतःचें पत्र काढण्याची कल्पना हरीभाऊंनीं पुढें मांडली असून, एकोणतिसाव्या, ह्मणजे ता. ६ नोव्हेंबर १८९२ च्या, पत्रांत ती निघून एक वर्ष झाल्याचें दिसतें. पण या **करमणुकीनें**हि–तें पत्र महाराष्ट्रांत अत्यंत लोकप्रिय होऊनहि–हरीभाऊंचा सांपत्तिक फायदा कांहींच केला नाहीं. पृ. १०५ वर श्री. काशीबाई कानिटकरांनीं टीप दिली आहे तीवरून **करमणुकी**च्या पायीं हरीभाऊंनीं शेवटपर्यंत एकसारखी बूड कशी सोसली हें लक्षांत येतें. त्यांचा पुढला सगळा लेखनव्यवसाय **करमणूक** पत्राच्या द्वारेंच झाला. पण कादंबऱ्या चांगल्या खपून व लोकप्रिय होऊन पत्राच्या बाबतींत मात्र हरीभाऊंना २५ वर्षें सारखी पदरमोडच करावी लागली. निस्वार्थी वाङ्मय सेवेचें हें उदाहरण खरोखरीच मनाला चटका लावणारें आहे.

हरीभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्यांच्या अध्ययनालाहि या पत्रांचा फार उपयोग होणार आहे. त्यांच्या विचारांवर कोणत्या ग्रंथकारांचा आणि व्यक्तींचा परिणाम झाला हें समजण्यास हीं पत्रें फार साधनीभूत होतील. त्यांच्या कादंबरींतील कोणते प्रसंग स्वानुभवाचे अगर आत्मचरित्रपर असावेत हेंसुद्धां या पत्रांच्या सहाय्यानें वाचकांस सांगतां येईल. नवव्या पत्रांतील त्यांच्या बायकोचें पहिलें पत्रलेखन, आणि '**गणपतराव**' आणि '**पण लक्षांत कोण घेतो**' या कादंबऱ्यांतील सरस्वती व यमू यांचें पहिलें पत्र लिहिणें यांतील साम्य वाचकांच्या लक्षांत तेव्हांच येणारें आहे. '**मी**' आणि '**यशवंतराव खरे**' या दोन्ही कादंबऱ्यांतील नायकांच्या मनावर

बी. ए. होण्याचें महत्व इतक्या जोरानें ठसविण्याचा त्यांच्या गुरुंनीं प्रयत्न केला त्याचा धागा या पत्रांत सांपडेल. आपल्या लेखनाच्या यशाची कसोटी हरीभाऊ कशावरून ठरवीत त्याची कल्पनाहि या पुस्तकांतील अठ्ठाविसाव्या पत्रांत त्यांनीं आपल्या दोन गोष्टींची स्वतःच्या मताप्रमाणें तुलना केली आहे त्यावरून समजून येते. ते म्हणतात. " **पाडव्याला भेट** ज्या वेळीं मीं लिहिली त्यावेळीं राधाबाई, कृष्णराव, वगैरे मंडळी मला अगदीं खरी अशी भासून त्यांच्या आनंदाबरोबर आनंद, शोकाबरोबर शोक, याप्रमाणें माझ्या मनाचें तादात्म्य झालें. तिसरें प्रकरण लिहित असतां मी कितीतरी वेळां लिहित असलेला कागद पलीकडे सारून डोळ्यांवाटे घळघळणारे अश्रु पुसण्याकरतां उपरणें घेतलें असेल. पुरी झाली तेव्हां मी आपल्या स्वतःशीं असा उद्गार काढला कीं, जरी सर्व दुनियेनें या गोष्टीस नीरस म्हटलें तरी मी कालत्रयींहि म्हणणार नाहीं " **खरी कां खोटी** " ही गोष्ट मी ५ दिवसांत लिहिली. पण मला त्यांतलीं पात्रें कळसूत्री बाहुल्याप्रमाणें आहेत असें वाटलें. खरीं वाटेनात. मला रडूं तर कोठेंहि आलेलें नाहीं! " (स्वतःच्या लेखनाशीं, पात्रांशीं इतकें तादात्म्य झाल्याविना लेखन यशस्वी व परिणामकारक होणें हें, त्याच्यामागें कांहीं विशिष्ट हेतु, तळमळ असल्याशिवाय कोणासहि साधणार नाहीं. भाडोत्री किंवा चटोर लोकप्रियता मिळविण्यासाठीं लिहिणाऱ्या लेखकाला हा पवित्र तादात्म्याचा आनंद केव्हांहि अनुभवितां येणार नाहीं.)

या पत्रांचें विवेचन याहून जास्त करणें म्हणजे वाचकांनीं घ्यावयाचा स्वाद आपणच चाखण्यासारखें होईल. तथापि या पत्रांचें महत्व आणि त्यांचा वाङ्मयास होणारा उपयोग यांकडे वाचकांचें लक्ष वेधण्यासाठीं इतकें विवेचन करणें जरूर वाटलें. अशा महत्वाचीं पत्रें प्रसिद्ध करण्याचीं परवानगी देऊन श्री. काशीबाई कानिटकर यांनीं मराठी वाचकांवर आणि मराठी वाङ्मयावर खरोखरीच फार मोठे उपकार केले आहेत. या पत्रांवरून हरीभाऊंचा श्री. काशीबाईंबद्दलचा आदर, त्यांजविषयींचीं त्यांच्या मनांत वसत असलेली विलक्षण निष्ठा हीं जशीं व्यक्त होतात, त्याचप्रमाणें हरीभाऊंसारख्याच्या आदराला पात्र असण्याची श्री. काशीबाईंची योग्यताहि या

पत्रांवरून प्रतीत झाल्याविना रहात नाहीं. तसेंच हरीभाऊंच्या कादंबऱ्या महाराष्ट्राला मिळवून देण्यांत श्री. काशीबाई आणि त्यांचे पति कै. गोविंदराव कानिटकर यांचा किती महत्वाचा भाग आहे हेंहि या पत्रांवरून दिसून येईल. श्री. काशीबाईचा जन्म १८६१ सालीं, म्हणजे हरीभाऊंच्या आधीं तीन वर्षे झाला; वयाच्या दहाव्या वर्षी त्यांचें लग्न झालें. पण त्यानंतर विद्यार्जन करून आणि वाचन वाढवून त्यांनीं मराठी वाङ्मयांत मिळविलेला दर्जा त्यांच्या परिस्थितींतल्या स्त्रीला फारच भूषणावह असून, त्यांजबद्दल पहिल्याच पत्रांत हरीभाऊंनीं काढलेले उद्गार प्रत्येकास अक्षरशः खरे असेच वाटतील. '**चांदण्यांतील गप्पा**' या त्यांच्या कथासंग्रहास "चार प्रास्ताविक शब्द" लिहितांना श्री. लक्ष्मणशास्त्री लेले यांनीं श्री. काशीबाईंचें छोटेसें पण हृदयंगम चरित लिहिलें आहे; त्यांत सासरच्या मंडळींत राहून विद्यार्जन करण्यास श्री. काशीबाईंना कसे कष्ट पडले याचें चटकदार वर्णन केलें आहे. त्यांचे पति कै. गोविंदराव हे त्या काळचे विद्वान्, व रसिक लेखक म्हणून प्रसिद्ध होते. अशा पतीस योग्य अशी सहधर्मचारिणी स्वतःस बनविण्याची श्री. काशीबाईंवर मोठीच अवघड कामगिरी होती; आणि ती त्यांनीं किती उत्तम तऱ्हेनें पार पाडली हें त्यांच्या चरित्रावरून दिसून येतें. पण त्या केवळ आपल्या विद्वान व रसिक पतींची योग्य अशी सहधर्मचारिणीच झाल्या नाहींत; तर हरीभाऊंसारख्या प्रतिभाशाली व विद्वान कादंबरीकाराची बहीण, आणि त्यांच्या कार्यांत त्यांच्या सहकारी होऊं शकल्या; त्या इतक्या कीं, हरीभाऊंनीं प्रत्येक गोष्टींत व विचारांत त्यांची सल्ला घ्यावी; त्यांच्या प्रोत्साहनानें व अनुकूल अभिप्रायानें उल्हसित व्हावें; आणि त्यांच्या सहाय्यानें स्वतःस कृतार्थ मानावें. कानिटकर पतिपत्नींबद्दल स्वतःस वाटत असलेला नितांत आदर, आणि त्या उभयतांचा स्वतःच्या आयुष्यक्रमावर झालेला परिणाम यांचा आपल्या मित्रांजवळ हरीभाऊ अभिमानानें वारंवार उल्लेख करीत. पण त्याचें प्रत्यक्ष दृश्य या पत्रांत पहावयास मिळतें. तेव्हां श्री. काशीबाईची योग्यताहि केवढी मोठी आहे; आणि समाजास वळण लावून पुढील पिढ्यांस सदैव आदर्शभूत होऊन राहणाऱ्या हरीभाऊंच्या

कादंबऱ्यांच्या श्रेयाचा थोडाबहुत वांटा श्री. काशीबाईंकडेहि कसा येतो हें वेगळें सांगण्याचें कारण नाहीं. कुमारी तोरु दत्त हिनें आपल्या आई-बद्दलचा आपला शाश्वत आदर व प्रेम, सरोवरांत प्रतिबिंबित होणाऱ्या आकाशाच्या नीलकांतीचें सुंदर उदाहरण देऊन व्यक्त केलें आहे; त्याचें अवतरण आपल्या अप्रतिम गोड व साध्या भाषाशैलीनें हरीभाऊंनीं आपल्या एका पत्रांत घेऊन ( पत्र १७ ) श्री. काशीबाईबद्दलचा आपला आदर व प्रेम व्यक्त केलें आहे. तो भाग वाचून चित्त क्षणभर आनंदानें स्तिमित होऊन, " धन्य हें बंधुभगिनी प्रेम " असे उद्गार कोणत्या सहृदय वाचकाच्या मुखावाटे बाहेर पडणार नाहींत?

उदात्त भावना, आणि निरतिशय गोड भाषाशैली या दोन गुणांनीं-सुद्धां हीं पत्रें वाङ्मयांत प्रमुख स्थानीं रहातील यांत संशय नाहीं. म्हणून सामाजिक इतिहास, हरीभाऊंचें चरित्र, आणि मराठी वाङ्मय या तीन्ही दृष्टीनें महत्वाचीं अशीं हीं पत्रें प्रसिद्ध केल्याबद्दल श्री. काशीबाई कानिट-कर यांचे कितीहि आभार मानले तरी ते अपुरेच पडतील. तसेंच हीं पत्रें प्रसिद्ध करण्याचा मान **ऐक्य-संपादन-मंडळास** देऊन तर त्यांनीं सदर मंडळास आपलें कायमचें ऋणी करून ठेविलें आहे.

सातारा.

कार्तिक शु. १. १८५२. **वाग्भट नारायण देशपांडे**

ता. २ नवबंर १९२९

# दोन शब्द

सन १८८४ सालीं मे महिन्यांत आम्हीं सर्व मंडळी नेहमींप्रमाणें आपले घरीं सुट्टी घालविण्यास व वडीलधाऱ्या मंडळीच्या सहवासांत दोन दिवस घालवावे ह्मणून पुण्यास गेलों.

तेथें गेल्यावर ती. मामंजी, धाकटे मामंजी ( नारायण बापूजी ) व स्वतः यांची अनेक विषयांवर चर्चा चाले. केव्हां केव्हां वाङ्मयात्मक चर्चा होई. त्याच वेळीं कै. प्रि. आगरकर हॅम्लेटचें भाषान्तर करीत होते त्याचीं कच्चीं प्रुफें धाकट्या मामंजींच्या नजरेस पडलीं. जेवढा भाग त्यांनीं पाहिला होता त्याची मराठी भाषा सुंदर नव्हती असें त्यांचें मत झालें. हा विषय एका दिवशींच्या संभाषणाचा होता.

दुसरे दिवशीं स्वतः, नानासाहेब, व हरीभाऊ फिरावयास निघाले. नानासाहेब ( धाकटे मामंजी ) नाटकें स्वतः लिहून त्याचे प्रयोगही करीत व करवित असत. त्यांना हम्लेट्चें भाषांतर चांगलें व्हावें असें वाटत होतें. त्यांनीं या सर्व मंडळींस आर्यभूषण प्रेसमध्यें नेलें. तेथें **विकारविलसिताचें** प्रूफ पाहिलें. ( हें नांव आगरकरांच्या भाषांतराचें होतें. ) तिघांनींही वाचून टीका केली व तेथल्या तेथेंच असें ठरविलें कीं, एक महिन्याच्या आंत हॅम्लेटचें भाषांतर स्वतः करावें; तें नानासाहेब व हरीभाऊंनीं वाचून पसंती द्यावी; जेवढा जेवढा भाग तयार होईल तेवढा आर्यभूषण प्रेसमध्यें छापण्यास द्यावा. दोन्हीं भाषांतरें एका टाइपाचीं, एका आकाराचीं, एकाच जातीच्या कागदावर छापून एकेच दिवशीं प्रसिद्ध व्हावींत. हा करारही छापखान्यांतच झाला. दररोज सकाळीं आठ ते दहा पर्यंत चौघांनीं ( चौथे माझे वडील बंधु शंभुराव बापट ) आमचे घरीं जमावें असा नियम होऊन मंडळी घरीं आली. हरिभाऊ आपले घरीं जोगेश्वरीच्या बोळांतील बिऱ्हाडीं गेले.

ठरल्याप्रमाणें नित्य मंडळी आमचे घरीं माडीवर बाळंतिणीच्या खोलींत लिहिण्यास बसे. येथें हें सांगणें जरूर आहे कीं, आमच्या वाड्यांतली बाळं-

तिणीची खोली अंधेराची नव्हती. चांगला उजेड असून माडीवर पण निवांत भागांत होती. ती पसंत करण्याचें कारण, कोणाची ये जा होऊन लिहिण्यांत अडथळा होऊं नये.

मे महिन्याची सुट्टी दीडच महिना असते. तेव्हां त्या मुदतींत पुस्तक झालें पाहिजे ह्मणून ही मंडळी नेटानें काम करीत होती. शिवाय आगरकरांचें पुस्तक बरेंच छापून झालें होतें. त्याच्या प्रसिद्धीच्या दिवशींच हेंही प्रसिद्ध झालें पाहिजे ही एक मनाची ओढ असल्यामुळें काम अगदीं झपाट्यानें चाललें होतें. जेथें बायकांचा संवाद असेल तेथें आमची बायकांची बोलणीं बरोबर वठलीं कीं नाहीं हें पाहण्यासाठीं मलाही केव्हां केव्हां त्या मंडळींत बसण्याचा मान मिळे.

हाच प्रसंग रा. हरिभाऊंची व माझी ओळख होण्याचा. या पूर्वी मला त्यांच्या चुलत्यांकडून नुसतें नांव ऐकून ठाऊक होतें. रा. महादेव चिमणाजी आपटे हायकोर्ट वकील यांची ओळख होती; व त्यांच्याच तोंडून हरिभाऊंचें नांव ऐकलें होतें.

ओळख होण्यापूर्वी **रंगराव** कादंबरीचीं कांहीं प्रकरणें मीं आपल्या मनानेंच लिहिलीं होतीं. हरिभाऊ **आजकालच्या गोष्टी, मधली स्थिती** ही कादंबरी **पुणेंवैभव** या नांवाच्या आठवड्याच्या वृत्तपत्रांत महिन्यांतून एकदोनदां देत. माझ्या वाचनांत ती कादंबरी आली, तेव्हां तींतील भाषासरणी, उठावदार वर्णनें वगैरे वाचून मी रंगराव लिहिणें सोडून दिलें; व जर लिहावें तर असें लिहितां आलें तरच लिहावें, नाहीं तर मुळींच लिहूं नये असें मनानें घेतलें. ही माझी मनस्थिती तिकडे अगदीं नापसंत होती. मीं ती कादंबरी पुढें लिहावी ह्मणून पुष्कळ सांगून पाहिलें; पण मला ती पुढें लिहावीशी वाटेना.

बोलतां बोलतां ही गोष्ट तिकडून हरिभाऊंच्या कानावर गेली. त्यांनीं माझीं जेवढीं प्रकरणें लिहून झालीं होतीं तेवढीं वाचावयास मागून घेतलीं व तीं वाचूनच त्यांचा माझा पत्रोपत्रींच स्नेह व भाऊबहिणीचें झालें; हें पहिल्या पत्रावरून ध्यानांत येईलच.

वाचनें नं. ७० ता. ........

हरिभाऊ हे अतिशय प्रेमळ भाऊ होते. त्यांना गुणाची चाड फार होती. त्यांनीं एकदां आपला माणूस, आपला स्नेही, ह्मटला ह्मणजे ते त्याच्याशीं अगदीं सरळपणानें वागत. त्या स्नेह्याच्या अंगच्या सद्‌गुणांकडे दृष्टी ठेवून, जर कांहीं दुर्गुण असेल तर त्यांकडे पहात नसत. मनुष्य आहे तेथें सद्‌गुणदुर्गुणाची भेसळ असणारच. पण चांगल्या गोष्टी निवडून घेणें व वाइटांचा त्याग करणें हें एक सज्जनच जाणतात. हरिभाऊ हे खरे सज्जन होते हें मीं सांगावयास पाहिजे असें नाहीं—नाहीं, मीं सांगणें हेंच गैर होईल. कारण एकमेकांची स्तुति करण्याचा दोष माझे माथीं बसेल. ह्मणून मी तें टाळतेंच मुळीं.

आमचा पत्रव्यवहार नेहमीं चाले. ते एकदां नेवाशास महिना दीड महिना रहाण्यास आले होते. भोजनोत्तर रात्रीं आह्मीं त्रिवर्ग गप्पागोष्टी करीत बसलों ह्मणजे केव्हां केव्हां पहाटेचें कोंबडें आरवावयास लागत. तेव्हां आह्मांस कळे कीं, पहांट झाली किंवा अरुणोदय झाला ! ! इतका आमच्या गोष्टींना रंग येत असे. त्या गोष्टी बहुधा वाङ्मयात्मकच असत. कित्येक वेळां मराठी पुस्तकांवर टीकात्मक असत, तर कित्येकदां अमक्या विषयावर पुस्तक असावें, तमक्यावर असावें, इत्यादीही चालत. आमच्या भाषणौघांत मिल्ल, स्पेन्सर, हक्सले, टिंडल, शेक्स्पियर, बर्क, कार्लाइल, गिबन अशासारखीं परद्वीपस्थ थोर थोर मंडळी आमच्या गप्पांत भाग घेत असत; तर कधीं कधीं श्री ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, रामदासांसारख्या महाराष्ट्रीय थोर विभूति येऊन गप्पांना रंग चढे. हें झालें वाङ्मयात्मक. राजकीय गप्पांत शिवरायापासून ते शेवटच्या राव बाजीपर्यंत सर्व सरदार, दरकदार, शूर योद्धे, थोर मुत्सद्दी यांचा भरणा आमच्या खोलींत जमे. तत्कालीन पुढाऱ्यांनींही तेथें येण्याचा कंटाळा किंवा टाळाटाळ केली नाहीं.

अशा तऱ्हेनें आमच्या रात्रीच्या गप्पा चालत. दिवसा कोर्टांत जाणें झाल्यावर हरिभाऊ मजकडून मूळ शाकुंतल वाचून घेत व त्याचा अर्थ सांगत. कधीं कधीं वृत्तदर्पणाचे नियम समजावून देत. अशा तऱ्हेनें पांच वाजेपर्यंत

चेळ जाई. संध्याकाळीं कोटांतून आल्यावर प्रवरेच्या कांठीं वाळवंटावर बसून गप्पा चालत. त्याही अनेक प्रचलित विषयांवर चालत. आह्मांबरोबर रा० कृष्णराव विनायक वाबळेही बहुतकरून असत. सकाळीं आमचा नेहमींचा परिपाठ असा असे कीं, मुलांना शाळेंत पाठविल्यावर आह्मीं उभयतां घोड्यावर बसून फेरफटका करीत असूं. पण हरिभाऊंना घोड्यावर बसण्याची संवय नसलेमुळें ते होते तोंपर्यंत प्रवरातीरीं एक फार शांत शंकराचें स्थान होतें तेथें पायींच जाऊन बसत असूं. सुट्टीच्या दिवशीं मुलेंहीं येत व फिडलबरोबर तीं देवळांत गात असत. एथूनच आह्मीं वेरुळास व प्रवरा, संगम, टोकें वगैरे ठिकाणीं सर्व मिळून गेलों. तो आमचा दीड महिना केव्हांच निघून गेला तें कळलेंहि नाहीं.

नेवाशाच्या सहवासानंतर हरिभाऊ दोन तीन ठिकाणीं रहाण्यास आले होते, पण ते फार दिवस राहिले नाहींत; व नेवाशाप्रमाणें जम जमलाही नाहीं. नेवाशासच जेन कार्लाइलचीं पत्रें त्यांनीं मला वाचावयास पाठविलीं होतीं व तीं वाचून साधारण समजण्याइतकें मला इंग्रजी कळूं लागलें होतें. तीं पत्रें वाचून पुस्तक परत केल्यावर त्यांचें माझें असें ठरलें कीं, मीं हरिभाऊंचीं पत्रें जपून ठेवावीं, व त्यांनीं माझीं व तिकडचीं पत्रें जातील तीं जपून ठेवावीं. त्याप्रमाणें ते माझीं पत्रें जपून ठेवीत, असें त्यांनीं मला कित्येक भेटींत सांगितलें होतें. परंतु शेवटीं तपास करतां तीं गहाळ झाल्याचेंच आढळलें.

एकदां त्यांच्या येथें रद्दी बरीच वाढलेली होती. ती कमी करण्यास नोकरांना त्यांनीं सांगितलें असतां तीं पत्रें बहुधा त्या रद्दींत जाऊन स्नानाच्या पाण्याखालीं त्यांचा शेवट झाला असावा असें अनुमान आहे. हीं पत्रें पाण्याच्या बंबांत गेल्याचें विशेष आश्चर्य किंवा त्यांच्या नाशाबद्दलचें फारसें दुःखही नाहीं. पण ते स्वतां आपलें आत्मचरित्र लिहीत असत. त्याचीं कांहीं प्रकरणें कोणीं कोणीं पाहिलींही होतीं असें समजतें. तें आत्मचरित्र जर अग्निमुखीं गेलें असलें तर त्या संबंधानें मात्र फार मोठी हानि झाली आहे. तें अग्निमुखांत गेलें नाहीं अशी मनाची समजूत करूं

गेल्यास मन समज घेत नाहीं. जर अग्नींत गेलें नाहीं तर त्याची वाट काय व्हावी, हा प्रश्न येतो. कारण त्यांच्या लायब्ररींत किंवा इतर जागीं तें सांपडलें नाहीं यावरून नोकर लोकांच्या अज्ञानामुळें तें अग्नींत जाऊन फार नुकसान झालें आहे, तें आतां कशानेंहीं भरून येणें शक्यच नाहीं.

दुधाची तहान ताकानें भागविण्यासारखीं हीं पत्रें छापण्याची कल्पना आहे. त्यांचें चरित्र त्यांच्याच हातचें जर आज उपलब्ध असतें तर त्यांच्या अनुषंगानें या पत्रांना जास्त शोभा आली असती. पण त्या गोष्टी हातच्या नसल्यामुळें त्यांच्या हातचीं पत्रें जगापुढें ठेवून त्यांच्याद्वारें त्यांच्या थोड्या तरी चरित्राचा वाचकांस परिचय करून द्यावा, या हेतूनें हीं पत्रें जगाच्या पुढें जशींच्या तशींच ठेवित आहें. त्यांच्या कादंबऱ्या जशा गोड आहेत तशीच या पत्रांचीही भाषा, विषयप्रतिपादनशैली वगैरे गोड आहे. असें मी ह्मणावें असें नाहीं, पण सहृदय वाचकांस तसें वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

जोंपर्यंत हरिभाऊ सार्वजानिक कामांत भाग घेत नव्हते तोंपर्यंत त्यांच्याकडून मियमित वेळीं सविस्तर, लांब प्रेमळ पत्रें येत असत. जेव्हां त्यांनीं प्लेगाचें काम घेतलें तेव्हांपासून पत्रांची हेळसांड होऊं लागली. त्यांची प्रीव्हिअस नापास झाल्यावर त्यांना मुंबईस जगदीश्वर छापखान्याचें काम शिकण्याकरितां त्यांच्या चुलत्यांनीं तेथें ठेविलें. त्या कामाची परीक्षाही नापास झाल्यावर त्यांचें मला ह्मणून पत्र आलें होतें. त्यांत त्यांच्या मनाची उदासीनता स्पष्ट दिसत होती. “ हरी नारायण आपटे व परीक्षा ह्यांत विरोध आहे ! ” छापखान्यांतल्या कामाची माहिती करून घेतल्यावर ते पुण्यास आले व त्यांची अनेकविध कामें सुरू झालीं. त्यांचें पहिलें कुटुंब व मुलगा निर्वतल्यावर त्यांच्या मनाला फार मोठा धक्का बसला. यामुळें त्यांच्या प्रकृतीवरही परिणाम झाला. रात्रीं, पहांटे किंवा थंडीच्यावेळीं त्यांचा घसा भरून येऊन श्वासोच्छ्वासास अडथळा झाल्यासारखें वाटे. त्याचवर्षी आह्मीं सर्व हरिभाऊंसुद्धां पांचगणी व महाबळेश्वर येथें उन्हाळ्याची सुट्टी घालविण्याकरितां गेलों होतों. तेथें त्यांच्या प्रकृतीला बरें वाटलें. परंतु पत्रें वगैरे लिहिणें

तें पहिल्या इतकें जरी नव्हतें; म्हणजे दर आठवड्यास पत्र येत असे असें नाहीं, तरी फुरसदीप्रमाणें येई.

रा० हरिभाऊंचा पत्रव्यवहार प्रसिद्ध करून त्यांच्या स्वभावाची, त्यांच्या थोर मनोधर्माची, प्रेमळपणाची, अकृत्रिम स्नेहाची, मनाच्या मोकळेपणाची, रसिकतेची त्यांच्या चहात्यांना ओळख पटेल अशी आशा आहे.

काशीबाई कानिटकर

श्री आनन्दाश्रम पुणें.

Poona—Anandasrama.
ता० २० जून १८९३ मंगळवार

ती० सौ० काशीताई कानिटकर मु० साठे
वाडीकरांचे सेवेशी

बालकें हरीचे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष.
आपण बुधवारी गेलां, आणि गुरुवारी पाऊस थोडासा थांबला. शुक्र-
वारपासून अजीबात थांबला आहे. परंतु मी काय सांगूं? गुरुवारपासू-
न कळण्याच्या दुखण्यानें आजारी पडलों. मागें माझें पोटाचें दुखणें होतें तें
एकीकडे राहून या खेपेला निराळेंच निघालें. मागें वर्षभरून आल्यासारखें
हेंहि. दमकोंडल्यासारखें होई. हुशार असतां दुसरें कसें दुखत नसे. परंतु या खेपेला खो-
कला सुरूं झाला, तो इतका कीं दोन रात्रीं मी डोळे मिटले नाहीं. साबुदाण्याच्या ला-
पशीवर राहिलों! आठ दिवसांत चार रुपयांचीं औषधें झालीं. काढा पाला
नवाच आहे. दुखणें अगदीं नाहींसें झालें. हा रोग जन्माचा चिकटून केव्हां
तरी असाच दमकोंडून चर तिरडी होणार कीं काय समजत नाहीं.
परवांचे दिवशीं मी आपले भावोजी चिं. लक्ष्मणराव यांचे समाचारास
गेलों होतों त्यांची आदले दिवसाची पाळी जराशी जोरानें चढून आ-
ली. आणि कालची पाळी मुळींच आली नाहीं. आता ते लवकर बरे होतील.
रावसाहेब गाडगीळ यांचें 'संसार सुख' हें पुस्तक बाहेर पडलें. आपण
त्या पुस्तकासाठीं वर्गणी भरली आहे काय? भरली नसल्यास कांहीं अल्पकिं-
मतींत मला तें पुस्तक मिळेल. पुस्तक फार चांगलें झालें आहे असें दिसतें.
मी अजून वाचलें नाहीं. फक्त चाळून पाहिलें. ह्या सर जॉन लबकच्या
मूळ पुस्तकांत Choice of Books या भागांत इंग्रजी ग्रंथांपैकीं
शंभर निवडक पुस्तकें दिलीं आहेत. त्याप्रमाणें रावसाहेब गाडगी-
ळांनीही आपल्या पुस्तकांत मराठींतील शंभर चांगलीं निवडक पु-

# हरीभाऊंचीं पत्रें.

१

डेक्कन कॉलेज:— पुणें
तारीख ६ मे सन १८८५

तीर्थस्वरूप सौ. * अंबुताई यांस

हरीचे शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना वि. खरोखर मला या पत्राला प्रारंभ कसा करावा हेंच कळत नाहीं. आधीं स्त्रियांना पत्र लिहिण्याचा हा पहिलाच प्रसंग, आणि त्यांतही आपल्यासारख्या सुशिक्षितांस; मग काय विचारितां, मी तर अगदीं भांबावून गेलों आहे. आज बरोबर चार दिवस झाले: आपल्याला पत्र कसें पाठवावें या विचारांत मी अगदीं गढून गेलों होतों. सर शेवटीं असें वाटूं लागलें कीं आपण ही कादंबरी वाचून जरी इतके आनंदी झालों आहों तरी तें दाखविण्याकरितां असला अविनय करूं नये. अशी स्थिती होऊन कांहीं सुचेनासें झालें; व आज एकदांचा असा विचार केला कीं असाच जर मी विचार करीत बसेन तर पत्र लिहिणें कधींही होणार नाहीं. एकवेळां आपल्यासारख्याकडून अविनयाचा दोष पुरवला, परंतु अकृतज्ञतेचा उपयोगी नाहीं. येऊन जाऊन मनाची स्थिती भांबावून गेल्यामुळें शब्द व वाक्य रचना वेडीवांकडी होईल एवढेंच कीं नाहीं? सुदाम्याच्या घरचे मूठभर पोहे श्रीकृष्णानें जसे मोठ्या आवडीनें खाल्ले तशीच येथेंही स्थिती होईल. वेड्यावांकड्या शब्दांनीं कां होईना, परंतु सादर केलेली कृतज्ञता आपण स्वीकारालच; आणि शिवाय मानवी प्राण्यांच्या अगाध मनोवृत्तींत बुडी मारून तळीं काय आहे हें शिपाई रंगराव सारख्या अनेक कादंबऱ्या लिहून त्यांतून आपल्या बंधूंस, भगिनींस, व

---

* अंबुताई हें नांव आपल्याला लिहिलें याचें कारण एक तर आपलें नांव मला ठाऊक नाहीं; व दुसरें मला असें वाटतें कीं आपण कादंबरींत ज्याअर्थीं हेंच नांव घेतलें आहे त्याअर्थी तेंच बरें.

पोरांबाळांस दाखविण्याचा ज्यांचा स्तुत्य उद्देश; व ज्यांनीं तो आपला उद्देश सिद्धीस नेण्याचा यथामति परंतु उत्कृष्ट तऱ्हेचा यत्नही केला; त्यांना ह्मणजे माझ्यासारख्यावर आपल्याविषयीं पूज्यबुद्धी उत्पन्न करण्याजोग्या गोष्टींचें चक्र पडलें असतां त्याच्या मनाची काय स्थिती होईल हें वर्णन करून सांगण्यास पाहिजे असें नाहीं. माझ्या या व पुढील लिहिण्यानें आपणांस क्वचित् " काय हें याचें वेडगळ लिहिणें " ह्मणून हसूं येईल; क्वचित् " काय ही यानें आपली फाजील स्तुती केली आहे " असें वाटून चांगल्या लोकांना आलाच पाहिजे असा रागही येईल. परंतु काय करूं? आपली ती कृती वाचून माझ्या साध्या भोळ्या मनांत आपल्याविषयीं जी काय पूज्य-बुद्धी उत्पन्न झाली आहे, ती ज्या शब्दांनीं वर मी व्यक्त केली आहे व पुढें करीन, त्यांनीं आपलें योग्य काम दशांशांनीही केलें नाहीं असें ह्मण-ण्यास मला कांहींही भीड मर्यादा वाटत नाहीं. आपली कादंबरी वाचून मला आपल्यास प्रख्यात इंग्रजी कादंबरी लिहिणाऱ्या ज्या मिस ऑस्टेन्बाई, किंवा फ्रेंच कादंबऱ्या लिहिणाऱ्या जॉर्ज सॉबाई, त्यांच्या जोडीला बसवाव्या असें वाटतें. मि. रा. गोविंदराव यांचा हेतू आपण जार्ज ईलिअट व्हावें असा दिसतो; परंतु माझ्या पामर बुद्धीला असें वाटतें कीं आपण **जेन आस्टेन**चेंच अनुकरण करावें. जॉर्ज इलिअटचें अनुकरण करणें इष्ट नाहीं. खरोखर साधेपणांत जी काय मौज आहे ती कशांत नाहीं. अव्याज मनोहरत्व हें कांहीं निराळेंच आहे. त्याची बरोबरी कशासही यावयाची नाहीं. मी आपणांस जेन ऑस्टेनची उपमा देतां याचें कारण तरी आपल्या भाषेचें अव्याज मनोहरत्व हेंच होय. आपली कादंबरी वाचून जो कांहीं मला आनंद झाला आहे तो खरोखर अवर्णनीय आहे. तो मला येथें सांगतां येत नाहीं, आणि तो सांगण्याचा विफल यत्नहि मी करीत नाहीं. जो यत्न खात्रीनें फसणार तो विनाकारण करून तरी कशास पहावा; तो न करणें हेंच विहित. आपण कादंबरीकार आहां; आपल्यालाच माझ्या स्थितींत आणून त्याची कल्पना करावी ह्मणजे झालें. हें पत्र लिहिण्याचा अविनय मी खरोखर केलाही नसता परंतु त्याला दुसरें असें कारण झालें. मि. रा. गोविंदरावांनीं बोलतां बोलतां असे उद्गार काढले

कीं, माझी पुणेवैभवांत[1] दर महिन्यास प्रसिद्ध होणारी कादंबरी वाचून आपली स्वतांची ही कादंबरी पुढें लिहिण्याविषयीं आपण हुरूप सोडून दिला. असें करण्याचें काय कारण असेल तें मी आपल्या कल्पनेला हव्या तशा चमक्या मारून भरधांव काढिलें, तरी देखील लक्षांत येत नाहीं.

वास्तविक पहातां असें करण्याला कांहीं एक कारण नाहीं. जर माझ्या कादंबरींत कांहीं गुण असेल, तर तसा किंवा त्याच्याहिपेक्षां कांकणभर वरचढ असा आपल्या कादंबरींत आहे. शिवाय ही आपली पहिलीच कृती आहे हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे. माझी तर आजमितीला अशी खात्री आहे कीं " गृहसौख्य " व " सुखकर दरीं " हे दोन भाग जसे तुम्हांला साधले आहेत तसे मला कधींही साधले नसते. राधाबाईच्या पात्रासारखें पात्र ज्यांनीं निर्माण केलें, त्यांनीं माझी कादंबरी वाचून हातपाय गाळणें हें अगदींच विलक्षण आहे. अहाहा, काय ह्या राधाबाईची बोलणी! जर जुन्या काळच्या प्रेमळ, सुशील अशा पोक्त स्त्रीचें चित्र मला दाखवा असें कोणी ह्मणेल, तर मी त्यास चटकन् आपली कादंबरी वाच ह्मणून सांगेन. खरेंच, राधाबाईच्या पात्रासारखें पात्र, व सुखकर दरीचें वर्णन ज्या स्त्रीनें केलें आहे, ती जर आपल्या रंगरावाच्या अंबूताई नांवाच्या बहिणीच्या वर्णनमिषानें आपणांस आळशी व भित्री ह्मणून घेत असेल, तर माझें ईश्वरापाशीं एवढेंच मागणें आहे कीं, " हे ईश्वरा, हिंदुस्थानचें बरें व्हावें असें तुला वाटत असल्यास येथील सर्व पुरुषांस व स्त्रियांस त्या अंबूताईप्रमाणेंच आळशी व भित्र्या कर". ज्या आह्मांस अहोरात्र वाचनलेखनावांचून कांहींएक करावयाचें नसतें; कोणाची भीती किंवा लाज नसते; अमक्याच्या देखत वाचलें तर ते काय ह्मणतील असें मनांत तर काय परंतु स्वप्नांत देखील आणावयास नको; त्या आमच्या हातून दिवसांतून लागोपाठ दोन तास अभ्यास होण्याची मारामार पडते. आणि ज्या तुमचा उष्ट्याखरकट्याखालीं सदां खट्टा मोकळा होतो, व केरपोतेऱ्याखालीं मानेचा कांटा मोडून जातो, आणि त्यांतही क्षणभर इकडे तिकडे करून कोठें वाचावयास बसलें तर तें किती चोरून ! न

---

१ ' आजकालच्या गोष्टी—मधली स्थिती ' ही त्यांची पहिलीच कादंबरी प्रसिद्ध होत होती. का. का.

जाणों, बाई, सासूबाई काय ह्मणतील? भाऊजी मामंजी काय ह्मणतील? व वन्सं काय ह्मणतील? हरएकाची भीती. जो येईल त्याच्या उपरजबरा आहेच. आपणांस क्षणभर तरी उसंत आहे काय! अशा स्थितींत असून आपल्या-सारख्यांनीं " शिपाई रंगरावा " सारखी कादंबरी इंग्रजीचा गंधही नसतां लिहून जर आपल्यालाच आळशी व भित्र्या ह्मणून घेऊं लागलां, तर मग आह्मांला कोणची याच्या पलिकडची पदवी येणार कोणास कळे. आपल्या कादंबरींतील पहिल्या भागांतील वर्णन फार उत्कृष्ट आहे, परंतु एके ठिकाणीं थोडेसें अप्रासंगिक झालें आहे. दुसऱ्या भागाचा दोष एवढाच कीं, त्यांतील वर्णनें फाजील विस्तीर्ण झालीं आहेत. तिसऱ्या भागापासून पुढें कोणच्याही भागांत माझ्या मतें कोणचेंही न्यून नाहीं. आपलें पुस्तक मी आजपर्यंत तीन वेळां वाचलें, व परवांपर्यंत आणखी एक वेळ तरी वाचीन. इतक्या वाचनांत मला त्यांत वर लिहिलें आहे त्याखेरीज व आणखी कांहीं क्षुल्लक दोषांखेरीज कांहीं एक वावगें वाटलें नाहीं. तेही क्षुल्लक दोष आपणास कळावें असें वाटत असल्यास मी टिपून ठेविले आहेत. आपलेकडे पाठवीन. आपल्या कादंबरीनें मला झालेला आनंद ऋणवत् भासत आहे, व ते ऋण मी केव्हांतरी फेडून ऋणमुक्त होईन अशी इच्छा आहे.

त्याचा मार्ग एवढाच कीं एक वर्षांच्या आंत एक कादंबरी लिहून ती आपल्यास समर्पण करावी, व हल्लीं चालू आहे तिचीही तीच व्यवस्था करावी. आपली मर्जी कळती तर बरें होईल. जास्त लिहिण्यास मला आतां कांहीं एक सुचत नाहीं, सबब हें येथेंच पुरे करून वेड्यावांकड्या शद्बांबद्दल आपली पूर्ण क्षमा मागतों.

आपल्याविषयीं पूर्ण पूज्यता धारण करणारा,

**हरी आपटे**

---

DECCAN COLLEGE
POONA
May 6, 1886.

My dear Govindrao,

The accompanying letter is for your learned wife. I have tried my utmost to express my admi-

नं. ...... ता. ......

ration for her and her novel therein. If it falls short please come to my aid, and let her know how highly I admire her writing. I have tried my utmost also to encourage her as you wished me to do. She has no doubt put to shame many a tyrant by her talents. Come ye, who think that woman is worthless, and be put to shame by throwing a passing glance on this रंगराव ! Oh men, what further proof do yon want of woman's high talents ? Is this not sufficient ? But enough in this vein. Why shold I multiply such questions when there is none to answer? or when none of these *tyrants have power to anwer ?* Considering myself highly happy for having a friend ( may I be bold to call you by this precious name ? ) whose wife is so learned and so wise, a second Jane Austin,

I am
Yonrs affectionately,
Hari N. Apte.

---

२

॥ श्री ॥

डेक्कन कॉलेज पुणें

गुरुवार जून. ता. १७, सन १८८६

ती. सौ. का कानिटकर मु. नेवासा

वडिलांचे सेवेसी,

हरीचे कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष. आपणांस आपण होऊन पत्र लिहिण्याची ही माझी दुसरी खेप. पहिलें पत्र आपणांस

मान्य झालें असें ऐकून हें पत्र लिहिण्याचें धाडस मी करितों. मासिक पुस्तकाच्या संबंधानें कांहीं गोष्टी लिहावयाच्या त्या गोविंदरावांच्या पत्रांत लिहिल्या आहेत ते आपणांस सांगतील. या पत्राबरोबरच मी एक आपल्यास वाचण्याकरितां "एका जंगल इनस्पेक्टराचीं सात स्वप्नें" नांवाचें पुस्तक पाठविलें आहे. या पुस्तकांत विशेष कांहीं आहे असें नाहीं. जंगल खात्यासंबंधानें ज्या कुळंबी लोकांच्या कुरकुरी आहेत, त्यांचे निराळ्या तऱ्हेनें प्रदर्शन केलें आहे. पुस्तकाचें नांव तर मुळींच सार्थ नाहीं. कारण त्याचें मुखपत्र काढून टाकलें तर तीं स्वप्नें आहेत असें स्वप्नांतही येणार नाहीं. शिवाय असें दिसतें कीं, पुस्तककर्त्यांनीं या आपल्या पुस्तकांत ह्मणी व उपमा यांचा होईल तितका, मग ओढून ताणून किंबहुना निरर्थक कां होईना, उपयोग करावयाचा असा निश्चय केला होता.त्यांत गुण एवढाच कीं, जंगलच्या कुरकुरीचें दिग्दर्शन त्यांत केलें आहे. आपण अवश्य वाचून पहावें. वाचून आपणांस कसें वाटतें त्या विषयीं पत्र येईल अशी आशा बाळगून आहे. एक वेळां सुरू झालेला ( एका बाजूनेंच कां होईना ) पत्रव्यवहार पुढें चालावा असें वाटतें. दुसरींही अशींच एक दोन पुस्तकें मागें पुढें मी आपणांस वाचण्याकरितां पाठविणार आहे. बाबा[1] अजून येथेंच आहे. त्याचे मनांतून लवकरच करमाळ्यास जावयाचें आहे असें दिसतें. आपणांस त्या ठिकाणीं पुस्तकें मिळत नसतील. पत्र लवकर येईल अशी आशा बाळगणारा

आपला

**हरी आपटे**

ता. क.—पत्र लिहिणें वगैरेच्या संबंधानें गोविंदरावांस वेळेची वगैरे अडचण असे, ह्मणोन मीं आजपर्यंत लिहिलें नाहीं. परंतु आपणांस तशी कांहीं अडचण नाहीं असें समजून पत्र लिहिलें आहे.

आपला

हरी.

---

१ हे माझे कनिष्ट बंधू रिसालदार स. कृ. बापट होत.

३

DECCAN COLLEGE

POONA
June 17, 1886

My dear Govindrao,

I received a letter from Mr. Thakur yesterday. Therein he says that Mr. Narayanrao has not sent his मस्तानी as yet. He also says that he wishes to start the magazine with only 24 pages in each number. I have sent a letter to him stating that it was not right to do so. I shall go to the town earlier than usual on Saturday, and ask Mr. Nanasheb directly. If he is unwilling to give in his drama I shall send 8 pages of a drama which I have got already ready. It is surely not a good omen at the very beginning. But never mind. I can even write one on the same subject that is announced in the advertisement. From the very first I had got my doubts. Let me know what your opinion is by return of post.

Please hand over the accompanying letter and the book, एका जंगल इन्स्पेक्टराचीं सात स्वप्नें, to your learned wife. Hoping that this will find you and your wife in good health, I am,

Yours etc.

H. N. Apte.

४

DECCAN COLLEGE.
POONA,
Saturday, June 26 1886

My dear Govindrao,

Strange, very strange, that you should not even acknowledge the receipt of my letter, and the book I sent for your as well as your learned wife's perusal. It is more than a week and yet both of you are silent. Have you not received the book and the letter ?

Mr. Nana Sathe had come here and we had a talk together on the ' village topic '. He left this for Bombay on Thursday most probably.

I can 't tell you with certainty whether the lst number shall be out on the lst of J...........

I have got a very good book with me "New India, or India in transition " by H. S. Cotton, Have you read it ? If you haven't write to me and you will receive it. It is a book which every Indian and Anglo--Indian ought to read.

Have you read the book I sent to you ? Let me know your opinion about it. Has your wife read it ? what does she say about it ? In her novel she has passed some remarks on the Forest grievances, and so I sent it to her.

५

जून ३०-१८८६

ती० सौ० का. कानिटकर मु. नेवासें

वडिलांचे सेवेशीं.

बालकें हरीचे कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष. आपलें पहिलेंच पत्र काल मला आलें; तें वाचून जो माझ्या मनाला आनंद झाला आहे तो पत्रीं तर काय, परंतु एकाद्या पुस्तकांत वर्णूं ह्मटल्यास देखील मला वर्णन करतां येणार नाहीं. भावी जॉर्ज इलिअटचें अगर जेन ऑस्टिनचें पत्र ज्यास जाईल त्यास होणाऱ्या आनंदाची जी काय परमावधि असेल तीच मला काल झाली, एवढेंच मीं आपल्या साध्या शब्दांत सांगून, खचित निष्फळ होणारा वर्णन करण्याचा अधिकउणा यत्न येथेंच सोडून देतों. दुसरी एक गोष्ट आनंद देणारी अशी मला कालच्या गोविंदरावांच्या पत्रा-वरून कळली कीं, आपण इंग्रजी भाषेचा अभ्यास करीत आहां. खरोखरीच यापेक्षां अधिक आनंदाची गोष्ट कोणचीही नाहीं. इंग्रजी भाषेचा अभ्यास केल्यापासून अनेक फायदे आहेत हें ह्मणजे आपणांस आणि मीं सांगा-चयास पाहिजे असें नाहीं.

आपण मला आज्ञा करितां त्याप्रमाणें मीं 'तरुणी शिक्षण नाटिके'वर टीका जितकी खरमरीत होईल, तितकी करीन. परंतु त्यापासून कांहीं एक फायदा होणार नाहीं. उलट असल्या चारगट पुस्तकांस नसती प्रसिद्धी मात्र मिळते; व इतकें वाईट पुस्तक तरी कोणचें व कसें आहे हें समजून घेण्याची व वाचण्याची इच्छा अशिक्षित लोकांच्या मनांत उत्पन्न होते. दुसरी गोष्ट अशी कीं, मला त्या पुस्तकावर हवी तशी आग पाखडतां येईल, परंतु त्याचा परिणाम चांगला होणार नाहीं. नारायणराव[1] हे गृहस्थ, पुस्तकांतलें पुस्तकांत त्याचे खाजगी संबंधांत काय आहे, असें समजणारे

१ माझे चुलत श्वशुर कै. नारायण बापुजी कानिटकर होत. का. का.

असतील असें मला अजून वाटत नाहीं. अर्थात् अशा टीकेनें त्यांचें मन फार दुखून जाईल. या दोन गोष्टी आपल्यापुढें ठेविल्या आहेत, त्यांचा विचार करावा. आपलें जर सांगणेंच असेल तर पुढीलच निबंधचंद्रिकेच्या अंकांत ती येईल. गोविंदरावांच्या पत्रांत असें लिहिलें आहे कीं, आपणही त्या चोपड्यावर टीका लिहून ठेविली आहे. ती जर मला पहावयास मिळेल तर बरें होईल. मि. "शिपाई" बाबाविषयीं[1] व नीलकंठरावाविषयीं[2] गोविंदरावांच्या पत्रीं लिहिलें आहे त्यावरून समजेलच. आपण गेला पुणे-वैभवाचा अंक वाचला असेलच. दुसरी अशी एक विज्ञापना आहे कीं, ज्यावेळीं आपला पत्रव्यवहार चालत नव्हता, त्यावेळीं आपलेकडील बातम्या व आपले दोघांचे विचार मजला कळत नसत. त्याचें गोविंद-रावास वेळाभाव हें कारण होतें. परंतु आतां ती सबब राहिली नाहीं. आपल्यास आतां दिवसांतून एक वेळां तरी पत्र लिहावयास फुरसत सांपडेल. तर दर आठवड्यास आपले कोणच्याही गोष्टींविषयीं विचार मला कळवावे; व त्याचप्रमाणें मीही आपले विचार तुह्मांस कळवीत जाईन. बेकनचें असें ह्मणणें आहे कीं "लेखनानें मनुष्याच्या विचारास ठाकठिकी येतें." आतां कागदही संपला तेव्हां पत्र संपवतोंच. उत्तर येईल अशी आशा बाळगणारा आपला

हरि आपटे.

---

DECCAN COLLEGE
30 June 1886

My dear Govindrao,

So glad was I to receive your expected letter that I could not go through the whole of it without almost weeping for joy. Do you know what it was that you gave me so great a joy? I am sure you do know, but perhaps through modesty you

---

१ व २ हे दोघेही माझे बंधूच. का. का.

will not express it even to yourself. I shall express it in plain words; then hear me. It was the first letter to me of the first lady novelist end learned woman in our Maharashtra, if not in India. Of course I do not mean to say that you had no share in the joy I felt; but what I want to tell you bluntly yet unreseavedly is, that it was the letter of your tearned and amiable wife-not only would--be, but sure-to-be, George Eliot or Jane Austin of the Maharashtra. It was her letter I say that caused more than 3/4 th of the joy I felt. You write to me something about taking back ( the steps ? ) we have taken. I do not see any reason for it.

I am glad to see tnat your book has been sanctioned in the prize-list in the Berars. This simple sentence is more expressive of my joy than thousands of high sounding phrases that can be laboriously framed. My friend the " Soldier " has not yet gone out of Poona. He stays in his own house in Narayan Peth, and is quite happy with his younger brother Nana, both being in the enjoyment of good health. Hoping both of you to be in good health with your children, and tendering my best respects to your learned and respected wife, I am,

Your sincere friend,
Hari N. Apte.

६

पुणें—डेक्कन कॉलेज.

शनिवार ता. १० जुलै १८८६

तीर्थस्वरूप सौ. का. कानिटकर, वडिलांचे सेवेशीं,

बालकें हरीचे कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष. आपलें ता. ४ चें पत्र आलें तें पाहून व वाचून विशेषच आनंद झाला. कारण त्यांत आपलें पत्र दर आदितवारीं येत जाईल असें अभिवचन आहे. आपण जें " जार्ज इलिअट व जेन ऑस्टिन या दोघींची पायाच्या धुळीचीही मला सर यावयाची नाहीं. " असें लिहिलें आहे, तें स्वतःची जास्ती जास्तीच स्तुती व्हावी ह्मणून लिहिलें आहे असें माझ्या स्वप्नींहीं आलें नसतें. परंतु एवढें ह्मटल्यावांचून मला राहवत नाहीं कीं, आपण आहांत याच्यापेक्षां आपल्याला कमी समजतां. जार्ज इलिअटची उपमा आपल्यास कदाचित् शोभणार नाहीं. कारण ती मोठी तत्ववेत्ती· होती. परंतु तशीच गोष्ट जेन ऑस्टिनची आहे असें मात्र मी कधींही ह्मणणार नाहीं. आपल्या शालीनतेमुळें कदाचित् आपल्याला मी आपली स्तुति करतों ही वावगी वाटत असेल; परंतु आपल्या-प्रमाणेंच मीं आपणांस निक्षून सांगतों कीं, माझेंही अंतःकरण जर पारदर्शक असतें तर मीं जें मजला खरें वाटतें तेंच लिहितों व बोलतों हें आपणांस एका क्षणांत कळून आलें असतें. परंतु पुरे. आपण आतां दुसऱ्याच गोष्टी काढूं.

आपण दुसरी गोष्ट कशी काय व कोणच्या पद्धतीवर लिहिणार हें कळविलें असतें ह्मणजे बरें झालें असतें. आपला तो विचार मला अगदीं मान्य आहे. प्रहसनांच्या, " तरुणी शिक्षण नाटिके " सारख्या घाणेरड्या चोपड्यांच्या परीक्षणाविषयीं मीं आपणांस सांगितलें तें मान्य झालें हें पाहून मला मोठा आनंद झाला. यासंबंधानें माझा थोडासा अनुभव मीं आपणांस सांगतों. "अभिनव तरुणी वियाप्रहसन" नांवाच्या एका चोपड्याच्या प्रकाशकास शिक्षा झाली हें आपणांस ठाऊक आहेच. तें पुस्तक इतकें

अश्लील आहे. कीं त्याला शिवल्यास स्नान करावें. परंतु त्याची वर्तमानपत्रांतून व कोर्टांतून चर्चा झाली या कारणानें त्याची बरीच प्रसिद्धि झाली आहे; व फार तर काय परंतु आमच्या या कॉलेजांतील सुशिक्षित लोकांपैकीं देखील कांहींजण तें पुस्तक वाचावयास मिळेल तर पहाताहेत; आणि माझी खात्री आहे कीं जर त्या पुस्तकाच्या प्रति विकणें सरकारनें बंद केलें नसतें, तर येथें कॉलेजांत त्या गचाळ पुस्तकाच्या निदान पंधरा तरी प्रति खपल्या असत्या. तेंच त्या पुस्तकाची इतकी प्रसिद्धी झाली नव्हती तेव्हां कोणास त्याचें नांवही ठाऊक नव्हतें. ही कॉलेजांतील सुशिक्षितांची स्थिति. मग बोलून चालूनच जे अशिक्षित व असमंजस त्यांची काय कथा? वाईट झाडांचीं व वेलींचीं फुलें जशींच्या तशींच जेथल्या तेथें कुजूं दिलीं तर कोणाच्याही लक्षांत येत नाहीं. पण तींच हातांत घेऊन लोकांस मुद्दाम तीं वाईट आहेत हें दाखवावयास गेलें, कीं त्यांस ती स्वतः पाहण्याची उत्सुकता झालींच.

मीं ठाकुरांस[1] एका नाटकाची कांहीं पानें पाठविलीं आहेतच. अंक केव्हां काढतात कांहीं ठाऊक नाहीं. पुढील भाग अजून पाठविलें नाहींत. त्यांचें पत्र आपलें पत्र आलें तेंच दिवशीं आलें होतें. मीं आजच त्यांस पत्र लिहितों.

नारायणरावांनीं आतां खांका वर केल्या यांत त्यांनीं आपल्यास फसविलें असें झालें नाहीं. कारण मनुष्य फसतो केव्हां? जेव्हां त्याला अमुक गोष्ट खात्रीनें होणार असें वाटून ती प्राप्त होत नाहीं तेव्हां. परंतु आपली तशी गोष्ट नाहीं. आपल्यापैकीं कोणासही नारायणराव आपल्या शब्दाप्रमाणें वागतील असें वाटलें नाहीं. इतकेंच नव्हे, परंतु ते वागणार नाहींतच असें खात्रीनें वाटलें होतें.

मीही आपणास दर बुधवारीं पत्र पाठवीत जाईन ह्मणजे ठीक पडेल. एक तर एकमेकांकडील कुशल कळेल, व दुसरें, ऐकमेकांचें अनेक गोष्टीविषयींचे विचार कळून त्यांत सुधारणा होण्याचा संभव असतो.

---

१ हे आमचें मनोरंजन नांवाचें मासिक होतें त्याचे म्यानेजर रा. गंगाधर अनंत ठाकूर होत. का. का.

आपण इंग्रजी शिकूं लागलां आहां हें फारच अभिनंदनीय आहे हें आपणांस मीं कळविलेंच आहे. येत्या पत्रीं आपण कोणत्या पद्धतीनें शिकतां आहां हें कळवावें; ह्मणजे त्याच्याविषयींचें कांहीं मला लिहावयाचें आहे तें मी आपल्यास कळवीन.

मी ऑक्टोबरच्या सुटींत नेवाशास येईन असें ह्मणतों आहे. तिथें आल्यानें दीड महिना आपल्या सहवासचा सहवास घडून एकांततेमुळें परीक्षेचा अभ्यासही होईल. परीक्षेचा अभ्यास ! खरोखर आमच्या युनिव्हर्सिटीसारखी वाईट गोष्ट दुसरी कोणचीही नसेल ! डोक्यावरचें ओझें इकडून तिकडे टाकलें कीं झाला विद्वान् ! आपण यांतून सुटलां आहां ही फार उत्कृष्ट गोष्ट आहे ! सुखदायक अभ्यास व ह्मारकीचे अभ्यास यांत केवढें अंतर आहे ! परंतु " आलिया भोगासी असावें सादर " याखेरीज दुसरा उपाय नाहीं ! ती. रा. रावसाहेबांस माझे नमस्कार व मुलांस आशीर्वाद सांगावे. आपण सर्व खुशाल आहांत असें समजणारा

आपला बालक

**हरी आपटे**

ता. क.

मि. बाबा येथेंच रहात असतो.

---

७

॥ श्री ॥

पुणें, डेक्कन कॉलेज

गुरुवार तां. १२ माहे आगस्ट सन १८८६

पहांटेचें ४ वाजायला ५ मिनिटें

तीर्थस्वरूप सौभाग्यवती काशीबाई कानिटकर यांस,

वडिलांचे सेवेशीं,

बालकें हरीनें दोन्ही कर जोडून त्रिकाल चरणावर मस्तक ठेऊन अनेक साष्टांग नमस्कार विशेष. परवांचें, मागलें, व त्याच्या मागलें, अशीं आपलीं तीनहीं पत्रें मला पोचलीं. परवांचेंच दिवशीं मीं ताबडतोब रावसाहेबांस

एक इंग्रजींत कार्ड पाठविलें त्यावरून आपणांस बाबाचा मजकूर कळलाच असेल. तो परवांचें दिवशीं दोनप्रहरींच येथें आला आहे. मी आपल्या कार्डांत आपल्यांस कळविलेंच आहे कीं, त्यानें मला मीं गुरुवारीं फलटण येथें जाणार असें कळविलें. परंतु आतां त्याचा तो बेत रहित झाला असावा असें दिसतें. कारण तो आजही येथेंच आहे. त्याची रजा आतां सारी महिनाभर उरली आहे. तेवढ्यांत त्यानें एकवेळां तरी आपल्या प्रियकर वडिलांकडे जाऊन यावें, व नंतर आपणांकडे यावें असें मी त्यांस सांगतों; परंतु तो कांहीं केल्या ऐकत नाहीं. ब्रह्मदेशाला जाण्याचा कांहीं अजून हुकूम नाहीं. अमुक पलटणी जायच्या अशीं फक्त वार्ता आहे. ज्या पलटणी जायच्या अशी भुमका आहे त्या पलटणींत याच्या पलटणीचें नांवही नाहीं. पंचांतील लिहिणें फक्त ब्रह्मदेशाच्या गोष्टीं निघाल्यामुळें साहजिकरीत्या निघालें होतें; व तें रा. रा. वामनरावांनीं[1] आपल्या नेहमींच्या संवयींप्रमाणेंच छापून टाकलें. यापरतें त्याला कांहींही कारण नाहीं. तर आपण व्यर्थ काळजी करूं नये. कारण अशा एकेक गोष्टीं विषयीं जर आपण विनाकारण काळज्या बाळगाल, तर ज्या गोष्टीं विषयीं आपणांस खरोखर व सतत काळजी बाळगावयास पाहिजे त्या गोष्टींचें, व ज्या मोठ्या कृत्याकरितां ईश्वरानें आपणांस निर्माण केलें आहे असें मला वाटतें त्या कृत्यांचें कसें होईल?

**जगीं सर्वसूखी असा कोण आहे,**
**विचारी मना, तूंचि शोधोनि पाहे,**
**मना त्वांचि रे पूर्वसंचित केलें,**
**तयासारिखें भोगणें प्राप्त झालें, ॥**

हें समर्थांचें ह्मणणें लाखों रुपयांच्या किंमतीचें आहे. हा श्लोक ह्मणजे एकदां वाचून टाकण्याचा आहे असें नाहीं. त्यांतील अर्थ गांभीर्य जों जों ध्यानांत आणावें तों तों थोडें आहे. पहिल्या चरणांतील प्रश्नावरून नेहमी आपण असें धरतों कीं, जगांत सर्वसुखी असा कोणी नाहीं. परंतु दासांचा

१ रा. रा. कै. वामन बाळकृष्ण रानडे एडिटर ज्ञानचक्षु व हिंदुपंच ठाणे.
का. का.

असा अर्थ नाहीं असें मला वाटतें. ते पहिल्या चरणांत प्रश्न करून दुसऱ्या चरणांत त्याचें उत्तर देतात कीं, " विचारी " सर्वसुखी आहे. बरें, विचार विचार तो काय करावयाचा असा कोणी प्रश्न करील तर त्यालाही त्यांनीं तिसऱ्या व ४ थ्या चरणांत उत्तर दिलें आहे. आपल्या येथें चोरी झाली हें ऐकून मला किती वाईट वाटलें हें मीं आतां मुळींच सांगत बसत नाहीं. परंतु त्यांतल्या त्यांत शांतपणानें आपण लिहिलेल्या पत्रावरून व त्यांतील समाधानावरून, (आपल्या थोर मनाची थोरवी जितकी कळून आली आहे तितकी वर्णन करण्यास खरोखर माझ्या लेखणींत कांहीं शक्ति नाहीं. खरोखर जों जों आपला व माझ्या पत्रोपत्रींच कां होईना पण परिचय वाढत चालला आहे, तों तों आपले एकेक गुण बाहेर पडून आपल्या मनाचा थोरपणा दाखवीत आहेत, तो पाहून माझ्या मनाची जी काय स्थिति होत आहे व आपल्याविषयींची जी कांहीं एक प्रकारची पूज्यता क्षणोक्षणीं बलवत्तर होत आहे ती मीं येथें सांगत नाहीं. कारण तसें सांगणें ह्मणजे तोंडपुजेपणाचा वृथा दोष आपल्यावर घेणें होईल. बरें, तें जाऊं द्या. पण आपण मला चोरीविषयीं पुढें कांहींच कळविलें नाहीं हें काय ? मीं कालरोजीं अशी बातमी ऐकली कीं, चोरीपैकीं सुमारें ५००।६०० रुपयांचा भाग सांपडला. तर याविषयीं कसें काय तें ताबडतोब कळवावें.

परंतु या चोरी विषयींचा मजकूर सोडून देऊन लोकांचीं मनें चोरण्याचा आपण सर्वांनीं जो यत्न सुरू केला आहे त्या विषयीं व त्याचें साधन जें " मनोरंजन " त्याविषयीं बोलूं. मनोरंजनाचा पहिला अंक २६ लाच माझ्याकडे आला. त्याचें बाह्य स्वरूप माझ्या मतानें चांगुलपणांपेक्षांही चांगलें आहे; त्यांत कोणत्याही गोष्टीची उणीव नाहीं. ज्याप्रमाणें हें बाह्यस्वरूपानें लोकांस चांगलें वाटत आहे त्याचप्रमाणें अंतः स्वरूपानेंही चांगलें वाटलें ह्मणजे या आपल्या " मनोरंजनानें " लोकांचें मनोहरण झालेंच ह्मणून समजावें. पहिल्या अंकावरूनच कोणी एकदम मत देत नाहीं. परंतु लोकांचे उद्गार जे मीं ऐकले, त्यावरून पुष्कळ उमेद बाळगण्यास हरकत नाहीं. एका गोष्टीविषयीं लोक खुष नाहींत असें मला कळून आलें, आणि

ती गोष्ट पुस्तकाचा लहानपणा. जो तो निदान ३२ पानें पाहिजेत असें ह्मणतो. आपली नवी कादंबरी " कृष्णाकांठचीं दोन कुटुंबे " इचें काय झालें ? मीं जेव्हां गणपतरावाचा मजकूर पाठविला तेव्हां नाटकाचा मजकूर पाठविला नाहीं. कारण त्याच्या ऐवजीं आपल्या या नव्या कादंबरीचा पहिला भाग येणार होता. परंतु मला परवांचे दिवशीं मि. रा. ठाकुरांकडून पत्र आलें त्यांत त्यांनीं असें लिहिलें कीं, नाटक एकच असल्याकारणानें तें दर खेपेस आलेंच पाहिजे. आपली नवी कादंबरी व रंगराव हीं पाळीपाळीनें घालण्याचा त्यांचा विचार आहे. व याप्रमाणें त्यांनीं आपणांस कळविलें आहे, असेंही त्यांनीं मला कळविलें आहे. त्याचें आपण त्यास उत्तर काय पाठविलें ? मी नाटकाचा मजकूर त्यांचेकडे रवाना केला आहे. तसेंच वरील पत्रांत त्यांनीं मला असें लिहिलें आहे कीं, येत्या ह्मणजे दुसऱ्या अंकीं " गणपतराव " फक्त ४ पानें घालून, ४ पानें खरेंखुरें मनोरंजन घालावयाचें. ते त्यांनीं काय लिहिलें आहे तें मला कळविलें नाहीं. असें करण्याचें कारण त्यांनीं एवढेंच दिलें आहे कीं, जर फक्त दुसराच अंक कोणाच्या नजरेस आला तर त्यालाही त्यांत मजा वाटावी. हा हेतू जरी चांगला आहे तरी कादंबरी ४ पानें देऊन तसें करणें मला रास्त दिसत नाहीं. अशा तऱ्हेनें ती कादंबरी संपावयास ५ वर्षेंही पुरीं होणार नाहींत. [1]नाट्यकथार्णवाची स्थिति मनांत आणली ह्मणजे या गोष्टीचा खरेपणा लवकरच ध्यानांत येईल. या माझ्या वाटण्याप्रमाणें मीं त्यांस निक्षून लिहिलेंही आहे. याउपर त्यांची मर्जी. मीं त्यांस असें लिहिलें आहे कीं, गणपतराव व दोन कुटुंबें किंवा रंगराव हीं आठ आठ पानें गेलींच पाहिजेत. नाटक नाहीं गेलें तरी हरकत नाहीं. कारण त्याचें एवढें महत्व नाहीं. आपलें ह्मणणें काय आहे तें कळवावें.

---

१ वरील नांवाचें फार सुंदर मासिक कै. शंकर मोरो रानडे काढीत असत. त्यांतील बरीच प्रकरणें अर्धवट राहून गेलीं.

का. का.

[1]केसरीकारांनीं जें केलें तें माझ्या मतें कोणत्याही अर्थी चांगलें नाहीं. त्यांनी इतक्यांत नांवें कळविल्यानें विनाकारण बभ्रा मात्र झाला. बाकी कांहीं झालें नाहीं. जॉर्ज इलिअट प्रमाणेंच आपली मजा व्हावी असें मला फार वाटत होतें. या केसरीच्या करण्याचा हेतु आपणास कसा वाटत असेल तो वाटो, परंतु मला तर चांगला वाटत नाहीं. त्यांत कांहीं ना कांहीं तरी काळें बेरें आहे. व त्यासंबंधानें मींही हॅम्लेट प्रमाणें " छे, सारें कांहीं ठीक नाहीं, " ( All's not well ) असेंच ह्मणतों. कालचा केसरी आपण वाचलाच असेल. त्यांतील मजकूर वाचून आपण मोठ्या बुचकळ्यांत पडलां असाल, तर त्याहीसंबंधानें थोडेंसें येथें लिहितों. मनोरंजनाची पोंच घेतांना केसरींत असें लिहिलें आहे कीं " गणपतरावाचे कर्ते, रा. सा. गो. वा. कानिटकर यांस हॅम्लेट नाटकाच्या भाषांतराच्या टीकेंत मदत केलेले , हरि ना. आपटे होत इ. इ. इ. " यावरून मीं एकट्यानेंच नव्हे परंतु निदान आणखी पांच सात असामींनी असा अर्थ काढिला कीं, कोठें तरी कानिटकरांनीं आपल्या पुस्तकावर टीका करून आपल्या पुस्तकास नादान ठरविलें असावें व त्यांत मीं त्यांस मदत केली असावी, असा आगरकर यांचा समज झाला असावा. जर खरोखर त्यांचा असा समज झाला असेल, तर त्यांनीं वरील वाक्य लिहिलें यांत नवल नाहीं. परंतु वरील वाक्य लिहिल्यानें जर लोकांस असें वाटलें कीं, रा. सा. गोविंदरावांनींच अशी एकादी टीका लिहिली तर त्यांचे-बर मात्सर्याचा दोष येणार नाहीं काय ? आणि त्यांनीं कोठेंतरी टीका लिहिली आहे असा अर्थ वरील दुटप्पी वाक्यांत चांगल्या तऱ्हेनें निघत नाहीं काय ? कानिटकरांचें साह्य करण्याचें जणूं काय माझें ब्रीदच आहे असें जगास दाखववयाचें होतें ! होय ! आणि त्यांत मला कोणच्याही प्रकारची लाज वाटत नाहीं, आणि वाटणार नाहीं, हेंही केसरीकारांनी पक्कें ध्यानांत

---

[1] मनोरंजनचा पहिला अंक निघाला त्यावेळी कांही नांवें गुप्त ठेवण्याचा मानस होता. पण कै. रा. आगरकर स्नेही असल्यामुळें त्यांनीं माझें नांव प्रसिद्ध केलें !

का. का.

ठेवावें. कानिटकर आपण आपल्यास दोष मुक्त करून घेण्यास खंबीर असतील, किंवा त्यांनीं मला आपल्यास दोषमुक्त करण्यास वकीलही नेमलें असेल; परंतु जी गोष्ट माझ्या ध्यानांत आली, तिचा रास्तपणें खुलासा करणें हें माझें कर्तव्य होतें असें मीं समजलों, व समजतोंही. जें मी केलें हें माझ्या मतानें रास्त, ह्मणून मीं केलें; व त्याबद्दल आपण तरी निदान मला दोष देणार नाहीं असें वाटतें. माझा अजून असा पक्का समज आहे कीं, आगरकरांनीं तें वाक्य मुद्दाम तसें दुटप्पी ठेवलें होतें, कीं कोणाला न समजतां दडपून गेलें तर गेलें बरें, आपल्यापैकीं कोणी खुलासा विचारलाच तर उलटावयास तयारच; आणि आगरकरांचा असा कृष्ण हेतु असेल कीं नाहीं याचा मला तरी निदान संशय नाहीं; आणि या वेळीं जरी कदाचित् नसला, तरी त्यांच्या त्या मानी व गर्विष्ठ स्वभावास असले हेतु मुळींच विसंगत नाहींत. मी आजपर्यंत आपणांस कधीं लिहिलें नाहीं व अजूनही लिहिणार नव्हतों; परंतु ओघ आला आहे तेव्हां पुढें लिहितोंच. हें आपण व्यर्थ स्तुतीचें किंवा तोंडपूजे पणाचें बिलकुल समजूं नये. खरोखर रावसाहेब गोविंदरावांसारखे गर्वहीन गृहस्थ अतिशय विरळा; इतकेंच नव्हे परंतु मला आजपर्यंत त्यांच्याखेरीज दुसरा कोणीही आजपर्यंत सांपडला नाहीं. त्यांच्या सारख्या बी. ए. एल. एल. बी. झालेल्या व दोन अडिचशे रुपये मिळविणाऱ्या गृहस्थांनीं आपल्या विद्वत्तेचा वगैरे कांहीं एक गर्व न बाळगतां, माझ्या सारख्या गरीबाशीं जीवश्च कण्ठश्च वागणूक करणें ह्मणज पृथ्वींतील आश्चर्यांपैकीं एक आश्चर्य आहे. हें मीं लिहितों हें मला जें वाटत आहे त्यापेक्षां रतिमात्रही ज्यास्त नाहीं. या तऱ्हेचे उद्गार मीं एकवेळां नाहीं दोन वेळां नाहीं पुष्कळ वेळां मीं आपल्या इतर मित्रांजवळ काढले आहेत; आपल्याजवळ मात्र आज काढीत आहे. गोविंदरावांसारख्या मोठ्या [ हें विशेषण मी त्यांस खरोखर योग्य ह्मणून देतों ] गृहस्थांनीं माझ्याशीं इतक्या सलगीनें वागावें असें माझ्या अंगीं गुण आहेत असें मला वाटत नाहीं. फक्त त्यांच्या या कृत्यानें

परगुण परिमाणून्पर्वतीकृत्य नित्यं ।
निज हृदि विकसन्तः सन्ति सन्तः कियन्तः ॥

या श्लोकार्धाचा पुरा अनुभव आला आहे; व त्यांत विरळ आहेत असें ह्मटलें आहे तेंही दिसून आलें. आतां कागदही संपला व असता तरी रा. सा. विषयींच्या पूज्यतेचें जें कांहीं भरतें माझ्या हृदयांत आलें आहे त्यानें मला पुढें लिहविलेंही नसतें. सबब पुरें करतों.

आपला भाऊ

**ह. ना. आपटे.**

आणखीही पुष्कळ गोष्टींविषयीं लिहावयाचें होतें परंतु आतां लिहवत नाहीं. आपल्या उत्तराची वाट पाहात बसतों. उत्तर येण्यास बिलकूल विलंब होऊं नये.

---

८

॥ श्री ॥

शनिवार पहांटेचें ४ डेक्कन कॉलेज, पुणें

सप्टेंबर. ता. २५, सन १८८६

ती. सौ. का कानिटकर

वडिलांचे सेवेसी,

बालकें हरीनें कृत शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष. ताई, तुह्मी जो मला अनियमितपणाचा दोष दिलात त्या दोषाला मी अयोग्य आहे असें कसें ह्मणूं ? पण मला एवढी पक्की खात्री आहे कीं, हल्लीं माझ्या मनाची जी स्थिति आहे ती आपल्याजवळ व रावसाहेबांजवळ सांगितली ह्मणजे आपणच दिलेल्या दोषांतून मला आण्या पावआण्यानें तरी मुक्त कराल. ही स्थिति व पुढील एकंदर मजकूर मी आपणांस याच्या आधीं केव्हां तरी मागेंच लिहिणार होतों. परंतु तेवढा अवकाशच झाला नाहीं. गेल्या महिन्यांत तर अशी कांहीं मजा उडून गेली कीं, मला गांवांत जाण्यास देखील वेळ मिळाला नाहीं. आणि त्यामुळें मी येथेंच राहिलों होतों, तो परवां अविधवानवमीला गेलों. आमची प्रिलिमिनरी परीक्षा गेल्या महि-न्यांतच झाली. व त्या योगानें अभ्यासाकडे जरा जास्त जोर द्यावा लागला;

आणि दुःखांत सुख एवढेंच कीं, तसा जोर दिल्यानें सर्व विषयांत चांगल्या तऱ्हेनें पसार होऊन पुढील परिक्षेस जाण्याची परवानगी मिळाली. या परिक्षांनीं तर मला मोठा त्रास दिला आहे. कांहींही इतर वाचावयास जा, त्यावेळीं आपण हें वाचण्यापेक्षां आपल्या अभ्यासाचेंच पुस्तक वाचल्यास बरें असें वाटून तें हातीं घेतलेलें पुस्तक निमूटपणें एकीकडे ठेवावें लागतें. हा एक आत्मसंयमन शिकविणारा धडाच आहे. आणखी आतां असेंही वाटूं लागलें आहे कीं, बी. ए. झाल्यावांचून कांहीं उपयोग नाहीं. व त्याप्रमाणें ३ वर्षांत बी. ए. होण्याचा मीं आपल्याकडून कृतनिश्चय केला आहे. तो तडीस जाणें ईश्वराच्या व आपल्या सारख्या वडील माणसांच्या आशिर्वादावर आहे. या परीक्षेसंबंधानें खरोखर मला माझ्या इष्टमित्रांकडून, सोयऱ्याधायऱ्यांकडून, ओळखीपाळखींकडून, प्रत्येकाकडून बोध होत असतो; व त्या योगानें माझें मन नेहमीं उद्विग्न असतें. मला नेहमीं असें वाटतें कीं, परीक्षांत काय अर्थ आहे ? परीक्षा देऊन कृतकृत्य झालेल्या लोकांना असणारें ज्ञान जर आपण परीक्षांवांचून संपादन करून घेतलें तर त्यांत काय कमी आहे ? बी. ए. या दोन अक्षरांत तर साऱ्या ज्ञानाचा गडा भरून ठेवलेला नाहींना ? जर तसें असतें तर असा ज्ञानाचा ग मिळविलेलें लोक काय थोडे आहेत ? त्यांच्या सोमवत्या घालावयास लि ! असा जरी माझ्या मनांत नेहेमीं विचार येतो तरी हल्लीं असें व लागलें आहे कीं, जे लोक माझ्या बी. ए. होण्याविषयीं एवढा विचार करतात ते माझ्या बऱ्यासाठींच करतात. त्यांत त्यांचें स्वतःचें बरें वाईट कांहींएक नाहीं. ते सारेच मूर्ख नाहींत. त्या साऱ्यांना मूर्ख ह्मणण्यापेक्षां आपणच कां नाहीं आपल्यास मूर्ख समजलें ? लौकिकाकरितां जर आपल्यास सर्व गोष्टी करावयाच्या आहेत, तर लोकांच्या अनुसंधानानेंच घेतलें पाहिजे. त्यांत आपलें मोठेंसें नुकसान नसलें होत ह्मणजे झालें. ताई, तुह्मांला कसें वाटतें ? मीं जरा हा असा निश्चय केला आहे, तर ह्मणजे स्वीकृत अशीं जीं आजचीं माझीं कामें तीं तडीस नेण्याला कधींहीं मागें घेणार नाहीं हो ! तीं कामें करावयाचीं तीं नियामितवेळीं केल्याखेरीज कधींही राहाणार नाहीं. आमचे चुलते माधवराव आपटे हे तुह्मांस ठाऊक

असतीलच. त्यांची तुह्मांला थोडीशीं नक्कल सांगतों. परवां, नाहीं बुधवारीं, श्री नारायणराव कानिटकरांकडे गेलों होतों, तेव्हां त्यांनीं मला पुढील हकीकत सांगितली. ते ह्मणाले, आह्मी गेल्या आठवड्यांत मुंबईस गेलो होतों तेव्हां एक दिवस रात्रीं आपल्या चुलत्यांच्या घरींच निजावयास गेलों होतों. त्या रात्रीं सुमारें दोन वाजेपर्यंत आमच्या गोष्टी चालल्या व त्यांत मुख्य विषय तुह्मी [ मी ] होतां." हें ऐकून मला थोडेसें आश्चर्य वाटलें व मीं त्यांस ह्मटलें, "एवढें माझ्यासंबंधानें काय बोआ चाललें होतें?" ते ह्मणाले "तुमच्या चुलत्यांचा तुमच्यावर थोडासा राग आहे." मीं ह्मटलें, "होय, आहे, मला ठाऊक आहे आणि त्याचें कारणही मला ठाऊक आहे." नारायणरावः—"काय कारण?" "मीं अजून बी. ए. झालों नाहीं हें." यावर त्यांनीं मान हालविली, व पुढें ह्मणाले, "वास्तविक पाहतां माधरावांचा तुमच्यावर अत्यंत जीव आहे असें त्यांच्या बोलण्यावरून दिसलें, कारण ते ह्मणाले, 'नारायणराव, तुह्मीच पाहा आमच्या कुटुंबाची स्थिति कशी आहे ती,! आह्मी चौघे बंधु, त्यांपैकीं आह्मी तिघे कुटुंबाच्या उपयोगाला कांहींच पडत नाहीं. मी तो हा असा! व माझ्या पाठचे तर कोणत्याही कामाचे नाहींत. येऊन जाऊन आमचे वडील बंधु नानाच काय ते कुटुंब चालवीत आहेत; परंतु ते आतां थकत चालले आहेत; थोडेच दिवसांत पेन्शन् घेतील. आणि त्यांचें पेन्शन् कांहीं साऱ्या कुटुंबास पुरण्याइतकें जबर असणार नाहीं. हा हऱ्या अजून बी. ए, ही झाला नाहीं. या उपर तो बी. ए. होऊन, एल्. एल्. बी होऊन वकिलीचा धंदा करावयाला लागणार,! कसचें काय आणि कसचें काय? यानें जर घाई केली नाहीं तर कुटुंबाचें होणार कसें? यानें यावेळीं एल्. एल्. बी. होऊन माझ्या धंद्यांत शिरावयाचें, निदान माझ्याजवळ तरी बी. ए. होऊन यावयाचें! तें कांहीं नाहीं. तो तुमचा मित्र आहे, अजून तुह्मी त्याला सांगा, व त्याला लवकर बी. ए. होऊं द्या! तो कांहीं लहान नाहीं. त्याचें त्याला समजूं लागलें आहे. त्यानें ग्रंथ वगैरे लिहूं नयेत असें माझें ह्मणणें नाहीं. परंतु आधीं आपला धंदा पहावा, व मग

काय तें करावें. माझ्याहि मनांतून फार आहे कीं, त्यानें मला मागें लिहिल्याप्रमाणें **माझ्या मौजेच्या चार घटकाचे** पुढील भाग लिहावे. माझ्या मतें तो अगदीं बिघडून गेला आहे. तुम्हांला काय वाटेल तें वाटो. मी परवां पुण्यास गेलों होतों, त्यावेळीं पाहिलें तर आपल्या माडींत दहा पांच मंडळी जमा करून तो खुशाल गप्पा मारीत बसला होता! आपल्या डोळयांपुढें कुटुंबाची पुढील स्थिति असतांना हें आमच्यानें कसें पाहवेल बरें? ”

अहाहा! ताई! केवढी कुटुंबाची काळजी पाहिली ना ही! त्यांनीं जो मला उपदेश केला आहे तो अगदीं यथायोग्य व ग्रहणीय आहे. परंतु सरतेशेवटचा जो गप्पा मारत बसण्याचा निखालस खोटा आरोप त्यांनीं मजवर लादला आहे, तो अगदीं अयोग्य आहे. मला विनाकारण गप्पा मारलेल्या कधींही आवडत नाहींत. ज्या दिवशीं आमचे चुलते आमचेकडे आले होते, त्या दिवशीं मीं कॉलेजांत यावयास निघालों होतों; व ते कॉलेजांतीलच इतर गृहस्थ एकदम कॉलेजांत येण्याच्या विचारानें मजकडे आले होते. एकाद्या मनुष्याविषयीं वाईट ग्रह झाला असला ह्मणजे ज्याप्रमाणें त्या मनुष्याच्या प्रत्यक्ष कृतींत वाईटपणाच दिसतो, तद्वत् आमच्या चुलत्यांची माझ्या विषयींची स्थिति झाली आहे. अस्तु, वडील आहेत, जसें ह्मणतील तसें खरें ह्मटलें पाहिजे. अशाच तऱ्हेच्या गोष्टी मागें घडल्या आहेत. एवढ्याविषयीं आमचे तीर्थरूप! त्यांनीं कधींही मला कोणच्याही गोष्टीविषयीं लिहून दुखविलें नाहीं. बरें, त्यांना माझी हकिकत ठाऊक नाहीं असेंही नाहीं. सर्व कांहीं ठाऊक आहे.

अशी एकंदर स्थिति असल्याकारणानें व पुढें युरोपांत जाण्याची जी अत्यंत उत्कट--इतकी कीं ती पूर्ण झाल्यावांचून माझा प्राण जाणार नाहीं असें सदोदित वाटतें--इच्छा, तीही सफल कोणच्या तऱ्हेनें होणार याविषयींची आतांशा मनांत सतत काळजी असल्याकारणानें, माझें मन सदोदित व्यग्र असतें. मनामध्यें एका ना एका तरी गोष्टीविषयीं विचार चालूं असतोच असतो. अगदीं साफ असें मन कोणच्याही वेळीं नसतें. याला मी आतां

करूं तरी काय? तुह्मी तरी कांहीं उपाय सांगा! ही माझ्या मनाची खरी खरी स्थिति आहे. याविषयीं तुह्मांला काय वाटेल? गेल्या महिन्यांतच काय तीं आपल्याला पत्रें आलीं नाहींत ना? आतां त्याचें कारण तुमच्यापुढें ठेविलें आहे. आतां जर माझ्याकडून अनियमितपणा होईल तर मात्र मी दोषास खरा खरा पात्र होईन. परंतु मी बोलून कशाला दाखवूं? नाहीं तर तिकडूनही आमच्या ताई ' गर्जेल तें पडेल काय ' ? असें ह्मणतील.

परंतु तें जाऊं द्या. नाहीं. पण जाऊं द्या कसें? " आजपर्यंत गेलेल्या पत्रांत आपणांस राग येण्यासारखें तर कांहीं नव्हतें ना? असेल तर मला आठवत नाहीं. मग काय असेल तें खरें! " ताई, असें काय ह्मणून लिहावें? रागावांचून माझ्या उत्तर न पाठविण्यास कांहींच कारण नसावें काय? आपलें व माझें बहीणभावंडाचें नातें असलें तरी तें रुसवा फुगवा उत्पन्न करणारें नाहीं! छे बोआ, असें नका लिहीत जाऊं!

बाबा गेला, त्यानें मला मात्र एक कार्ड लिहिलें होतें. तुमच्याकडे कांहींच पत्र आलें नाहीं कां? मी त्याला आजच लिहिलें आहे. नानाची प्रकृति बरी असून त्यालाही पुढच्या परीक्षेस जाण्याची परवानगी मिळाली आहे.

मनोरंजनाचा दुसरा अंक चांगलाच निघाला आहे. माझ्याहि मतें " मनोरंजन " या सदराखालीं आलेला मजकूर फार चांगला आहे. त्यांतलीं पदें कोणीं केलीं आहेत? निद्रेवरील आत्मगत भाषण कोणीं भाषांतर केलें?

आपल्याकरितां मीं लवकरच एक " विचारसाधन " या नांवाचें पुस्तक पाठविणार आहे. माझी खात्री आहे कीं तें आपल्याला आवडेल.

आपला इंग्रजीचा अभ्यास कुठपर्यंत आला आहे? रावसाहेब हल्लीं कोणत्या उद्योगांत गुंतले आहेत?

आज ( रविवारीं ) जो ' पुणेवैभव ' निघेल त्यांत माझ्या " आजकालच्या गोष्टीचा " पहिला भाग पूर्ण झाला आहे. हें पत्र आणि तो अंक बहुशः तुह्मांला एकदमच पोंचतील. तो वाचून कसें काय तें पुढल्या पत्रीं कळवालच.

मीं सप्टेंबरमध्यें आपल्याकडे राहावयास येणार होतों तो आलों नाहीं, यावरून देखील मी आपला शब्द किती पाळतो याचा आपण अंदाज काढला असेल. पण ताई ? मी अजून परतंत्र आहे हें लक्षांत आहेना? मी आपल्या ह्मणण्याप्रमाणें खरोखरच आपल्याकडे येऊन भाऊबीजेपर्यंत ताईच्या इथें राहणार होतों. परंतु आमच्या वडिलांनींहीं कालच पत्र लिहिलें आहे कीं, परिक्षेला अजून महिना आहे तर तूं सातान्यास येऊन राहा. आज ते सात वर्षे मला इतर काळीं सातान्यास व मे महिन्यांत महाबळेश्वरास बोलवीत आहेत, तरी मी गेलों नाहीं. आणि ते आपलेकडे न येतां नेवाशास जातों असें ह्मटलें तर काय ह्मणतील ? ह्मणून मीं कुठेंच न जातां कॉलेजांतच राहाण्याचा बेत केला आहे. आमची परीक्षा नोव्हेंबर महिन्यांत पहिल्या तारखेस सुरूं आहे. तेव्हां तोंडीं वगैरे सर्व १० तारखेला आटपेल असें वाटतें. ती आटपल्याबरोबर मीं आपण तेथेंच असल्यास निघून येतों. या बोलण्यांत मात्र अंतर पडणार नाहीं. पण आपल्याला दिवाळींत इकडे यायचें असेलना ? कां दिवाळी तेथेंच करणार आहां ? आणखी दुसरें असें पहा, मीं आतां तेथें आल्यानें ज्या हेतूकरितां तेथें यावयाचें तो हेतू मुळींच साध्य व्हावयाचा नाहीं. माझा ओढा माझ्या पुस्तकांकडे असणार, आणि तेथें येण्याचा हेतु सुखदुःखाच्या व अनेकविध गोष्टी सांगून आनंदांत काळ घालविण्याचा; हें दोन परस्परविरुद्ध गोष्टींचें समीकरण कसें बसावें? अशी गोष्ट परीक्षा झाल्यानंतरची नाहीं. नोव्हेंबर १०–१२ तारखेपासून डिसेंबर १० तारखेपर्यंत जरी तुह्मी ठेऊन घेतलें तरी मग माझ्याकडून ना नाहीं. त्यावेळीं आपण सुखाच्या गोष्टी सांगत, अनेकविध पुस्तकें वाचीत, व एखादें नवीन लिहीतही वेळ घालवूं. रावसाहेबांचें “Timon of Athens” चें भाषांतर कुठपर्यंत आलें आहे ? आपल्या मनोरंजनांत एका शेक्सपियरच्या नाटकाचें भाषांतर असावें असें मला फार वाटत आहे, व माझें हें “श्रुतकीर्तिचरित” नाटक आटपलें ह्मणजे मीं म्याक्बेथचें भाषांतर घालणार आहे. ही बरी आठवण झाली ! आपल्याला संस्कृत कितपत येतें ? साधारण येत असेल तर

" अभिज्ञान शाकुंतल " मी तेथें येईन तेव्हां आपणांस वाचावयास लावणार आहे. शाकुंतलाचें खरें सौंदर्य तें मुळांत वाचल्याखेरीज समजणार नाहीं. आपण तें मराठींत कोणच्या पुस्तकावरून वाचलें आहे ? " मौजेच्या चार घटका " वरून काय ? त्यावरून जरी असलें तरी तें इतकें चांगलें नाहीं. शाकुंतल नाटक इतकें विलक्षण आहे कीं त्याची एकदां गोडी लागली ह्मणजे मग तें जितक्यांदा वाचावें तितकें थोडेंच. तें नाटक गेल्या चारपांच वर्षांत मी बरोबर अकरा वेळां वाचलें; तरी परवांही अर्धे अधिक वाचलेंच. आपल्याला संस्कृत मुळीं देखील येत नसलें तरी मीं तेथें राहीन त्या महिन्यांत आपणांकडून नीट समजून तें एक वेळां वाचवीन, आणि मग त्याचें खरें खरें सौंदर्य आपल्याला कळून येईल.

हो, आणखी एक गोष्ट मी आपल्याला आज बरेच दिवस लिहिणार आहे. आपण या लिहिण्याच्या फायद्याविषयीं व गोडीविषयीं जर आपल्या भावजयीला पत्र लिहून थोडीशी कानउघाडणी कराल तर फार उत्कृष्ट होईल. मीं आपल्याकडून पुष्कळ सांगून पाहतों पण तेथें सारें आळवावरच्या पाण्याप्रमाणें होतें. जोंपर्यंत पानांवर पाणी आहे तोंपर्यंत मोत्यांची प्रभा एकीकडे आणि त्याची प्रभा एकीकडे; परंतु तें एकवेळां हलून निघून गेलें ह्मणजे एक लवलेशदेखील त्या जागीं मिळावयाचा नाहीं. मीं आपल्याकडून एक हजार वेळां व्याख्यानें झोडलीं असतील. पण त्याच्यापासून व्हावा तितका फायदा झाला नाहीं. आपण तरी आतां लिहून पहा. तिला फक्त लिहावयास ह्मणजे जेमतेम ओळखतील अशीं अक्षरें काढायला येतात. वाचायला मात्र बरें येतें. मीं आपलें उदाहरण तर तिला कितीदां दिलें. एक दोनदां आपल्याला पत्र लिहावें ह्मणूनही सांगितलें. एक वेळां एक पत्र आपल्याला लिहिलें होतेंही; परंतु मींच जेव्हां तें सारें गचाळ वाईट आहे असें ह्मटलें, तेव्हां तें तितकेंच राहिलें. आतां पुनः लिहा ह्मणून ह्मटलें तर, " नको, मला इथेंच हंसणें झालें तेवढें पुरे; आणखी त्यांनीं नको हंसायला, " असें उत्तर मिळतें. ह्मणून आपणच एक उपदेशपर पत्र लिहिलें ह्मणजे उत्तर ह्मणून तरी चार ओळी लिहिल्या जातील. आणखी

दुसरी गोष्ट अशी आहे कीं, " सर्वः सगन्धेषु विश्वसिति " ज्याचा त्याचा आपल्या जातीवर विश्वास असतो. मला थोडेसें स्वातंत्र्य असतें ह्मणजे मी तिला बरीच सुधारली असती. आणि वाचन लेखनाची एकदां गोडी लागली ह्मणजे मग ज्याचा तोच स्वतः ती वाढवीत असतो. जोपर्यंत ती गोडी नाहीं, तोपर्यंत काय ती पंचाईत. परंतु ही गोडी लावायला जीं कांहीं साधनें लागतात तीं मला नाहींत. आठ पंधरा दिवसांनीं एकदां भेट होणार, तेवढ्या वेळांत काय होईल तितकें वाचून व लिहून घेतों, व पुनः भेट होईपर्यंत अमुक पुस्तकाची अमुक पृष्ठें वाचून झालीं पाहिजेत अशी ताकीद देऊन येतों. पण, त्यापासून तादृश फायदा होत नाहीं.

ताई, आपण वडील आहां आपल्याजवळ मी इतक्या उघड रीतीनें बोलतों याबद्दल आपल्याला खेद होऊन आपण मला चारगट व टारगा तर नाहींना ह्मणणार? पण लहानानें आपल्या कागाळ्या वडिलांजवळ नाहीं सांगायच्या, तर कोणाजवळ सांगायच्या? आतां पत्राचें हें चऱ्हाट फार वळलें असें वाटेल तर येथेंच पुरें करतो. उगीच तुह्मांला तरी वाचण्याचे किती श्रम द्यावे? बरें त्यांत कांहीं मनाला आल्हाद देणारें तरी असलें तर असो कांहीं. पण तसें काहीं असेलसें माझें मला देखील वाटत नाहीं. एवढ्या या अडीच नोटपेपरांच्या अफाट निर्जन व शून्यारण्यांत एकादा तरी सुपीक, व हिरवागार व डोळ्यांनां आनंद देणारा असा एक बोटभर तरी प्रदेश असेल काय? नसला तरी मानून घ्याल असें,

**" परगुण परिमाणून्पर्वतीकृत्य नित्यं, ।**
**निजहृदि विकसन्तः सन्ति सन्तः क्रियन्तः ॥**

या न्यायानें पक्कें समजणारा,
आपला खरा व प्रेमळ भाऊ

**हरि आपटे**

ता. ) बोधसुधाकर मला अजून पहावयास मिळाला नाहीं.

ता. ) हेच पत्रीं ती. रा. रावसाहेब यांस माझे अनन्यभावें शिरसाष्टांग नमस्कार, व मुलांस आशिरवाद.

ता. ३ ) पत्राचें उत्तर खास येईलच. व तेंही लवकर असें मी ह्मणतों. " आतां तरी या पत्राचें उत्तर येईल अशी आशा आहे, " असें मी कधींही ह्मणणार नाहीं. तसें पाहिजे तर आपल्यासारख्या वडिलांनींच ह्मणावें.

---

९

॥ श्री ॥

पुणें ता. १५ ऑक्टोबर १८८६

ती. सौ. काशीताई,

वडिलांचे सेवेशीं,

बालकें हरीनें कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना वि. ' सर्वः कान्तमात्मीयं पश्यति ' असें एक शाकुंतलांत वाक्य आहे. त्याचा थोडासा अर्थ बदलला ह्मणजे तुमची जी स्थिति झाली आहे ती चटकन् लक्षांत येईल. शाकुंतलांत राजानें जेव्हां विदूषकास शकुंतलेसंबंधीं बोलतांना "मित्रा, पहावयाला योग्य अशा गोष्टींपैकीं अत्यंत श्रेष्ठ अशी गोष्ट पाहिली नाहींस" असें ह्मटलें, तेव्हां विदूषक लागलीच " अरे, तूं तर माझ्यापुढेंच आहेस " असें ह्मणाला. त्यावर राजानें वरचें संस्कृत वाक्य ह्मटलें आहे. त्याचा अर्थ तेथल्यासंबंधानें ' आपलें असेल, तें प्रत्येकाला चांगलें वाटतें ' असा आहे. पण ताई, तुमची स्थिति अगदींच निराळी झाली आहे. तुह्मांला चांगलें असेल तें आपलेंसें वाटायला लागलें आहे. असें जर नसतें तर " मराठी भाषेची दैना " हा निबंध व पुढील अंकांतलें पुस्तकपरीक्षण हीं दोन्हीं माझींच असें वाटलें नसतें. वस्तुतः पाहतां या दोन्ही गोष्टीशीं माझा एक

रतिमात्रही संबंध नाहीं. निबंध रा. रा. वामन विष्णु लेले व निबंधचंद्रिकेचे एडिटर या दोघांनीं मिळून लिहिला आहे. पुस्तकपरीक्षण कोणी लिहिलें तें मला ठाऊकही नाहीं. आजपर्यंतची गोष्ट निराळी होती. परंतु यापुढें कोणचीही गोष्ट आपल्यास व रावसाहेबांस कळविल्यावांचून माझ्या हातून होईल असें मला वाटत नाहीं.

आपल्याला मीं विचारसाधनाचें पुस्तक पाठविलें तें पावलें कीं नाहीं? तें पुस्तक रा. रा. विनायक कोंडदेव ओक यांनीं लिहिलें असावें असा माझा तर्क आहे. जर तें त्यांनींच तयार केलें असेल तर तें इतकें नामी झालें असेल यांत नवल नाहीं. एक मात्र आश्चर्याची गोष्ट आहे ती ही कीं, त्या " खाविंदचरणारविंदीं मिलिंदायमान " होऊन इंग्रजांची फाजील स्तुति व आमची विनाकारण निंदा करणाऱ्या गृहस्थानें हें बरेंच स्पष्ट व निस्पृह पुस्तक लिहिलें; व याच्या बरोबर त्यांचीं मतेंही बदलत चाललीं; किंवा त्यांच्या अंगांत स्पष्टवक्तेपणा व निस्पृहता हीं आलीं, हें पाहून मला मोठा आनंद झाला. यापुढें त्यांनीं असलीं पुस्तकें काढल्यास महाराष्ट्राचा फार फायदा होईल हें अगदीं निर्विवाद आहे!

रावसाहेबांस सांगावें कीं आपलीं पदें येथें लोकांस फार आवडतात. विशेषतः त्यांतील साधेपणा व सोपेपणा हे दोन गुण फार मोहक आहेत! ताई, 'मनोरंजन' हें सदर जसें तुम्हांस आवडतें तसेंच मलाही आवडतें. कां आवडूं नये? 'रंगरावही' लोकांस मोठा आवडता झाला आहे. (हें मीं आपल्या पदरचें उगीच कांहीं तरी लिहितों असें समजूं नका हो! कारण उगीच एकमेकांची स्तुतीच करण्याचे दिवस गेले असें मी समजतों, व आपणहि समजत असालच.) रावसाहेबांच्या निबंधाविषयीं मात्र लोकांची कुरकुर आहे, ती त्यांचा कठिणपणा व दुर्बोधता ही होय. बाकी 'मनोरंजन' या सदराखालीं जे चुटके येतात, त्यांच्याविषयीं कांहींच मत काढतां येत नाहीं. तिसऱ्या अंकांतील प्रकरण दुसरें याचा आरंभ आपल्याला कसा काय आवडला? नुसतें उगीच चांगलें ह्मणून नाहीं उपयोगी बरें का! ती तरुण व सुंदर स्त्री कोण तें तुह्मीं ओळखलें असेलच बहुशः; सांगा तर

पाहूं बरें, कितपत आपला तर्क खरा होतो तो ! हो, बरी आठवण झाली. तुह्मी मला एकदां "**गणपतराव**" ह्मणूनच नांव दिलें होतें. आणखी खालीं लिहिलें होतें कीं "**गणपतराव**" तो मीच. पण ताई, तसें कांहीं नाहीं बरें कां ! गणपतराव अगदीं निराळा आहे त्यांत माझा कांहीं एक संबंध नाहीं. आपला उगीच कोठें थोडाबहुत असला तरी तो कांहीं लक्षांत आणण्याजोगा नाहीं. आतां ४ था अंक येईल कीं नाहीं, त्यांत आपल्याला विशेष चांगली कळेल अशीच मजा आहे. मला तुमची बायकांची बोलणी कितपत साधलीं आहेत तें सांगा बरें कां ? मीं आपल्याकडून होतां होईल तो हुबेहुब करण्याचा यत्न केला आहे; पण तुमच्या पसंतीला पडतील तेव्हां खरें, कारण तुमचीं बोलणीं तुह्मांलाच खरीं खरीं कळायचीं. मागल्या पुणेवैभवाच्या अंकावर जें तुमचें मत विचारलें तें कांहीं तुह्मी नेहमीं नेहमीं उत्तमोत्तम ह्मटलेलें पाहावें ह्मणून नाहीं विचारलें. त्यांत दुर्गीला संकटांतून सोडविली आहे तें ठीक केलें आहे, कीं तिच्या हातून पापकर्म घडविलें असतें तर ठीक झालें असतें ! तशींच त्यांत काकूबाईचीं, उमाबाईचीं व दुर्गीचीं जीं भाषणें आहेत तीं हुबेहुब बायकांच्या बोलण्याप्रमाणें आहेत, कीं त्यांत कांहीं फेर आहे ? इत्यादि गोष्टी आपण मला कळवाल अशी आशा धरून मी आपणांस लिहिलें. मला पहिल्या प्रथमतः असें वाटत होतें, कीं, दुर्गीच्या हातून पाप करवून नंतर तिला पश्चात्ताप दाखविला असता, ह्मणजे ज्यास्त स्वाभाविक झालें असतें; आणि त्याचप्रमाणें करण्याचा माझा निश्चयही होता; परंतु माझ्या सर्व मित्रांनीं तिला निष्पाप अशी ठेवण्याविषयीं अत्यंत आग्रह केला. बाबानें तर येथून जातांना "दुर्गीला आपण पापकर्मांत घालाल तर आपलें व आमचें भांडण होईल!" असें स्पष्टपणें व गंभीरपणें बजावलें होतें. या कारणामुळें मी तिला तशी सोडविली.

आपल्या [1]भावजयसि पत्र दिलें तें वाचून तिला मोठा आनंद झाला.

---

[1] ही हरीभाउंची प्रथम पत्नी होय. ही कै. रा. दामोदर विद्याधर गोखले यांची कन्या. ही बाळंत होऊन सातवे दिवशी वारली, व तिचा मुलगा दोन महिन्यांचा होऊन गेला. का. का.

परंतु पत्र लिहिण्यास धीर होईना. सरते शेवटीं एक पत्र बराच वेळ जागरण करून लिहिलें; तें माझ्या हातून आपलेकडे पाठविणें होत नाहीं. कारण त्या पत्राचें दर्शन झाल्याबरोबर तुह्मांला इतकें हसूं येईल कीं, पोटें दुखून येतील. तिला अजून साधारणही लिहितां येत नाहीं हें पाहून मला फार वाईट वाटतें; परंतु नाइलाज आहे. तुह्मांला एक तिच्या लिहिण्याचा मासला सांगूं कां? 'ह्रस्व' हा शब्द कसा लिहायचा? 'रसव' असा ! आज-पर्यंतचे सारे ग्रंथ चुकले आहेत. तें पत्र लिहून झाल्याबरोबर तिनें मोठ्या आनंदानें मला पहावयास दिलें. तें लिहिलें जात असतांना त्याचा कोण बडीजाव? " आह्मांला दाखवा, ! " " सारं झाल्याखेरीज नाहीं दाखवायचं आमचं पत्र, ! " पण सरते शेवटीं जेव्हां भ्रमाचा भोपळा फुटला, तेव्हां माझें हंसतां हंसतां पोट दुखूं लागलें. मी ह्मटलें, " लंडनमध्यें हल्लीं प्रदर्शन चाललें आहे त्यांत पाठविलें पाहिजे ". "बरें, इतकें हिणवायला नको कांहीं, मला येईल कधीं तरी चांगलें " असें उत्तर मिळालें. आपल्या पत्रापासून लिहिण्यावाचण्याचा हुरूप मात्र जबर आला आहे ! एकंदरींत त्या दिवशीं बहार झाली खरी ! आपला आग्रहच असला तर मी तें पत्र पाठवीत, आप-लेकडे; पण पोट दुखावयास लागेल त्याच्या औषधाची तयारी करून ठेवा. वेळीं उगाच शोधाशोधी करावयास लागेल ह्मणून आधीं सूचना करून ठेवली आहे. मीं पत्र न पाठवितां असें लिहीन ह्मणून आपल्या वहिनीला सांगितलें आहे, व त्यामुळें थोडासा रागही करून घेतला आहे ! कां? गेल्या आठवड्यांतलें आपलें पत्र कुठें आहे? मी आतां विचारूं कां आप-ल्याला, ' कांहीं राग येण्याजोगें तर नाहींना कांहीं मीं लिहिलें ' ह्मणून? पण मीं नाहीं असें कधीं असें विचारणार ! मला एक अभ्यास व इतर कामें, पण तुह्मांला तर ताई इतकीं कामें नाहींत ना? आतां फिटंफाट झाली. बरें कां ! तुमच्या पत्राचा कंटाळा येईल असें कां तुह्मांला वाटलें? मीं तर तुमची सगळीं पत्रें जपून ठेवलीं आहेत. तुह्मांला लागेल तेवढें लांब पत्र लिहीत जा, मला कधीं कंटाळा यायचा नाहीं. ताई, तुह्मी इंग्रजी लवकर शिका हो !

त्यांत कांहीं बायकांचीं पत्रें त्यांच्या पाठीमागें पुस्तकरूपानें छापलीं आहेत

तीं तुह्मीं वाचलीं ह्मणजे तुह्मांला अतिशय आनंद वाटेल. राणीची मुलगी 'ॲलीस' ह्मणून होती ती जर्मनीच्या राजपुत्रास दिली होती. तिचीं आपल्या आईला, बहिणींना, नवऱ्याला वगैरे पत्रें आहेत. त्याचप्रमाणें कार्लाइलची बायको जेन हिचीं आपल्या मैत्रिणींना मित्रांना, वगैरे पत्रें आहेत; तशींच जॉर्ज इलिअटचीं आपल्या मित्रांना, मैत्रिणींना पत्रें आहेत. तीं सर्व पत्रें वाचून जो आपणांस आनंद होईल तो खरोखर वर्णन करतां येत नाहीं. या वरील विद्वान् स्त्रियांचीं मी पत्रें वाचलीं आहेत व मला तर त्यापासून फार आनंद झाला. तसाच आनंद आपल्याही पत्रापासून होईल असें जर मीं ह्मटलें तर आपल्यास अतिशयोक्ति वाटेल, पण त्यांत फारसें तसें नाहीं. त्या स्त्रिया जरी विद्वान् होत्या, तरी त्यांच्या पत्रांत विद्वत्तेचा कांहीं एक अंश नसून तीं अगदीं साधीं आहेत. राणीच्या मुलीचीं आपल्या आईला जीं पत्रें आहेत, ती किती साधीं, परंतु मोहक असून लांब आहेत! त्याचप्रमाणें जेन कार्लाइलचींही पत्रें तशींच आहेत. जॉर्ज इलिअटची तर गोष्ट आपणांस ठाऊकच आहे. तिचीं सर्व पत्रें आहेत तीं मैत्रिणींना व मित्रांनाच आहेत. तीं मीं दोन वेळां वाचलीं आहेत. त्या तोडीचीं आपीला पत्रें होतील अशी मला आशा आहे व मला पक्कें वाटतेंही. ( हें मी निरर्थक तोंडपुजेपणासारखें लिहीत नाहीं, असें मी आणखी एक वेळां सांगतों हें लक्षांत आणावें. कदाचित् मी तुह्मांला ह्मटल्याप्रमाणें माझीही 'सर्वः कान्तमात्मीयं पश्यति' याच्या खऱ्या अर्थाप्रमाणें स्थिति झाली असली तर सांगवत नाही! पण मला जें वाटतें आहे तें असें वाटतें आहे, व त्याप्रमाणेंच मी लिहितों. )

गेल्या रविवारीं नारायणराव कानिटकर यांजकडे गेलों होतों. त्यांना "गोविंदरावांचें पत्र आलें होतें काय" असें मीं विचारलें, त्यावर त्यांनीं होय म्हणून सांगितलें. त्यांतल्या त्यांत असें ह्मणाले कीं, "गोविंदरावांनीं आपलीं पत्रें नेहमीं ( लिटररी ) Literary असतात असें लिहिलें आहे" खरें काय? हो, बरी आणखी आठवण झाली. रावसाहेबांना ह्मणावें महिन्याच्या कांठीं स्वतःही एकादी ओळ लिहिली तर बरें नाहीं काय?

पुरे करूं कां आतां हें पत्र ताई? पुरेंच करतों आतां, ह्मणजे आपल्याला कंटाळवाणें नाहीं होणार. बरें पण, या आपल्या भावाला लांबलचक असें पत्र सोमवारीं येईल ना? पहा दोन पत्राची बाकी आहे ती चुकती करून टाका कशी! आतां पुरे करूं! पण हो, आणखी थोडा वेळ दम धरा! अरे, सगळेंच मुसळ केरांत! याच पत्रांत आपल्या रमावहिनींनें अनेक शिरसाष्टांग नमस्कार लिहिण्यास व मागील पत्राप्रमाणेंच दर खेपेस पत्र पाठवावें अशी आपल्यास विनंति करण्यास ताकीद केली आहे. त्याप्रमाणें मी केलें आहे. मजकडे आतां कांहीं नाहीं. झालें.

आपला प्रेमपूर्ण भाऊ

हरि.

---

१०

Deccan College, Poona,
19 October 1886,

My dear Govindrao,

Have I in any way offended you or your worthy wife ? I at least am not conscious of having done so either by word or by letter. I sent a book named विचारसाधन for your and my sister's perusal, but no acknowledgement from you. I posted a long letter by book-post on Friday last, but no answer. Oh, if you but had the power of reading my thoughts! For the last two days I am seeking for the reason, why should it be so ? Why should they not write ? Is it not nearly a month since I received any intelligence from them? Have I dropped any word or letter that offended them? Is our friendship so fragile that its bonds would

slacken by words? But first of all have any words come out from my pen which would have such an effect ? No, my mind assured me that there was no word which would do so. Such are the questions that give me pain. Oh, why should you both be so cruel to your Haripant ? Has he shown in any way that he is unworthy of your confidence ? But enough, he cannot write anymore today, Let him receive at least a card by Thursday's post, and then he shall be all well. Till then adieu says,

Yours affectionately,

Hari Apte.

My best respects to your learned wife.

ताई ! पत्र धाडा ! ! रागावूं नका ! ! !

आपला भाऊ

**हरि नारायण आपटे**

---

११

Bombay

October 30, 1886,

My dear Govindrao,

Please don't expect any letter from me till after the 8th of November. I came here yesterday at 11 A. M. Our examination is to commence from the 1st of the same month. My best compliments to Mr. Thakur and my best respects to my sister. Tell her that her letter was duly to hand; and that the letter to her वहिनी was delivered to

her. A literary sister wants a literary present on the Bhaubij. My sister shall have one of the same sort, when I shall be with you both. How did you like our fourth number of our Magazine This time I have not written आजकालच्या गोष्टी. Something else is substituted for it.

Yours affly.
Hari N. Apte.

ताई, एकादें लांबलचक पत्र लिहिलें ह्मणजे आपली ओंवाळणी झाली नाहीं? आपली ओंवाळणी तयार करण्यास मीं सुरबात करून ठेवली आहे. आपल्या तिथें आल्यावर ती पूर्ण करून आपल्या ओंवाळणीच्या ताटांत घालून नंतर मीं पुण्यास परतेन. गेल्या सात आठ दिवसांत इतक्या कांहीं गोष्टी झाल्या आहेत कीं, मी त्या आपणांस केव्हां लिहीन असें झालें आहे. परंतु ७ व्या तारखेपर्यंत दम धरतों. आपल्यास, ठाकुरांस, व रावसाहेबांस अनेक शिरसाष्टांग नमस्कार लिहून मी हें लहानसें पत्र पुरें करतों. मुलांस आशिर्वाद कळावें.

आपला भाऊ
**हरी आपटे.**

---

१२

Poona, January 21, 1887

My dear Tatya,†

It is strange, passing strange, that you should be silent after receiving two cards from me, and at a time too when it is most needful that you should write to me. In my last card I asked you

---

† हें तिकडचें घरगुति नांव होतें.

का. का.

to let me know, whether I should tell my friend to settle the printing arrangements of our magazine with the proprietor of the Nirnaya Sagar Press. Three or four days ago I received a card from Gangadharpant asking me to ask you where the matter for the February number is to be sent. The Poona subscribers have not as yet received copies of the 6th number. What does all this mean? My sister who promised to send long and full letters every week, is also silent. I don't understand what the reason of the queer silence of you both is. Did you receive any letter from Mr. Gangadharpant? In the card written to me he states that the letter of Moru is an adapted one, the original being in the Spectator. If this were true, we were all really misled in supposing it to have any reference to Shambhu's affair. You have got a copy of J. S. Mill's essay on Liberty. At the very beginning of it Mr. Mill says "The subject of this essay is not the so-called liberty of the will, so unfortunately opposed to the misnamed doctrine of philosophical necessity" Will you please explain to me in your lettter or me the name of the book in which I can findtll the explanation of the doctrin of 'philosophical necessity.' Hoping now at least to receive an early reply

I am
your sincere friend,
Hari Apte.

पुणे जानेवारी २१, १८८७

कां ताई, मलाच हंसावयास नको कांहीं. दोन कार्डें पाठविलीं ! मागच्या कार्डांत मला निदान गुरुवारीं पत्र आलें पाहिजे असें लिहिलें, तरी देखील पत्र नाहीं. आतां काय ह्मणावें ? थोरलें पत्र नाहीं तर नाहीं, पण एक कार्ड टाकायला तरी हरकत नाहीं ! कां तेंही टाकायला जड जातें ! वर तात्यांना इंग्रजींत लिहिलें आहे त्यावरून सर्व ध्यानांत येईलच. आपलें पत्र नाहीं यामुळें मला मोठी काळजी लागली आहे. हें ह्मणजे केवळ मी आचारार्थ लिहितों, असें आपण समजूं नये. वास्तविक ह्मटलें ह्मणजे बुधवारीं तरी तुमचें पत्र यायला पाहिजे होतें. कांहीं गोष्टीविषयीं आपल्यास राग तर नाहींना आला ? मी आपणांस असें लिहिणार नव्हतों, व असें लिहिणार नाहीं असें मागल्या एका पत्रांत लिहिलेंही होतें. पण वास्तविक पत्र पाठविण्याची मोठी जरूर असतां जेव्हां पत्र नाहीं, तेव्हां हा विचार मनांत येऊन असें मी लिहीन यांत नवल काय ? जर कांहीं रागाचें कारण असेल तर मला स्पष्टपणें विचारावयाचें, कीं मौन धरावयाचें? नाहीं, पण तुमच्याकडे येण्यापूर्वीं मीं बरेच दिवस पत्र पाठवीत नव्हतों त्याचा सूड उगवावयाचा मनांत आणलें आहे वाटतें ? हो खरंच ताई, नाहीं तर फार मोठं पत्र ल्याह्यायचं असेल ह्मणून तर नाहींना उशीर लागला. ?

धमनीविषयीं मीं नानांना लिहिलें होतें, त्यांनीं मला लिहिलें कीं, “ मीं कानिटकरांस निराळें पत्र लिहिलें आहे त्यांत सर्व मजकूर लिहिला आहे. ” त्या पत्रांत तर कांहीं राग येण्याजोगें नव्हतें ना ?

आतां मंगळवारीं जर मला पत्र नाहीं आलं, तर **प्रीपेड** तार करूं काय ?

असो. मुलांस आशीर्वाद लिहून हें पत्र मीं पुरें करतों.

आपला भाऊ

**हरि आपटे**

पत्राची वाट फार फार फार पहातों आहे. आजपर्यंत डोळ्यांत तेल घालून पहात होतों; परंतु आतां पुण्यांतील तेल संपण्याची पाळी आली.

## १३

श्री.

बुधवार पुणें मार्च १६ सन १८८७

ती. सौ. काशीताई,

वडिलांचे सेवेशीं,

बालकें हरीनें कृतानेक साष्टांग नमस्कार वि. वि. आपण तर आपला निश्चय बरेच दिवस चालविला, पण आपली प्रकृती कशी आहे हें आधीं कळवा पाहूं! मग साऱ्या गोष्टी. नानासाहेब आले त्यांनीं आपली प्रकृति बरी आहे, आतां हींव कांहीं येत नाहीं असें सांगितलें. पण तेवढ्यानें माझा सतोष होत नाहीं. आपल्या हातचें पत्र आलें पाहिजे. नानासाहेब आले त्यावेळीं त्यांजबरोबर येणार होतों, परंतु घरांतल्या मंडळींचा रुकार मिळेना, व नानांना पत्र लिहून उत्तर मिळेपर्यंत अवधि नव्हता. पुढें अकोल्यास आमचे मामेबहिणीचें लग्न होतें. तिकडे जातांना आपलेकडे यावें असा उद्देश होता. परंतु लग्नाला जा अशा अर्थाचें वडिलांकडून पत्र आलें तें लग्नाच्या आधीं एकच दिवस आल्याकारणानें लग्नालाही जाण्याचा बेत मजला रहित करावा लागला. असो. ही प्रत्यक्ष भेटीविषयींची गोष्ट झाली. पत्रभेट तर होण्यास हरकत नव्हती! पण तीही माझ्या हातून झाली नाहीं याचें मुख्य कारण आळस व अनास्था हीं तर खरींच. परंतु आधीं उल्हास आणि त्यांत फाल्गुन मास असेंही थोडेसें आहे. तें कसें तें सांगतों. मी आपणांस एका कार्डांत मी किंचित् आजारी आहे असा अर्थ कळविला होता तो लक्षांत असेलच. नानासाहेबांस विचारतां तुम्हांस त्यांनीं तसें कांहीं नाहीं असें सांगितलें तेंही वावगें नाहीं. फार तर काय, तुम्ही स्वतः नीट पहाल तर तुम्हांस दिसून यावयाचा नाहीं. तुम्हांलों मोठें गूढ पडलें असेल कीं असा आजार तरी कोणता? तो आजार उजव्या डोळ्यापुढें काळे काळे डाग – पडद्याप्रमाणें दिसणें हा होय. आज बरोबर महिना झाला, कांहीं मोहोरी येवढें डाग माझ्या उजव्या डोळ्यापुढें दिसतात. (हल्लीं बरेच कमी

आहेत. ) त्यांत एक लहानशा वाटाण्याएवढा आहे. एथील तीन डॉक्टरांनीं डोळ्याची परीक्षा केली, व डोळ्याच्या आंत कांहीं एक अव्यवस्था नाहीं, ते शाबूत आहेत असें सांगितलें. औषध चालू आहे व हल्लीं डाग कमी झालें आहेत. या डागांपासून दूरचा पदार्थ स्पष्ट न दिसणें यापेक्षां कोण-चीही गोष्ट नाहीं. डोळ्याची आग होत नाहीं. किंवा त्यांतून पाणी येत नाहीं. ते पहिल्याप्रमाणेंच आहेत तसे आहेत. मीं मुंबईला जाईन ह्मणून जें लिहिलें होतें तें याचकरितां. अजूनही कदाचित जाईन. एकदां डोळ्याची पूर्ण परीक्षा करून यावें असें वाटतें. कारण ते डाग अजून समूळ नाहींसे झाले नाहींत. त्या डागांपासून माझ्या वाचनांत अथवा लेखनांत जरी कांहीं अडथळा येत नाहीं हें खरें आहे तरी त्यांस तसेंच सोडूं नये. परंतु पुरे ही कर्मकटकट.

रा. रा. नानासाहेब फडणीस व रा. रा. बावळे आदिकरून मंडळींस स्त्रियांस उच्च प्रतीचें शिक्षण देणें कां आवडत नाहीं हें कांहीं मला कळत नाहीं. स्त्रियांनीं ग्रंथ कां लिहूं नयेत? स्त्रिया ग्रंथकार झाल्यापासून कोणचें नुकसान होईल हें नानासाहेब अगर त्यांचे अनुयायी दाखवूं शकतील काय? नानासाहेबांचें भाषण ऐकण्यास मीं असतों तर मला फार बरें पडलें असतें. माझ्या हातून ह्मणजे त्यांच्यासारख्या विद्वान् मनुष्याची खात्री झाली असती, किंवा त्यांच्या विचारांत मीं कांहीं फरक पाडला असता असें नाहीं. उलट माझीं जीं कांहीं मतें आहेत त्यांतील चुका मीं सुधरून घेतल्या असत्या. परंतु तसें झालें नाहीं त्याअर्थी नाइलाज आहे. असो. जे गृहस्थ स्त्रियांना थोडेंबहुत शिक्षण द्यावें असें ह्मणतात, त्यांनींच स्त्रियांनीं ग्रंथकार होतां कामा नये, अगर झाल्या तर त्यांची आह्मांस जरूर नाहीं असें ह्मणणें ह्मणजे खरोखरच चमत्कारिक आहे. जे असें ह्मणतात कीं स्त्रियांस मुळींच शिक्षण देऊं नये, त्यांचीं मतें खोडण्यास कांहींतरी श्रम पडतात, परंतु जे शिक्षण द्यावें असें ह्मणून त्याची मर्यादा करून देऊं इच्छितात, ते साऱ्या पृथ्वीला कोरड्या वाळूचा तट बांधण्याचा यत्न करूं इच्छितात असें ह्मटलें पाहिजे. शिक्षणापासून जर सदोदित चांगलेंच होणार

आहे तर तें स्त्री व पुरुष कोणाच्यांतही चांगलेंच झालें पाहिजे. जें एकास अन्नाच्या ठिकाणीं तें दुसऱ्यास विषाच्या ठिकाणीं असतें हा न्याय ज्ञानाच्या अगर शिक्षणाच्या ठिकाणीं लागू नाहीं. जर पुरुषांच्या ग्रंथांपासून जगाला फायदा होत आहे, तर स्त्रियांच्या ग्रंथांपासून झालाच पाहिजे. एकचाकी गाडीपेक्षां दुचाकी गाडींत भक्कमपणा ज्यास्त व पडण्याचा संभव कमी, या न्यायानें पाहिलें तर स्त्रिया ग्रंथकार झाल्यापासून तुमची सुधारणा दुप्पट जोरानें चालेल असें कोणीही मस्तक सुस्थितींत असणारा म्हणेल. मात्र तो " स्त्रिया म्हणजे एक प्रकारच्या उपभोग्य वस्तु " असें म्हणणारा नरपशु नसावा. स्त्रियांच्या ग्रंथांपासून नेहमीं तोटेच होतील असें जर नानासाहेबांचें व त्यांच्या अनुयायांचें म्हणणें असेल, व तसें आहे म्हणून जर ते निक्षून सांगतील, तर ते आपल्या शिरावर मोठी जबाबदारी घेतील असें मला वाटतें. कारण हें सिद्ध करणें मोठें दुर्घट आहे. पुष्कळ लोक असें म्हणतात कीं, स्त्रिया या अगदीं जात्या कोत्या बुद्धीच्या व अविचारी आहेत परंतु हें त्यांचें म्हणणें अनुभवसिद्ध नसल्यामुळें खरें आहे असें म्हणतां येत नाहीं. तुम्हीं म्हणाल कीं, आज जगावर जितकीं अविचाराचीं कृत्यें घडून येतात त्यांपैकीं पुष्कळ स्त्रियांच्या हातून घडलेलीं दृष्टीस पडतात. व बाकीच्यांत त्यांचा प्रत्यक्ष किंवा संबंधिक तरी भाग असतोच. वादाकरितां हें म्हणणें गृहीत धरूं. परंतु त्याचें कारण " त्यांचा ( स्त्रियांचा ) स्वभावच तसा " असें जें म्हणतात, तें मला मान्य नाहीं. एवढ्यावरून म्हणजे वरील विधान मला मान्य आहे असें नाहीं. मी फक्त वादाखातर गृहीत धरलें आहे. जगानें जास्त शिक्षण न देतां स्त्रियांच्या अविचारीपणाचा अनुभव घेतला आहे ( असें कित्येक म्हणतात ) तसाच शिक्षण देऊन अनुभव घेतला पाहिजे, व मग दोन्ही अनुभवांची तुलना करून काय तें विधान करावें. जोंपर्यंत तसें झालें नाहीं, तोंपर्यंत असलीं विधानें ठोकणें हें नानासाहेबांच्या सारख्या जाणत्यास ठीक नाहीं. उलट असें म्हणतां येईल कीं स्त्रियांचा स्वभाव कोता किंवा अविचारी नाहीं. कारण ज्या स्त्रियांना पूर्ण ( हल्लींच्या मानानें ) शिक्षण मिळालें आहे,

त्यांचा जगास अनुभव आहे. अशा स्त्रियांचीं नांवें घेऊन उदाहरणें द्यावयाचीं येथें जरूर नाहीं. बुद्धिसामर्थ्यानें स्त्रियांत व पुरुषांत कांहीं एक फरक नाहीं हें तर माझें पक्कें मत आहे. जें पुरुषास साहजिक रीत्या येईल तें स्त्रीसही येईल, व ज्याला श्रम पडतील तें दोघांसही सारखेंच जड जाईल. शरीरसामर्थ्यानें कोण बळकट हें मात्र पहावयाचें राहिलें. मिलचें मत असें आहे कीं, स्त्रिया या पुरुषांपेक्षां शरीरसामर्थ्यानें कमीं आहेत व असेंच पुष्कळांचें, किंबहुना बहुतेकांचें मत आहे. परंतु माझें मत काय हें तुह्मांस सांगितलें असतां, तुह्मांला अत्यंत आश्चर्य वाटेल. वाटो बिचारें. पण जें माझें मत आहे तें मी सांगून देतों. मिल्लसारख्या महान् तत्ववेत्त्याच्या उलट मत असणें हें तर मोठ्या धाडसाचें काम खरेंच, परंतु तसें आहे हें माझ्या सारख्यानें गोविंदरावांच्या जवळ स्पष्टपणें सांगणें हें कशाचें काम आहे हें मुळींच कळत नाहीं. पण मी हें कोणत्या उद्देशानें करतों आहे हें मला पक्कें ठाऊक आहे. ह्मणून मीं तें उघड सांगतों. ऐका तर. माझें मत असें आहे कीं, स्त्रिया याच पुरुषांपेक्षां अधिक सामर्थ्यावान् आहेत; त्या कशा हें मीं आतांच सांगत नाहीं. तुह्मी व गोविंदराव मिळून विचार करा, तुमचें काय ह्मणणें तें कळूं द्या, व मग काय तें मी लिहीन. मात्र एवढेंच ध्यानांत ठेवावयाचें कीं, स्त्रिया शरीरसामर्थ्यानें पुरुषांपेक्षां ज्यास्त सशक्त आहेत असें ह्मणण्यानें त्या ओझीं उचलण्यांत अगर तुळवटे उचलण्यांत आहेत असें नाहीं. पुरे. पुढचें पुढें पाहूं. हाच विषय फार लांबला. अझून कित्येक गोष्टी लिहायच्या राहिल्या आहेत.

मनोरंजनाचा आठवा अंक पाहिला. त्यांतील मासला हा आपल्या लिहिण्याचा ब वर जें कांहीं लिहिलें आहे त्याचा अति उत्कृष्ट मासला आहे. खरेखर " मासला " वाचून जो कांहीं माझ्या मनाला आनंद झाला आहे तो मला अगदीं वर्णन करतां येत नाहीं. त्यांतील भाषा कितीं गोड व योग्य आहे हें मला सांगतां येत नाहीं. असेच भाग नेहमीं येत गेल्यास आपल्यास " जेन ऑस्टेन " ही संज्ञा तोकडी पडेल. एवढेंच काय तें मला लिहितां येत आहे. आपला तो " मासला " वाचून जो आनंद झाला तो ' परिच्छे-

दातीतः सकलवचनानामविषयः ' असा आहे. मात्र तो ' पुनर्जन्मन्यस्मिन्ननुभवपथंयोनगतवान् ' असा न होवो ह्मणजे झालें. व तसा होणार नाहीं अशी माझी पक्की खात्री आहे. आतां मीं जास्त लिहित नाहीं; कारण लिहितां येत नाहीं.

रा. रा. नाना[1] साठे हे येथें आले आहेत. त्यांना मीं मनोरंजनाबद्दलची सर्व हकीकत विचारली. ती, व रा. रा. ठाकूर यांनीं दिलेली हकीकत यांचा मेळ कसा बसवावा हें मला मुळींच समजत नाहीं. जी जी गोष्ट ठाकुरांनीं आपणांस सांगितली होती, ती ती नानांच्या सांगण्यावरून खोटी ठरली. पहा आतां. ठाकुरांनीं दरमहा खर्च हजार प्रतींचा ५० रु. ह्मणून सांगितलें होतें. नानानें ३६ रु. ह्मणून सांगितले, व त्याप्रमाणें आह्मी घेत आलों ह्मणून सांगितलें. जाहिरातीचें उत्पन्न फार म्हणून ठाकुरांचे म्हणणें. नानांचे सांगण्याप्रमाणें त्यांचे उत्पन्न पुरें दोन रुपयेही नाहीं. ठाकुरांचे सांगण्याप्रमाणें वंगणीदार २५०–३००. खरे वर्गणीदार ११५ वर नाहींत. आतां ठाकुरांच्या सांगण्यास व खर्‍यास कसा मेळ घालावा तें मला कळत नाहीं. तुह्मीच कसा घालाल तो घाला. वर्गणीदारांची संख्या नानानें मला सांगण्याच्या अगोदर ठाकुरांच्या एका पत्रावरून कळली. ती अशी. गेल्या महिन्यांत माझ्या मनांत असें आलें कीं, येत्या मार्च महिन्याच्या अखेर ह्मणजे २५ वीला पाडवा आला आहे. तेव्हां मार्च महिन्याच्या अंकासोबत पाडव्याचा जादा अंक ह्मणून एक काढावा; व त्यांत चोवीस पानें; एक सबंध गोष्ट चटकदार असून त्याचें कव्हर सचित्र ( ह्मणजे रामपंचायतनासारखें ) घालावें. ह्मणजे एक नवी पर होऊन मजाही झाली असती. त्याला खर्च सुमारें ७५ रु. आला असता ( हा त्यावेळचा अदमास. कारण आपण छपाई ५० रु. असें समजत होतों. ) तो खर्च मनोरंजनाच्या फंडांतून घ्यावा व वर्गणी-

---

१ कै. रा. रा. नारायण नरसिंह साठे इंदुप्रकाश छापखान्यांत कांहीं कामावर होते त आमच्या मंडळीच्या खेह्यापैकीं एक होते. तेही मनोरंजनाची व्यवस्था पहात असत.

का. का.

दारांना वाटून जे अंक राहतील ते विकून त्याचे पैसे पुनः मनोरंजन फंडांत टाकावे. त्या अंकांची किंमत अर्थांतच वर्गणीदारांना अंक जाऊन जे अंक उरतील त्यांजवर खर्च लादून जितकी येईल त्याच्या दुप्पट किंवा २॥ पट ठेवायची, असा विचार माझे मनांत आल्यावर मीं दोघांचौघांस तो कळविला. व त्यांस तो पसंत पडल्यावर मनोरंजनाचा फंड किती आहे व हा विचार पसंत पडतो कीं नाहीं हें पाहण्याकरितां मीं ठाकुरांस पत्र लिहिलें होतें. त्यावर त्यांचें पत्र आलें; त्यांत त्यांनीं आह्मांस असें लिहिलें कीं, मनोरंजनाचे वर्गणीदार १०० आहेत व त्याच्या फंडाची शक्ति इतकी नाहीं तर मी तात्यांस हा विचार कळविण्यांत अर्थ नाहीं. इतकें झाल्यावर मग मीं तो विचार मनांतून गाळून टाकला, व आपणां उभयतांस कळविला नाहीं. रा. रा. ठाकुरांनीं आह्मांला इतक्या अंधारांत ठेवलें हें चांगल्या हेतूनेंच ठेवलें असेल याविषयीं कोणालाच शंका येणार नाहीं. परंतु हा त्यांचा चांगला हेतू मासिकास वाईट तऱ्हेनें भोंवला. मासिक पुस्तकास वर्गणीदार फार कमी आहेत हें आम्हांस कळलें असतां काय जी आम्ही खटपट केली असती, ती त्यांच्या या अशा वागण्यानें केली नाहीं. जर तें मासिक २५०–३०० वर्गणीदार बाळगून आहे तर लोकांकडे जा कशाला असें म्हणून स्वस्थ बसलों. या सर्व गोष्टींचा दोष ठाकुरांचे माथीं येतो असें निदान माझें म्हणणें आहे. तुमचें काय असेल तें असो. आज मनोरंजनाची स्थिती अशी आली खरी, कीं तें इतर लोकांपैकीं साऱ्या १००—१२५ लोकांना रंजवून, आम्हांस तर मुळींच रंजवत नाहीं. त्याला सुधारण्याविषयीं मला कांहीं विचार सुचले आहेत ते मीं आपलें पत्र आल्यावर कळवीन. आतांच कळविले असते परंतु पत्र फार वाढलें; त्यानें तुह्मांला (निदान आजारी आहां तेव्हां) खात्रीनेंच कंटाळा आला असेल. परंतु दोन महिने पत्र न पाठविल्याचा दोष पत्करिला तेव्हां कंटाळा आणल्याचाही दोष पत्करावयाचा असा निश्चय करून पत्र लिहिण्यास बसलों.

गेल्या महिन्यांतहि मीं बरेंच वाचलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. सरासरीनें १०—१२ तास वाचन पडलें हें पाहून तुह्मांला लिहिण्यास

मला फार आनंद होतो. ५ तास पी. ई. परीक्षेचे अभ्यासांत जातात. २॥—३ फ्रेंच वाचनांत जातात. २॥—३ तास एक दुसरी भाषा शिकण्यास आरंभ केला आहे ती शिकण्यांत जातात. १–१॥ तास इतर कांहीं वाचनांत जातो. ती नवीन भाषा कोणची हें मीं तुम्हांला एव्हांच कलवीत नाहीं. बरीच यायला लागली ह्मणजे मग सांगेन. तुमच्या इंग्रजचें कसें काय ? तुह्मीं लवकर लवकर अभ्यास करीत नाहीं हें ठीक नाहीं. लवकर अभ्यास करा. पहा, न शिकण्यानें तुह्मीं आपलें नुकसान करून घेत आहां. मीं गेल्या महिन्यांत Man and Wife [ नवरा बायको ] या नांवाचें अतिउत्कृष्ट नॉव्हेल वाचलें, तें तुह्मीं अवश्य वाचायला पाहिजे होतें. त्यांत इंग्लंड, स्कॅाटलंड, व आयर्लंड या तीन देशांमिळून जे लग्नसंबंधीं कायदे आहेत त्यांपासून होणारे दुष्परिणाम उत्तम रीतीनें दाखविले आहेत.

तुमची भावजय कांहीं एक शिकत नाहीं. ती सुशिक्षित न झाल्यास मजवर दोष येऊं नये अशाविषयीं मी यत्न करीत आहे. तुम्हीं एकदां चांगली कानउघाडणी कराल तर पहा. अनेक भाषा नकोत, पण स्वतःची भाषा देखील येऊं नये, व येत नसल्यास शिकण्याचीहि इच्छा असूं नये हें ठीक नव्हे. परंतु हें १९ वें शतक; यांत मतस्वातंत्र्य व इच्छास्वातंत्र्य फार; त्यास इलाज नाहीं. " आलीया भोगासी असावें सादर. "

आणखी कितीतरी विचार माझे डोक्यांत चालले आहेत! ते सर्व लिहावेत असें एक मन सांगतें; व दुसरें लागलीच " अरे, तुझी ताई एवढें पत्र वाचतां वाचतांच खात्रीनें कंटाळेल तर लिहूं नको " असें सांगतें. पहावें आतां कोण जिंकतें तें. दुसऱ्या मनानेंच जिंकली. तर आतां नाहींच आणखी कांहीं लिहीत. तुह्मी आहां आजारी, त्यांत तुह्मांला अतोनात कंटाळा आला, ह्मणजे उगीच बसेल माझ्या पत्राची शिसारी. आणि मग

अति तृष्णा न कर्तव्या चक्रं भ्रमति मस्तके

या श्लोकार्धाची करावी लागेल आठवण.

आपल्या प्रकृतीचें मान कसें आहे तें कळवा असें लिहिल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. लवकर लिहा बरें, करूं तर आतां पुरें ? झालें, ताई, झालें !

आपला सख्खा भाऊ
**हरी आपटे.**

१४

Poona,
Saturday, March 19, 87.

My dear Krishna,[1]

With this letter will be delivered to you a copy of Jane Austen's " Pride and Prejudice " a novel, the masterpeice of a girl not even 21 years old; a book of which any nation will be proud. I bought it for you. My copy, which you know was of the same library, but very beautifuly bound has been left at Baroda by Mr. Pandit who had taken it away. Yes, I shall try to send a copy of it together with one more copy of the novel borrowed from some of my friends in two or three days. How can yon have such books by return of post ? Books that are to be borrowed from others!

१ रा. रा. हरीभाऊंचें एक कॉलेजांतील मित्र व नेवासे येथील रहिवासी कृष्णराव विनायक वावळे.

का. का.

I had been to Mrs. Deshpande[1] twice or thrice and sent my aunt also. But unfortunately I failed to see her. Today I hear that she has gone to some of her relatives for marrisge and that she will be back after a week or so. I shall see her when she returns and ask her husband's address and let you know all the particulars. I ought to have written this to you sooner, but I deferred with the hope of seeing her soon. I hope you will not blame me for this. Do you often go to my sister's house ? Do you converse with her ? Oh ! the happiness of conversing with her or rather hearing her charming talk ! Her talk is so very charming; her observations so very acute, but hush, I won't talk much in this manner. Who knows ? Is not India an extremely unfortunate country ? When I heard that she was ill, do you know what thoughts rambled in my head ? Can you imagine rather what my precious head talked with itself ? I was morose for nearly 3 or 4 days. But mind, my dear friend, you are not to say all this to the happy couple. Yes, this is the only name by which I name the patient and industrious husband and the intelligent and persevering wife. But, why should I talk in this strain all the while, when you give no freedom to your tounge to speak what

१ वाबळे यांचीं वडील बहीण.

your experience is. You suggest in your card that I should expect a long letter tomorrow, and so I do. With what then shall I conclude this letter of mine if not with a request to pay my respects to my dear Tai, Mr, Govindrao and your parents. My best compliments to your brother the post-master, the Doctor, Mr. Gund and Bapusaheb Joshi.

Your dear friend,
Hari N. Apte.

---

१५

पुणे जुलै ३१ सन १८८७.

सा. वि. वि.

तात्यासाहेब, आपलीं पत्रें पावलीं. मी आपल्याकडून आतांशा नियमितपणें राहण्याविषयीं अतिशय काळजी घेत असतों. परंतु पुढील सायंत पत्र वाचलें ह्मणजे आपणांस या वेळेस दिरंगाई होण्याचीं कारणें काय हें तेव्हांच कळेल. तीं कारणें अशीं आहेत कीं एकदा टोपींवालाही आपला नियमितपणा त्यावेळीं सोडून देईल.

गेल्या महिन्यांत आमची एक तीन वर्षांची धाकटी बहीण वारली हें आपणांस कळलेंच आहे. ती वारली तें दिवशीं दोन प्रहरपर्यंत चांगली खेळत होती, आणि रात्रीं ११ बाजतां आटोपली. तीं कॉलऱ्यानें वारलीं नाहीं ही त्यांत विशेष आश्चर्याची गोष्ट! पुढें ८-१० दिवस गेलें नाहींत तोंच आमची आई माहेरी गेलीं असतां गेल्याच्या मागल्या मंगळवारीं रात्रीं १२ वाजल्यावर तेंथें दरोडा पडला. आमचा २-३ शें रु. चा विषय गेला. व आमच्या मामांच्या डोक्यावर कुऱ्हाड बसून धाव झाला आहे. मावस मामाचे सर्व दांत पडले आहेत. या दरोड्याची कच्ची हकीगत आमचें मामांनीं आपली सही घालून गेल्या रविवारच्या पुणें वैभवांत छापली आहे ती आपण वाचली असेल. कर्मधर्मसंयोगानें माझी बहीण तेथें नव्हती ह्मणून

बरें झालें; नाहीं तर दागिन्यांच्या पायीं ठार मेली असती. आईस कांहींही दुखापत झाली नाहीं. फक्त चोरट्यांनीं हातांतील पाटल्या व ( सोन्याच्या ) बांगड्या ओरबाडल्या त्यामुळें नखें लागलीं होतीं. बाकी कांहीं नाहीं. आजीस मात्र फार दुखापत झाली आहे. याविषयीं मीं आतां कांहींच जास्त लिहित नाहीं. चोरीचा पत्ता अजून कांहीं एक नाहीं.

मनोरंजन आणि निबंधचंद्रिकेचें अंक काल टपालांत टाकले ते आज पावतीलच. काल मागल्या व नवीन वर्गणीदारांकडे मिळून सुमारें ३४० अंक गेले. येवढ्या गोष्टींत पिच्छेस बसून त्यांतल्या त्यांत नियमितपणा साधला. टपालाशीं कॉन्ट्रॅक्ट करून आपणांस आतां फायदा नाहीं. जेव्हां २४ पृष्ठांचा अंक होता तेव्हां गोष्ट निराळी होती. कशी ती खुलासेवार पुढच्या पत्रीं कळवीन. अंक आपल्या मनाप्रमाणें निघाला आहे किंवा नाहीं? या अंकांत नवीन निबंधाला सुरवात कां केली याचें कारणहि पुढल्या पत्रींच कळवीन. तें पत्र आपणांस गुरुवारीं खास मिळेल. पुढील अंकांत पुढें लिहिल्याप्रमाणें विषय घालावे असें माझें मत आहे.

| | | |
|---|---|---|
| नवा निबंध पृष्ठें | १२ | आपलें मत कळवावें. परवशतेचें मॅटर पार संपलें आहे. तें व रंगरावाचें मॅटर तावडतोब पाठवून द्यावें. |
| स्त्रियांची परवशता | ८ | |
| रंगराव | ८ | |
| मस्तानी | ८ | |

मजला पुष्कळ सविस्तर लिहायचें आहे, तें पत्र वर लिहिलेल्या दिवशीं येईल.

ताईसाहेब, आपणांस पत्र आलें नाहीं याबद्दल माफी असावी. कारण वरील पत्रावरून समजेल. शिवाय हल्लीं आपण लेखनांत गुंतलां आहां; तेव्हां आपणांस विशेष त्रास देऊं नये असें वाटतें. गोपाळराव जोशी येथें आहेत; पण ते येथें असून नसून सारखेच आहेत. कारण ते गाठी भेटत नाहींत. आपली वहिनी माहेरीं आहे.

रा. वाबळे यांस हें पत्र दाखवावें व त्यांत " आपलें लांब पत्र येऊं द्या " असें सांगावें !

१६

पुणें आगस्ट २८-१८८७

ती. सौ. काशीताई कानिटकर यांस,

वडिलांचे सेवेशीं,

बालकें कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार वि० वि.

ताईसाहेब, जारीनें काम चालूं द्या. अगदीं कसूर करूं नका. पुस्तक तुह्मीं लिहिल्याप्रमाणें सध्यां तसेंच लहान करा. तें चांगलें खपतेसें झालें ह्मणजे मग तिचीं पत्रें. तोंपर्यंत तें कांहीं उपयोगीं नाहीं. आणि रमाबाई रानडे वगैरे मंडळी अमुक कां करीत नाहींत, तमुक कां करितात असे प्रश्न काढीत बसूं नका. मला वाटतें गॉइटेनेंच एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं,' एकाद्या अगदीं क्षुल्लक गोष्टींवर विनाकारण विचार करीत बसण्यापेक्षां ती गोष्ट करणें बरें.' हें त्या महाकवीचें ह्मणणें किती उपयोगी आहे? पण तें सतत ध्यानीं राहून त्या विषयीं विचार होईल तेव्हां खरा! रमाबाईसारख्या स्त्रिया कांहीं कां करीनात, आपल्यास काय त्याचें? कृष्णराव वावळ्यास तुह्मीं गुंतवला आहां ना? तो नियमितपणें काम करून घेईल. * गोपाळराव जोशी इथें असून नसून सारखें झालें आहे. कारण ते मुळींच भेटत नाहींत. ते जर भेटले तर त्यांना मी ही आनंदाची गोष्ट हटकून सांगेन, आणि नेवाशास जाण्याविषयीं आग्रह करीन. पण ते सध्यां मोठ्या ठिकाणीं आहेत. आणि मला असलीं मोठीं ठिकाणें ह्मटलीं ह्मणजे मोठा तिटकारा. कां नसावा? मनांत जर आणलें तर मिल, स्पेन्सर सारखे तत्ववेत्ते; जॉर्ज इलिअट, झोलासारखे कादंबरीकार; ग्रोट व थ्युसिडिडिस सारखे इतिहासकार; शेक्सपिअर, व्हिक्टर ह्यूगो सारखे कवि; डार्विन, टिंडॉल सारखे शास्त्रज्ञ; इतक्या सगळ्यांना आपण एकदम आपल्या लहानशा--मग ती अतिशय ओंगळ किंवा कशीही असो--खोलींत बोलावून आणून त्यांच्याशीं हवा तितका वेळ बोलतों; त्यांना नसता मान द्यावा लागत नाहीं. त्यांच्याशीं अदबीनें वागावयास नको. पालथे पाडा, ते

---

* गोपाळराव जोशी डा० आनंदीबाई जोशी यांचे पति होत. हे त्यावेळीं पुण्यास कै. रा. ब. विष्णु मोरेश्वर भिडे, कै. न्या. मू. रानडे या मंडळींत असत.

का. का.

कधीं रागावत नाहींत. त्यांच्या जवळ ज कांहीं आहे तें खुशाल घेऊं देतात. आतां तुम्ही जा, आमची कामाची वेळ झाली असें म्हणत नाहींत. तेव्हां अशांचा समागम हवा तेव्हां, हवा तसा घडवून आणण्याचें आपल्या हातांत असल्यावर, दुसऱ्या यःकश्चित पण समाजानें मोठ्या मानलेल्या गृहस्थाकडे जाऊन, कांहीं वेळ खालीं मान घालून, कांहीं वेळ उभे राहून, ते मूर्खाप्रमाणें बोलले असतां मनांत वाईट वाटूनही बळेंच ओंठ वांकडे करून हांसण्याच्या मिषानें दांत दिसले न दिसलेसे करून; आश्चर्योत्पादक गोष्ट नसतांही आश्चर्य दिसलेसें, दुःखोत्पादक नसतांही दुःख झालेंसें दाखवून होस हो करण्याचा तिटकारा कां येऊं नये ? जे खरे मोठे, ते ज्या विकाराच्या गोष्टी सांगतात ते विकार आपल्या मनांत उत्पन्न होतातच. मिष करावें लागतें तें खोट्या मोठ्यां जवळ. पॉल व्हर्जिनिया यांचें चरित्र वाचतांना आपल्याला रडण्याचें मिष करावें लागत नाहीं. मोलिअरचीं नाटकें वाचतांना हंसण्याचें मिष करावें लागत नाहीं. शेक्सपिअरचीं नाटकें वाचतांना 'वाहवा' असें तोंडांतून आपोआप बाहेर पडतें. डार्विननें 'मनुष्याची उत्पत्ति' म्हणून पुस्तक लिहिलें आहे तें चांगलें म्हणा असें म्हणावयास कोणी सोडगें घेउन येतो काय ? नाहीं तर घरोघरचे मोठे ! हे कोण ! हे रावबहादुर ! यांच्या बोलण्यावर कांहीं बोलूं नका ! होस हो द्या ! किती झालें तरी मोठे ते ! हे कोण ? हे C. I. E ! हे आले म्हणजे उभे रहा व यांस मानपत्र द्या ! मानपत्रें द्या कीं फानपत्रें द्या, तो दिवस गेला, कीं यांच्या मोठेपणाची इतिश्री झालीच. ज्यांना खरोखर मोठेपणा नको त्यांनीं हाच मिळवून सुखी व्हावें. जर मीं काय म्हणतों हें खरें असेल तर मग रमाबाई रानड्यांनीं सौ० डॉ० आनंदीबाईस मानपत्र दिलें नाहीं म्हणून वाईट कां वाटावें ? त्यांच्या त्या क्षणिक मानपत्रानें आनंदीबाईचा बिचारीचा मोठेपणा काय वाढला असता ? त्यांचा मोठेपणा खरा होता व आहेही. लोकांनीं न मानला म्हणून काय झालें ? शेक्सपियर, गॉइटे, श्लेजेल, मोलिअर, कालिदास, भवभूति, यांचा मोठेपणा काय नुसता तुमच्या आमच्या मानपत्रांत आहे ? गुलाब तो गुलाब ! त्यास तें नांव द्या अगर नका देऊं; तो तुम्हांला काय विचारावयास

३८३०

येतो आहे ? पण पुरे आतां हे. मीं किनई आतांशा फारसा व्राहायला लागलों आहे. हें चांगलें नव्हे.

* मनोरंजनाचा १३ वा अंक पोंचून आज तुमचें पत्र येईल असें मला वाटलें होतें. पण तसें झालें नाहीं. कां बरें ? अंक कसा काय आहे ? त्यांत तुमच्या सांगण्याप्रमाणें "बाजीरावा" स सुरवात केली आहे. आनंदीबाईचें छोटेसें चरित्र आलें आहे. मुंबईहून मॅटर २० तारखेस आलें. मी १५ तारखेपर्यंत वाट पाहिली आणि मग थोडें थोडें छापण्यास सुरुवात केली. पहिले दिवशीं चरित्र व संयोग मिळून १ फॉर्म दिला. १६ वी तारीख उलटली. परवशतेचें मॅटर मुंबईस; प्रहसन मुंबईस; बाजीराव मुंबईस. आतां घालावें तरी काय असा प्रश्न उपस्थित झाला. १७ वी तारीख जाऊं दिली. १८ वीला बाजीराव दिला. १९ वीला निबंध दिला. निबंध देण्याचें माझ्या मनांत मुळींच नव्हतें. परंतु मुंबईहून मॅटर केव्हां येतें याचा नेम नाहीं. तेव्हां करावें कसें ? २० वी तशीच जाऊं दिली. २१ ला मुंबईचा मजकूर आला. मग गणपतराव, परवशता दिली. मुंबईहून आलेला परवशतेचा मजकूर व तात्यांनीं येथून दिलेला मजकूर मिळून छापील ४ पानें झालेलीं जेव्हां पाहिलीं, तेव्हां आपण निबंध दिला हा शहाणपणा केला असें मला वाटलें. कारण आपल्याकडे पत्र लिहून परवशतेचा मजकूर आणखी आणण्याइतका वेळ सांपडला नसता. अशी एकंदर अंकाची व्यवस्था झाली आहे. एकंदर ३०० वर अंक पोस्ट केले आहेत. पहावें किती परत येतात ते ! बरें तुह्मीं भावी वर्गणीदारांची यादी केली आहे तिचे पत्ते कसे समजावे ? ते कळण्याची आह्मी खटपट करीत आहों. नाहींतर तुमचेकडे पाठवून देऊं. व्यवस्थेच्या संबंधानें होतां होई तों नियमितपणा राखतों व वेळच्यावेळीं काम करतों असें नव्या व्यवस्थापकांचें निक्षून ह्मणणें आहे. याबद्दल आपण अगदीं काळजी करूं नये असें ते ह्मणतात. आणखी काय ह्मणतील ? आपण थोडेंसें तात्यांच्या ह्मणण्याप्रमाणें "धाडस" तर केलें

* मनोरंजनाची व्यवस्था पुण्यास हरिभाऊंच्या देखरेखीखाली आली त्यासंबंधी लेख.

आहे खरें; पाहूं आतां काय होतें तें. बरें, आतां पुढल्या अंकाचें मॅटर परवशतेचें आणि रंगरावाचें लवकर पाठवून द्या. परवांपासून छापण्यास सुरवात झाली पाहिजे व होणार.

आपली वहिनी थोडीशी आजारीं असते; यामुळें आज जवळजवळ तीन वार झाले माहेरींच आहे. केव्हां येईल तें कळत नाहीं. काळजी करण्याजोगी आजारी नाहीं हो! नाहीं तर उगाच काळजी करीत बसाल. चि. माधवराव खुशाल आहे. त्यास १२ अंक दिले. मीं जेव्हां जेव्हां तिथें जातो तेव्हां तेव्हां आपल्यास त्याचा समाचार कळवीन. काळजी करूं नये. हो, बरी आठवण झाली. मला एकदां तुह्मी असें सांगा कीं 'कानिटकर आणि मंडळीत*' समावेश कोणाकोणाचा आणि कशाकशाचा तरी होतो? परवां इथें अशी एक गोष्ट झाली कीं परांजपे मंडळीनीं श्री. नारायणरावांच्या मृत्यूचा 'फार्स' केला, तेव्हां सुमेरसिंगाचा भाग अतिशय उत्तम झाला ( असें ह्मणतात, मीं स्वतः गेलों नव्हतों ) हा भाग चांगला झाला असें पाहून खूष झालेल्या "कानिटकर आणि मंडळीनें" तो भाग करणारास एक ३५ रु. चें घड्याळ सर्व मंडळीदेखत बक्षीस दिलें. येथपर्यंत झालें तें ठीक

---

माझा वडील मुलगा त्यावेळीं पुण्यास घरीं होता व हैस्कूलांत जात होता.

*मनोरंजन काढलें तेव्हां कानिटकर आणि मंडळी असें आह्मीं नांव धारण केलें. आह्मीं दोघे व कै. रा. ना. बा. का व हरिभाऊ, कै. दामुअण्णा कुळकर्णी, रा. गंगाधर अनंत ठाकूर अशी मंडळी होती. आमचा बेत एक स्वताचा छापखाना काढून प्रकाशकाचें काम करावें असें होतें. व प्रथम मनोरंजन काढून तें कसें काय चालतें हें बघण्याचें ठरवलें.

त्याप्रमाणें कामास सुरुवात झाली. मनोरंजनाचा खर्च प्रथम आह्मी व कै. नानासाहेब कानिटकर ( ना. बा. का. ) यांनीं करण्याचा ठरला. पण त्यांच्याकडून बोलाशिवाय कशाचीच प्राप्ति झाली नाहीं !! तो खर्च तीन चार वर्षे आह्मांलाच करावा लागला ! रा. ठाकूरांची पत नसतांही त्यांनींही कांहीं मोठी रकम खर्चली. पण आह्मास ती गोष्ट मासिक बंद पडेपर्यंत कळविली नाहीं. मागून सहज बोलण्यांत समजली. रकम आह्मीच घातली पण उत्पन्न कांहीं झाले नाहीं !!

का. का.

झालें. कोणास नांव ठेवण्यास जागा नाहीं. पण हें घज्याळ खरोखर दिलें नसून धंदेवाल्या मंडळीप्रमाणें हलकटपणा केला असल्यास ' कानिटकर आणि मंडळी ' या नांवास लांछन आहे कीं भूषण आहे? मीं ही गोष्ट ऐकल्यापासून माझ्या अंगाचा अगदीं संताप झाला आहे. जर ' कानिटकर आणि मंडळी ' अशा हलकटपणांत शिरत असेल, तर ती मंडळी स्थापणारांस व तींत शिरणारांस दोघांसही लांछन आहे. जर या नांवाचा असा हवा त्या ठिकाणीं हवा त्यानें उपयोग करावयाचा असेल तर ती मंडळी नसलेली चालेल. अशा हलकटपणांत पडणें लज्जेचें नाहीं काय? पण आतां लिहून काय उपयोगी? जें झालें तें झालें!

तुह्मीं आतां सत्कृत्यांत गुंतलां आहां तें पुरें होऊन माझ्या दृष्टीस केव्हां पडेल असें झालें आहे. तोंपर्यंत मीं मला पत्रें लिहा असा आग्रह करीत नाहीं. आल्यास फारच उत्तम; पण माझा आग्रह नाहीं. तुह्मी रिकाम्या किंवा कांहीं क्षुल्लक गृहकृत्यांत गुंतलां असतात, तर गोष्ट निराळी. आणखी मीही मोठें पत्र लिहून तुमचा अमोल वेळ घेत नाहीं; झालें एवढें पुरें.

आपला भाऊ

हरी

सा. व. से. कृ. सा. न. वि. वि.

तात्यासाहेब, वर लिहिलें आहे त्यावरून सर्व समजेल. सजकूर लवकर व ८ पानांस पुरेल इतका तरी पाठवा; आणि ताईसाहेबांचें काम जितकें निर्विघ्न होईल तितकें पहा. तुह्मीं त्यांना जॉर्ज् इलियट ह्मणतांच. तेव्हां लुईसप्रमाणें त्यांच्याविषयीं अत्यंत काळजी बाळगा ह्मणजे झालें! ती काळजी तो किती व कशी बाळगीत असे हें माझ्यापक्षां तुह्मांला ज्यास्त ठाऊक आहे. फक्त त्याप्रमाणें करण्याचा यत्न असावा. इतर नवल विशेष काय सांगूं?

आपला

हरी

## १७

पुणें, डेक्कन कॉलेज

शनिवार, ऑक्टोबर ता. ९, १८८७

ताई, सर्वस्वीं चुकलों यांत काय तें समजून घ्या ह्मणजे झालें. आणखी जितका ह्मणून राग आला असेल, जितक्या ह्मणून उत्सुकता भंग झाल्या असतील, तितक्या सर्व गोष्टींबद्दल माफी करा ह्मणजे झालें. आणखी कांहीं ह्मणणें नाहीं. मला हल्लीं वेळ होत नाहीं ह्मणेन तर तें सर्वांशीं खरें नाहीं; पण दोन तीन कारणांचें संमेलन झालें कीं अशीच कांहीं विलक्षण गोष्ट घडून येते, त्याला नाइलाज आहे. तुह्मीं आणखी रावसाहेबांनीं एका पत्रांत असें लिहिलें होतें कीं, मला कांहीं गोष्टीबद्दल राग आला असावा. पण असें आतां कधींही लिहित जाऊं नका. कारण असा समज करून घेण्याचें ( मग लिहिण्याची गोष्टच निराळीं ) दिवस यापूर्वींच कधीं गेलें असें निदान माझें तरी मत आहे. नाहीं ना पुनः असें लिहिणार? पत्र पाठविलें नाहीं, ह्मणें त्यांच्या मनांत आपल्या विषयीं कांहीं तरी वावगेंच आलें असेल! हें काय हे! तुमच्या दोघां विषयीं वावगें, आणि माझ्या मनांत! मला या तीन गोष्टींची एकवाक्यता माझ्या स्वप्नांतहि व्हावयाची नाहीं. तर असें कधींच लिहूं नका. मला त्यापासून फार वाईट वाटेल. हें पहा ताई, मीं पत्र न लिहूं द्या, निरोप न पाठवूं द्या. परंतु आपणाला मीं विसरलों, अगर आपल्याविषयीं फार राग आला असें बिलकूल समजूं नका. मिस् तोरु दत्तानें " फ्रेंच शेतांत तोडलेलें एक कणीस " ह्मणून एक पुस्तक लिहिलें आहे तें आपल्या आईला अर्पण केलें आहे. तें अर्पण करतांना तिनें एका फ्रेंच कवीचा एक उतारा घेतला आहे. तो उतारा कोणच्या अर्थाचा आहे हें मीं आपल्याला सांगणें; आणखी माझें मन आपल्याविषयीं कसें आहे हें सांगणें या दोन्ही गोष्टीं एकच आहेत. तेव्हां त्याचा भावार्थ इथें सांगतों ह्मणजे झालें.

" सरोवराचें पाणी सदाच शांत आणि स्वच्छ असतें असें नाहीं. केव्हां एकादा वाटसरू सहज जातां जातां, अगर एकादें टारगें पोर एकादा

मोठा धोंडा घेऊन त्यांत झोंकून देतें. हा धोंडा आंत पडला ह्मणजे पाण्याची शांतता मोडून जाते. तळचा गाळ वर येऊन त्यानें स्वच्छता बिघडते. अशी कांहीं त्या सरोवराची वाईट स्थिती होते; आणि पूर्वी जी आकाशाची सुंदर नीलकान्ति त्या सरोवरांत प्रतिबिंबित होत होती ती दिसेनाशी होते. पण ही स्थिति फार वेळ टिकते काय ? छे छे! क्षणैक टिकत असेल. क्षण गेला कीं लागलीच तें पाणी प्रशांत गंभीर होऊन त्यांत पुनः पहिल्याप्रमाणें नभोमंडळाची शोभा प्रतिबिंबित होते. याचप्रमाणें मीं हल्लीं ज्या स्थितींत आहे, त्या स्थितींतील न आवडणाऱ्या गोष्टी, जगांतील अतितापद दुःखें, काळज्या, आशाभंग वगैरे गोष्टींनीं आपल्या प्रभावानें क्षणैक माझ्या उदात्त विचारांची, प्रशांत मनाची स्वच्छता बिघडविली ह्मणजे तेवढ्यापुरती तुझी मूर्ती दृष्टीआड होते. परंतु तेवढा तो क्षण गेला कीं मनाचें स्वास्थ्य आणि त्या बरोबर तुझी उदार रमणीय मूर्ति पुनरपि आपल्या स्थानीं येते. ”

हा उतारा मिस् तोरु दत्त इनें आपल्या मातेस उद्देशून लिहिला. आणि तो मला अर्थात् मातेसमान अशा वडील बहिणीस उद्देशून मी लिहित आहे. अंतर काडीचेंही नाहीं. आणि अगदीं अंतःकरणापासून असें लिहिल्यावर इतके दिवस पत्र लिहिलें नाहीं वगैरे यःकश्चित् गोष्टीबद्दल माझी ताई माझ्यावर रागावणार नाहीं व पत्र पावतांच सुखपत्र लिहील असें समजण्यास मला आधार नाहीं काय ?

बरें, पण ताई, चरित्र कोठपर्यंत आलें आहे? उद्यांच्या केसरींत जाहिरात येणार हो! तुमचें झालें ह्मणजे वचनाप्रमाणें मला बघायला द्यालच. झालेले भाग तुमचें मतानें कसे झाले आहेत? काम नीट जपून करा बरें! पण ताई, कांहीं ह्मणा, “ सौ. आनंदीबाईचें स्मारक ” हें नांव कांहीं मला आवडलें नाहीं. हें कसलें असलें नांव बुआ! तुह्मींच कां नांव काढलेंत हें शोधून? मनांतून बदलायचें होतें; पण ह्मटलें नको, तुमच्या व रावसाहेबांच्या संमतीवांचून तसें करूं नये. विविधज्ञानविस्तारांतील त्रोटक चरित्र वाचलें कां? कोण गचाळ लिहिणारा होता कोणास ठाऊक? मला वाटलें त्यांत लिहिणाऱ्याच्या मनांत “ श्रीसमर्थ आणि त्यांचा सांप्रदाय ” या विषयावर लिहायचें होतें;

तें त्यानें आनंदीबाईच्या चरित्रांतच घुसडून दिलें. नाहीं. पण असें नाहीं. ती गोष्ट अशी झाली. ज्यावेळीं आनंदीबाईचें चरित्र लिहावें असें त्याच्या मनांत आलें तेव्हां तो दासबोध वाचीत असावा. तो इतका कीं, त्याच्या डोक्यांतील प्रत्येक कानाकोपरा, चीर फट ही दासबोध व समर्थ यांनीं ओतप्रोत भरुन गेली होती, आणि आनंदीबाईचें चरित्र लिहावयास बसला तेव्हां तें त्याला सांपडेचना. तें बिचारें एवढेंसेंसें, दासबोधानें आणि समर्थानें टाकलें दडपून. तें काढायला गेला कीं आलाच दासबोध. अशी कांहीं त्याची त्रेधा झाली. मग काय करील बिचारा! काढलान् दासबोधाला अन् ओतलान् कागदावर. तेव्हां त्याला एकदां तें कोपऱ्यांत दडपलेलें चरित्र सांपडलें. नको हो नको, अशी स्थिती माझ्यावर कधींहीं येऊं नये. काय असंबद्ध लेख तो! मला वाटतें ही असंबद्धता विविधज्ञानविस्तारांत बरीच आहे. तुह्मांला दुसरें एक पांच अंकांतील उदाहरण देऊं कां? वाग्विहार नांवाच्या पुस्तकावर टीका आहे ती पहा. त्यांत पुस्तककारास औचित्यविचार नाहीं ह्मणून दोष दाखविला आहे. तेथें निर्णयसागरांतील "काव्यमालें" तील दोन ग्रंथ आपल्यास कां आवडलें तें टीकाकारानें सांगितलें आहे. मला तर वाटलें कीं, हा आतांपर्यंत वाचलेल्या पुस्तकांचा कॅटलॉग व तीं वाचल्याचीं कारणें देतों कीं काय कोणाला ठाऊक? त्या दोन पुस्तकांविषयीं लिहितांना टीकाकारानें कोणता औचित्यविचार केला कोणास कळे! टीकाकारांना औचित्यविचार फार असें तेथें मात्र एकदां फार उत्तम तऱ्हेनें कळून येतें. तें कुठें असें विचारतां? ऐका तर. "काळबादेवीच्या कोपऱ्यावरील चांभाराचा" दृष्टांत घेतला आहे. तेथें ही उपमा घेतांना मात्र टीकाकारांनीं "औचित्यविचार चर्चा" हें क्षेमेंद्रस्वामीचें पुस्तक पूर्णपणें अधीत केल्याची सफलता दाखविली! उपमा अत्यंत उचित! पण मी हा विविधविस्तारावर कोणीकडे घसरलों! मला देखील औचित्यविचार नाहींसा कसा झाला? पण झाला तरी हरकत नाहीं, वरील टीकाकारांच्या शिफारशीचा फायदा घेऊन "औचित्यविचार" पुस्तकाचा अभ्यास करीन ह्मणजे झालें!

तिसऱ्या अंकांत माझ्या निबंधाचीं सारीं चार पानें! कां ठाऊक आहे कां? " Principles of Sociology " नांवाचें एक पुस्तक पहावयास पाहिजे होतें ह्मणून. या नव्या निबंधानें मला छळलें, पण नव्या गोष्टीही फार शिकवल्या. कांहीं नाहीं तरी दहाबारा बोजड ग्रंथ पहावे लागले. एकंदर निबंध ४० पृष्ठें होईल असा माझा अजमास आहे. पैकीं १८ छापलींच. उरलेलीं २०-२२ मीं येत्या अंकांत देत नाहींच. नोव्हेंबरच्या अंकांत १२ देईन असें ह्मणतों. आतां त्या गोष्टी निघाल्या आहेत तर आपल्या मासिकाविषयींच पाहूं या. पुढच्या अंकांत विषयः— [ १ ] रंगराव पृष्ठें ८; [ २ ] मस्तानी ८; [ ३ ] परवशता १६; [ ४ ] मनोरंजन ४. मला या पहिल्याला माफ करा. रावसाहेबांना सांगा कीं हें पत्र पाहतांच कुलकर्णी यांजकडे मॅटर रवाना करा. पुढच्या अंकांत त्यांना विश्रांति मिळेल. पण या अंकांत त्यांनीं १६ पृष्ठें निदान १२ व तुह्मी ८ अशीं पाठवाच. हो, रावसाहेबांना ह्मणावें अपुरेंत मटर पाठवूं नका. थोडेसें इथें शिल्लक राहिलें तरी पत्करलें. गेल्या अंकीं फजिती झाली. १३ ओळी कमी पडल्या; मोठी पंचाईत पडली. मंडळी मला त्या १३ ओळी भाषांतर करून याव्या असें ह्मणाली. परंतु दुसऱ्याच्या कृतींत हात घालूं नये असा माझा पक्का ग्रह आहे! त्यांतून हीं कृति जड व रावसाहेबांची, तेव्हां ओळींत जागा टाकून पान भरून घेतलें. पहा तें शेवटलें पान किती विरळ व किती विसंगत दिसतें तें! आतां मजकूर पाठविण्याची गर्दी करा. आज तारीख ९; मजकूर पाठवाल तो माझ्या नांवानें पाठवूं नका. मीं गांवांत नाहीं आणि केव्हां जाईन याचा नेम नाहीं.

कृष्णा वाबळे नेवाशास आला कां? त्याला दिखील मला पत्र लिहायचें आहे, पण काय करूं आतां? कांहीं बोलायची सोय नाहीं असें झालें आहे. रावसाहेब एका पत्रांत लिहितात, " मनोरंजन " हीं अक्षरें जाडी लिहून निबंधचंद्रिका हीं त्याच्याखालीं बारीक लिहावीं. कां बरें? त्यांत कमीजास्तपणा कां काढला? ज्या मनुष्याचें स्मारक ह्मणून नि. चं. काढली होती, त्याबद्दल अत्यंत पूज्यबुद्धि माझें मनांत वसत आहे. व ती काढा-

यच्या वेळीं पुरस्कर्त्यांपैकींच मीं एक होतों. कर्मधर्मसंयोगानें तिचें भिन्न जीवित नाहींसें झालें ह्मणून तिचें महत्व कमी दाखवावें असें मी कधींही ह्मणणार नाहीं, व तसें होण्यास कारण जी गोष्ट होईल ती करण्याबद्दल मी कधींही अनुमोदन देणार नाहीं. मग रावसाहेब कांहींही ह्मणोत. दोहोंचे महत्व व समत्व Behold in these ............ या आपल्या इंग्रजी ओळींनीं तर पहिल्यापेक्षां जास्त खुलतें. व त्या ओळींतील " These amusements " आणि " True knowledge " हे तीन शब्द विशेष सार्थ होतात. * असो.

आतां आणखी काय बरं लिहूं ? आतां नको. टपालाची अगदीं वेळच झाली तेव्हां पुरें करतों. पण एक विनंति करून--नाहीं केलेंच पाहिजे असं ह्मणून—मग पुरें करतों. करायचं एवढंच. उद्यां हें पत्र पोंचेल याचें उत्तर लागलीच आणि मोठें असें गुरुवारीं तरी मला पोंचूं द्या. मीं अगदीं डोळ्यांत तेल घालून त्या दिवसाची वाट पहात बसतों. जर आशाभंग झाला तर पहा. करूं ना मग आतां पुरें ? करतोंच आतां. अति कोणतेंही करूं नये.

आपला भाऊ

हरी

माझा पत्ता कॉलेजचा लिहा.

---

* मनोरंजनांत निबंध चंद्रिका सामील केली. नंतर त्यांना वाटलें कीं ' मनोरंजन ' मुख्य ह्मणून तें नांव मोठ्या टैपांत छापून निबंधचंद्रिका बारीक टैपांत घालावी. हें पुस्तक ( मासीक ) लेखक व पैसा या दोहोंची वाण झाल्यामुळें मनोरंजनांत सामील करावें लागलें. तें कै० विष्णुशास्त्री चिपळुणकरांच्या स्मरणार्थ कांहीं मंडळींनीं काढलें होतें.

का. का,

१८

श्री

पुणे जोगेश्वरीचा बोळ
बुधवार २५ जाने० १८८८

वडिलांचे सेवेशीं,

सा. न. वि. वि. गेल्या गुरुवारीं पाठविलेलें इंग्रजी पत्र पोंचलेंच असेल. त्याचें अगर वाबळे यांस पाठविलेल्या कार्डाचें उत्तर येईल असें वाटलें होतें. पण आपण सध्यां फार व्याप्त असाल असें दिसतें. कारण दीर जावा वगैरे मंडळी व सासूबाईही कधीं नव्हे त्या आल्या आहेत; तेव्हां

विभवगुरुभिःकृत्यैः स्वस्य प्रतिक्षणमाकुला ।

अशी स्थिति झाली आहे यांत नवल नाहीं. अशीच सदोदित असावी. मीं हल्लीं थोडाबहुत अभ्यास व लेखन वाचन करीत असतों. जारीनें असें होत नाहीं. कॅटलागचें काम संपत आलें आहे. तें संपलें म्हणजे मग जरा वेळ मिळेल. आपल्या भावजयीसही फुरसत होत नाहीं. आपलें चरित्र कुठपर्यंत आलें तें आपण लिहिलें नाहीं. पूर्ण झालेला भाग मजकडे पाठविण्याची सोय असल्यास पाठवून द्यावा. माझ्या मनांतून तो वाचावयास मिळावा असें फार आहे. आपणांकडून आलेल्या इंग्रजी पत्रावरून इंग्रजीचा अभ्यास बराच जारीनें चालला असून प्रतिक्षणीं ज्ञानाची वृद्धि होत आहे असें दिसतें.

मनो. चा सगळा अंक तयार झाला म्हणजे आपलेकडे येईल. त्यांत नानासाहेबांनीं राष्ट्रीय सभेच्या हकीगतीवर निबंध लिहिला आहे. माझें प्रहसन पूर्ण झालें आहे व मनोरंजनाचीं दोन पृष्ठें आहेत.

गंगाधरपंत ठाकुरांचें पत्र आलें होतें. त्याचें उत्तर पाठविणें तें मजकडून अद्याप झालें नाहीं. लवकरच पाठवीन. त्यांनीं ही कादंबरी लिहून आपलेकडे पाठविली आहे ती ही मला वाचायची इच्छा आहे. वाबळे यांस आमचे नमस्कार सांगावे. व त्यांनीं मजला कबूल केलेलीं पुस्तकें होईल तितकीं लवकर पाठवून द्यावीं. त्याचप्रमाणें आपल्यास विचारलेलीं पुस्तकें

असल्यास पाठवून द्यावीं, त्यांचा यावेळीं मला फार उपयोग होणार आहे. पण मीं आतां पुरें करतों. आपल्याला तरी वाचायला वेळ कुठें आहे?

आपला

मजकुरातोंत, Irritating, व लबाड भाऊ

**ह. ना. आपटे.**

सर्व हकिकतीचें मोठें पत्र पाठवावयाचें तें एव्हां नाहीं. थोडे दिवसांनीं पाठवीन.

---

१९

श्री

पुणे ता. ११ एप्रिल १८८८

वडिलांचें सेवेशीं,

सा. न. विज्ञापना वि.

ताईसाहेब, आतां रुसवा कमी होईल कां? ह्मटलें फार दिवस पत्र न पाठविल्यानें जो रुसवा झाला असेल तो अशा उपायानें तरी घालवावा. हो! बहिणीचा रुसवा तो! तो असा तसा थोडाच आहे! पण ताई, खरेंच सांगा, एक माझ्याकडून पत्रें नाहीं गेलीं ह्मणून तुह्मी सुद्धां लिहूं नये का? वडिलांनीं धाकदपटशावर रुसून बसायचें ही कोणत्या मुलुखाची चाल असेल ती असो! धाकट्याच्या हातून लाखों चुका होत असतील ह्मणून वडील माणसें जर त्यांच्यावर क्षणोक्षणीं रुसूं लागलीं तर समाधानाची वेळ त्यांना कधीं सांपडायची नाहीं. आमच्या हातून चुका घडायच्या नाहींत असा क्षण जायचा नाहीं. पण लोक हंसतील कोणाला तें मीं लहानानें काय सांगायचें आहे?

बरें ताईसाहेब, मीं एवढी रुसव्याच्या मानाची चार दिवस ४-४, ५-५ तास बसून जी भेट तयार केली, ती कांहीं तरी आपल्या मनास येतें आहे कां? आपलें " आपलें तें चांगलें " अशा न्यायानें नका हो ह्मणूं! खरें खरें काय वाटतें तें लिहा. आधीं पण असें करा. गोष्ट एका बैठकीला वाचा. वाचल्याबरोबर आपलें मत कळवा. शनिवारीं

पत्राची वाट पहात बसतों बरें मीं! पहा चुकाल हो! बरी आठवण झाली. ताईसाहेब, हा मीं आपला वांटा उचलला. आतां पुनः अंक काढायची वेळ आली म्हणजे तुम्हांला लिहिली पाहिजे हो गोष्ट! गरीब बिचारी राधाबाई कशी काय तुम्हांला वाटतें? बायकाकडे बायका पाठविल्या म्हणजे बरें. म्हणून आपला राग घालवायला तिला पाठविलें. काय करावें, शेवटीं कायगांवच्या आसपासचें व प्रवरा नदीचें वर्णन देण्याचा माझा फार विचार, पण आधींच अंदाजापेक्षां ४ पानें वाढलीं—मला कित्ती कित्ती तरी लिहायचें आहे—पण माझ्या मनांत आत्तां जें भरतें आलें आहे तें लिहूंच देत नाहीं: नाहींच तर मग आतां लिहीत—पण ताई, रुसवा गेलाना बरं या कशाबशा भेटीनं? 'गेला,' अशीं तुमच्या हातचीं अक्षरं जेव्हां माझ्या दृष्टीस पडतलि, तेव्हां खरं. हा अंक घेऊन तुम्ही दोघं बसलां आहां, कृष्णरावही बसला आहे; आणखी तुम्ही आपल्या कोमल आवाजानें राधाबाईचे ते पहिलेच शब्द वाचतां आहां, आणखी कदाचित जवळ मुलेंही आहेत. असें सारें माझें डोळ्यापुढें दिसत आहे. काय सांगूं. तुमच्या त्या मूर्ति कशा प्रत्यक्ष दिसताहेत आणि आवाज तर मी ऐकतोंच आहे यांत शंका नाहीं.

बसाल त्या पुस्तक संपल्याखेरिज उठूं नका आं? माझी आपली कशी बशी गोष्ट आहे; हिनें ४ घटका तरी रुसवा टाका म्हणजे झालं.

हो, वर्गणीदारांचे अंक पोंचल्याबरोबर वांटा बरें कां. या गोष्टीची एक गोष्ट आहे ती मी तुम्हांला लिहिणार होतों, पण माझ्यानें आज लिहावतच नाहीं त्याला काय करूं? तुमच्या अभिप्रायाबद्दल मला मोठी उत्सुकता झाली आहे कारण ही * गोष्ट केवळ तुमचा रुसवा घालवण्याकरतां लिहिली आहे. तिचा उपयोग मात्र असा करून घेतला. कृष्णराव काय म्हणतो तेंही कळवा.

आपला धाकटा व अन्यायी

भाऊ

**हरी आपटे**

रावसाहेब, आपलें मत लिहा हो!

---

* "खरी कीं खोटी?" या नांवाची गोष्ट लिहून, 'मनो.'च्या वर्गणीदारांना पाडव्याची भेट दिली. का. का.

२०

Poona 120 Jogeshwari Lane.
Wednesday 10 P. M.
July 1888

Dearest Tai,

On this pretty little table of mine there are four things; pen, ink, and paper on one side, and a very beautiful volume on the other. I am sitting on this newly bought chair with my hands clasped and the candle is burning brilliantly. I am perplexed, utterly lost in thought. Things on both the sides of the table are equally tempting and equally important. Now guess, dearest sister, to which side my hand will go; to the side of the book or of the pen? Which has the greater attraction? Reading the life of Victor Hugo, the greatest man after Shakespeare as Mr. Swinburne says, or writing a letter to the dearest of sisters as I call you? My mind balances between these two things. I give it a toss and it leans more to the right side, which has pen, ink and paper. Dear sister, it is you who have attracted my mind from that engaging volume. I begin to write.

You must have received my card written on last Wednesday as usual. I have made it a vow to write to you every week, and as far as possible to

write long letters. I am glad to say I have been able to keep up my determination till now. But joy is never unmixed as they say. My joy containing some sorrow arising from the fact that you have not written to me during the last week more than a paltry card. What of your life of Dr. Anandibai? Don't yot see we must make haste now ? But why should I write to you so ? I know you must be engaged — thoroughly engaged-now in making arrangements to give comfort to your guest and cousin Dajisaheb. But would it be a great fault if I drop in a word to say that the duties of a biogarpher must not give place to the duties of a hostess ? Here is in front of me the bust (photo) of the dear departed Dr. staring at me, and as it were asking me why this life is not yet coming out; by the side of Dr. Anandibai Joshi is the bust of my favourite poet Victor Hugo. Is he frowning at me for leaving the dear work of reading his life and writing to you ? No, it cannot be. So then dearest sister, make haste. You know how great a stress was always given by the "dear" Dr. and George Eliot on the sublime word duty. Don't you think the writing of the life your "duty" ? You ought to think so, if you do not already. But why do I indulge in such a foolish thought ?

You must have seen the latest number of Kesari. An advertisement announcing the periodical reappearance of Natya Katharnava,* is given a very prominent place therein. Have you not said at the sight of the advertisement to yourself, "Ah dear me, now is the time for us to struggle, and to struggle most strenuously ? " Ah ! you must have, you energetic sister ! I can bring before my mental eye that lively face of yours, rendered more than ever lively and brilliant at the thought of having to struggle with such a noble rival.

As settled here I inquired whether any respectable press was ready to print 40 pages (the fly leaves excepted) for forty rupees. But no press is ready to do so. On the other side I thought it quite necessary to increase the number of pages by 4 at least; and I have succeed in making the arrangements. I have asked tne proprietor of the Jagadhitechu to buy the right of my श्रुतकीर्ति; and instead of giving me any remuneration should print four pages more for one whole year. He agreed and the thing is settled. Oh, I made a mistake in what I write above. The

---

* कै. रा. रा. शंकर मोरो रानडे हे वरील नावाचें मासीक काढीत असत पण तें मासीक वेळेंवर निघण्याची नेहमीच अडचण असें. मासकि फारच सुंदर होतें. व शेकस्पिअरच्या नाटकांची भाषांतरे वगैरे फार चांगली असत किंगलिअरचें भाषांतर प्रथम नाट्य कथार्णवांतच प्रसिद्ध झालें. का. का.





कानिटकर पतिपत्नी

बालोद्यान प्रेस, पुणें.

right is not sold, but I have given him permission to print and sell one edition of the play-an edition of only 3000. Is it not a good arrangement ? Your approbation (real) will give me great satisfaction. Mind, we are to struggle for existence now. In the next number I intend to give 8 pages from Hernavi (a naw Tragedy); 8 pages from one of Molier's comedies; 12 pages from a new novel; & 12 from some article. Now you will ask me why I intend to begin to publish a new novel instead of devoting more pages to the already begun ones. I shall tell you why I intend to do it for the convenience of the new subscribers. If a man wishes to be a subscriber from the third year say, he is obliged to pay us Rs.6 which thing scares him away. He is not able to pay Rs. 6 and consequently he pays nothing. But if promised to be given in one year two complete plays and one short story (occupying 100 pages of our magazine), new subscribers will not be scared away. How do you think? Let me know soon. In every letter of mine I have asked you to write something about the future arrangements of our magazine. Why do you not write ? Has dear Raosaheb made it a vow not to drop a single line to me? it seems so. . . . . . (अपूर्ण)

---

## २१

मंगळवार, जुलै ३१—१८८८

वडिलांचे सेवेसी,

बालकाचें सा. न. विज्ञापना विशेष,

ताईसाहेब, आपण ' सबबी नकोच ' ह्मणतां तेव्हां सांगत नाहीं. बाकी गेल्या १०--१२ दिवसांत निव्वळ कामामुळें मला लिहिण्यास झालें नाहीं. आपल्याला, वडिलांना दर बुधवारीं पत्र ल्याह्यायचें असा मीं पक्का नियम केला आहे, व त्याप्रमाणें गेल्या आठवड्यांत मात्र काय तों वागलों नाहीं. गेल्या १०—१२ दिवसांत एकंदर ६०—६२ पानें लिहिलीं. मनोरंजनाचीं ४० ( त्यांत १२ पैक्याचीं ) व आजकालच्या गोष्टींचीं ६. शिवाय दोहोंचीं प्रुफें या खेपेस मलाच तपासावीं लागलीं. आमच्या मॅनेजरांपैकीं दुसरे गृहस्थ डोंगरे हे फार आजारी पडल्याकारणानें कुळकर्णी यांचा उजवा हात आजारी पडल्याप्रमाणें झालें होतें. अशी स्थिती असल्यामुळें व कुलकर्ण्यांस दुसरीं कामें असल्यामुळें मीं त्यांस मदत केलीच पाहिजे होती. त्यांजवर सर्व भार घालून उपयोग काय ? बरें, दुसऱ्या कोणाचें मॅटर देऊन अंक भरावा तर बाजीरावाचीं दोनच पानें उरलीं आहेत. **परवशता** चारएक पानें शिल्लक. **रंगराव** मागवला नव्हता! शिवाय हा नव्या वर्षाचा नवा अंक, तेव्हां यांत एक नाटक, एक प्रहसन, एक कादंबरी, व एक निबंध हीं पाहिजेतच ! या अंकाच्या प्रती १००० काढल्या आहेत. कारण मासल्याकरितां ह्मणून अंक मागितला ह्मणजे मधलाच एकादा अंक पाठविल्याकारणानें आमचा अंक फुकट जातो, व त्यांतील प्रकरणें अर्धेमधेंच असल्याकारणानें वाचकास आपलें मत ठरविण्यास बरें पडत नाहीं. हजार काढून ठेवले ह्मणजे ५०० निव्वळ मासल्याकरितां ठेऊन द्यावयास सांपडतात. ' **श्रुतकीर्ति** ' संपलें, त्याच्या जागीं नवें नाटक पाहिजेच होतें. ' **बाजीराव** ' संपलें. त्याच्या जागीं पाहिजेच होतें; नवीन कादंबरी घालणें अवश्य होतें. कारण या सालापासून नवे वर्गणीदार होतील; त्यांना नाटकाशिवाय दुसरें कांहींच मिळूं नये हें बरें नाहीं. तुह्मी ह्मणाल त्यांनीं आणखी ४ रु. देऊन मागले अंक कां घेऊं नये ? तर त्याचें उत्तर एवढेंच, लोकांत

आण नाहीं. या सालापासून वर्गणीदार होऊन सवडीसवडीनें अंक घेण्यास ठीक पडावें. एकाद्यास वि. वि. घ्यावासा वाटला म्हणजे त्यांस केवढा बरें त्रास ! तिन्ही प्रकरणें नवीं घातल्यावर निबंध तेवढा जुना घालावा, असें मला वाटलें नाहीं, म्हणून निबंधही नवा घातला. एकंदरींत हा अंक आंतून बाहेरून जितका सुंदर करतां येईल तितका केला आहे; दुसऱ्याचें समाधान होवो न होवो. माझें मला तरी झालें आहे. आपण आपलें मत कळवालच; काल रोजीं आम्हीं इथें नाटकाचा व प्रहसनाचा फर्मा वाचीत होतों, त्यावेळेस " हें काशीताईस कसें वरें वाटेल ? " " काशीताईस आवडेल काय ? " असे प्रश्न मीं आपल्यालाच ५-७ वेळां केले. याचें सविस्तर उत्तर जेव्हां आपल्याकडून मिळेल तेव्हां मिळो. इतकें या अंका-बद्दल झालें; आतां मनोरंजनाच्या गेल्या वर्षाबद्दल पाहूं.

मनोरंजनाचा गेल्या सालचा रिपोर्ट जमाखर्चासुद्धां तयार होत आहे. मदतनीस गृहस्थ डोंगरे हे आजारी पडल्यामुळें तो जरा सावकाश तयार होत आहे. नाहीं तर एव्हांना आपलेकडे कुळकर्णी यांनीं पाठविलाही असता. सध्यां मीं आपली कच्ची हकीकत देतों. गतवर्षींचा मनोरंजन छापण्याचा खर्च त्यानें आपला काढला. जाहिरातीचा मात्र निघाला नाहीं. हें एक झालें. आतां यंदा ह्मणजे नव्या वर्षाला यादींत वर्गणीदार पुढीलप्रमाणें आहेत.

| | | |
|---|---|---|
| बाहेर गांवचे १८९ | पुणें ३५ | तुमच्याकडे ४ |
| मुंबई ६८ | ...... | एकूण २९६ |

शिवाय ज्यांनीं आपण होऊन नवा अंक मागितला आहे, असे इसम ११ आहेत. व मुंबईस आणखी २२ सहज होतील असें मुंबईचे एजंट नुकतेच येथें आले होते त्यांनीं सांगितलें. वरील आंकड्यांपैकीं ज्यांनीं अजून मागील सालची वर्गणी दिली नाहीं असे थोडेच ह्मणजे ५-७ आहेत. ही माहिती ढोबळ आहे. यांत चूकही असेल परंतु ठोकळ मानानें पाहतां नव्या वर्षी मनोरंजनास पैशासंबंधीं कसलीही मदत घ्यावी लागणार नाहीं. मात्र इतके सगळे लोक वर्गणीदार राहून वर्गणी आली पाहिजे. ते राहतील व त्यांची

वर्गणी येईल. अशी चांगली उमेद आहे. शिवाय नवे वर्गणीदार जारीनें येत आहेत. कित्येकांकडून पुढील सालची वर्गणी आलीही. नवे वर्गणीदार खूप व्हावे, व जुने जाऊं नयेत ह्मणून हा अंक मीं फार काळजीनें लिहिला आहे. त्यांस वाटेल तेव्हां खरें! एकंदर हकीकत समाधान वाटण्याजोगी आहे, नाहीं बरें? अंकांत लिहिल्याप्रमाणें हें बकुलाचें रोप फलपुष्प देणारें लवकरच होवो ह्मणजे झालें. लेखांच्या रूपानें लागणारें पाणी पुरविण्यास तुह्मी व रावसाहेब, मी व नारायणराव तयार आहोंत.

आतां आनंद देणाऱ्या आनंदीबाईकडे* वळूं. पण आधीं तुम्हीं मला " चरित्र वाचून पहाल काय ? " असें काय म्हणून विचारलें ? वडील आहां, तेव्हां अधिकार आहे पाहिजे तसा टोला देण्याला. मीं आळशी असलों म्हणून वडीलपणानें कान उपटून काम करावयास लावायचें, कां असे प्रश्न विचारावयाचे ? असे प्रश्न विचारण्याची व अहोस कांटो करण्याची वेळ गेली नाहीं काय ?

चरित्र निर्णयांत छापलें तर चांगलेंच, पण त्याची काळजी कोण घेणार ? जावजीवर सर्व भार टाकणें वाजवी आहे काय ? माझें मत असें आहे कीं, तो स्वतःची कामें जितक्या काळजीनें काढतो, तितक्याच काळजीनें इतरांचीं काढीत नाहीं. शिवाय ४० रतली कागद म्हणजे मोठासा चांगला नाहीं. त्यापेक्षां चांगला कागद घालून येथें १३ रु. ला फर्मा मिळेल. येथें आह्मीं तिघे छपाईविषयीं वगैरे काळजी घेण्यास आहोंत. जगद्धितेच्छूनें सर्व टाईप नवा घातला आहे. आजच्या अंकाचा टाईप कोराकरकरीत आहे. तो पहा. तो जावजीचाच टाईप. माझ्या मतें तो टाईप फार सुंदर आहे. स्वतःच्या काळजीनें काम निघावें असें मला वाटतें. तुह्मांला तसें वाटत असल्यास इथें पुण्यांतच काढावें. माझ्याही मनांतून चरित्र सुंदर काढावें असें आहे. इथें काढल्यास तें मी आपल्या Ideal प्रमाणें काढीन. बाईंडिंग मात्र येथें करणार नाहीं. तें मुंबईस एज्युकेशन सोसायटींतच करावें. हें एक झालें.

* डॉ. आनंदीबाई जोशी.

रावसाहेबांच्या ह्मणण्याप्रमाणें मुंबईस काढावें असें ठरल्यास तसें करा. मीं नोव्हेंबरमध्यें तेथें जाणार आहे तेव्हां सुरवात करावी. त्यावेळीं तुह्मीं तेथें यावें व तेथें तुमच्या संमतीनें सांचा, टाईप, कागद वगैरे कायम करून जावजीस लागीं लावून देऊं. याला अवधी लागेल एवढेंच. अवधि लागेल तर आपण कांहीं कोणाचे पैसे घेऊन बसलों नाहीं. आज अंकासोबत पाठविलेलें पुस्तक पहा. त्याप्रमाणें पुस्तक छापलें जावें हें माझें Ideal. Binding मात्र निराळें. ह्या पुस्तकावर कागद आहे तसा घालावयाचा. मीं ह्मणतों असें Binding "मऱ्हाठ्यांच्या संबंधानें चार उद्गार" या पुस्तकास केलें आहे. चरित्राच्या छापण्याविषयींचे माझे विचार असे आहेत. शिवाय जावजींवर नुसतें सोंपविल्यानें काम कधींही सुबक होणार नाहीं असें मला वाटतें. **आजकालच्या गोष्टी** मी या बुकाप्रमाणें काडल्या असत्या; परंतु कागद फारच हलका घ्यावा लागला यामुळें नाइलाज झाला. पुनः आवृत्ति काढण्याचा कधीं प्रसंग आल्यास खालीनेंच काढीन. हा सांचा चरित्राचा धरावा व टापटीप अशीच ठेवावी. कागद वर सांगितलेला घेतला ह्मणजे झालें. येथें काढल्यास मी आपल्या ideal प्रमाणें जावजीपेक्षां ज्यास्त खर्च न करितां काढीन. दोन्ही विचार आपल्यास कळविले आहेत. चरित्र मात्र ताबडतोब पाठवून द्यावें. मी तें वाचण्यास उत्सुक झालों आहें. मागें मीं आपल्या पत्रांत आपल्याजवळ एकादा आनंदीबाईचा फोटो ( अमेरिकेंत छापलेला हो ) असल्यास पाठवून देण्यास सांगितलें होतें. त्याबद्दल आपण कांहींच मजकूर लिहिला नाहीं. तो असल्यास ताबडतोब पाठवून द्यावा. तसेंच त्यांचें चरित्रही अवश्य पाठवावें.

ज्ञानप्रकाश आपलेकडे येऊं लागला किंवा नाहीं ? पुढील novel ज्ञानप्रकाशांत द्यावी असें सांगण्यास त्या पत्राचा manager काल मुद्दाम येथें आला होता. संपादक आज किती दिवस ह्मणतोच आहे. जगद्धितेच्छूनेंही दोन चार दिवसांपूर्वी विचारलें. केसरीविषयीं मीं आपणांस लिहिलेंच आहे. माझे विचार पुढील पत्रांत लिहीन. मागील पत्रांत ज्या कार्डाचा उतारा पाठविला होता तें कार्ड कोणाचें हें मला ठाऊक नाहीं. त्याच्या खालीं सही

नाहीं. आपणांस तें बाबाचें असें कशावरून वाटलें ? तें पुण्यांतलेंच आहे. ज्ञानप्रकाशचा अंक आपल्यास पाहिजे तो मी उद्यां पाठवीन.

मि. बावळे यास पत्र पाठवावयाचें तें देखील माझ्या हातून झालें नाहीं. त्यांची प्रकृति कशी काय आहे. माझ्या जागीं आपण त्यांचें समाधान करावें. त्यांस उद्यां पत्र पाठवीन.

मि. रा. गंगाधरपंत ठाकूर यांस सा. न. कळवा, व त्यांचें नव्या अंकाबद्दल काय मत होतें तें लिहावें. ते मोठ्या सुखांत आहेत. इकडे येणार कधीं ? आतां हें पत्र पुरें करतों. वर विचारलेल्या सर्व प्रश्नांच्या खुलाशाचें पत्र लवकर येईल अशी सबळ आशा बाळगणारा,

आपला भाऊ

हरी

२२

डेक्कन कॉलेज वसतिगृह.
मंगळवार आक्टोबर २,१८८८.

बा. सा. न. वि. वि.

ताईसाहेब, एकदां घडी बिघडली ह्मणजे पुनः बसण्याची मारामार पडते असें जें ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. मागल्याच्या मागला एक बुधवार चुकला त्यासरसं सारखं बस्तान बिघडलं. आतां पुनः तें बसवण्याचा प्रयत्न चालू आहे. जुळेल तेव्हां खरें.

आपलीं पत्रें पोंचलीं. त्यांतलीं नांवें मीं कुलकर्णी यांजकडे देईन. आज किती दिवस मी तुमचें एकादें मोठें पत्र येईल ह्मणून वाट पहात आहे, पण तें येत नाहीं; व मी तर मुळींच लिहित नाहीं हो, बरी आठवण झाली. तुह्मी प्रदर्शन पहाण्यास येणार किंवा कसें? यंदांचें प्रदर्शन फारच मोठें होणार आहे. या इलाख्यांत कांहीं यापूर्वी एवढें झालें नाहीं; तर तुह्मी ४

दिवसांची रजा घेऊन याच. अगदीं अनमान करूं नका. *नानासाहेब कानिटकर यांनीं तुह्मांला लिहिलेंच असेल. आणखी काय लिहायचें? त्यांस प्रदर्शनाची माहिती विशेष.

रावसाहेबांच्या छातींत दुखत होतें ह्मणून मीं ऐकलें तें खरें काय? दादासाहेबांनीं त्यांस Sick leave घेऊन येथें या ह्मणून लिहिलें होतें त्याप्रमाणें ते येणार आहेत कीं काय?

आपण माझ्या विनंतीप्रमाणें पुस्तक घेऊन वाचीत असतां हें पाहून मला मोठा आनंद झाला. Nature and Art हें पुस्तक वाचलें किंवा नाहीं? त्याविषयीं दिलेलें अभिवचन आपण विसरलां काय? जेन वेल्श कार्लाइलचीं पत्रें मजजवळ नाहींत. तीं मीं आमच्या कॉलेजच्या लायब्ररींतून आणून वाचलीं होतीं. तीं विकत घेण्याच्या भरीस आपण पडूं नये. कारण त्यांची किंमत १०-१२ रु. तरी आहे. आपणांस केव्हां तरी वाचण्यास देईन.

आपणांस आनंदाची गोष्ट सांगावयाची एवढीच कीं, आमचे चुलते +माधवराव यांनीं **आजकालच्या गोष्टी** वाचल्या व त्यांना त्या फारच आवडल्या हें आपलें मत त्यांनीं स्वत: माझ्या आतेभावाजवळ सांगितलें.

आतां आपणांपासून शिकून घेण्यास मला एक युक्ती सांपडली आहे, ती आजपासून अंमलांत आणूं पहातों. जो उतारा दिला आहे त्याचे भाषांतर करून पाठवा. तें मला शनवारीं पोंचेल असें गांवांतल्या पत्त्यावर पाठवा. कारण मीं त्या दिवशीं दोहित्रपाडवा असल्यामुळें घरीं जाणार आहे. आपण विविधज्ञानविस्ताराचे नवीन अंक पाहिले काय? त्यांत "तरुणी शिक्षण नाटिके" वर टीका आहे. तुह्मांस कशी काय वाटली ती टीका? त्या पुस्तकाची २ री आवृत्ति छापत आहे. आपला **रंगराव** न आल्यामुळें अंकास १ दिवस उशीर झाला. या खेपेस मनोरंजनांत कांहीं चुटके मीं लिहिले आहेत. मनोरंजन या सदरांत लिहिण्याची माझी ही पहिलीच खेप. असो.

---

* कै. वा. रा. ब. वासुदेव बापुजी कानिटकर. का. का.

\+ कै. वा. महादेव चिमणाजी आपटे, कै. वा. हरीभाऊचें चुलते व आनंदाश्रमाचे मालक. का. का.

Please translate into pure and idiomatic Marathi.

George Sand's advise to her son.

" Work, be strong and proud; despise the little troubles supposed to belong to your age. Reserve your strength of resistance for deeds and facts that are worth the effort. If I am here no longer, think of me who worked and suffered cheerfully. We are like each other in mind and in countenance. I know already from this day what your intellectual life will be. I fear for you many and deep sorrows. I hope for you the purest of joys. Guard within yourself that treasure - kindness. Know how to give without hestation, how to lose without regret, how to acquire without meanness. Know how to replace in your heart, by the happiness of those you love, the happiuess that may be wanting to yourself. Keep the hope of another life. It is there that mothers meet their sons again. Love all God's creatures. Forgive those who are illconditioned. Resist those that are unjust......"

याचें आपण इंग्लिशमध्यें भाषांतर करावें:—

" कालिदासाचें शाकुंतल.

महाकवि श्री कालिदास कविकृत अभिज्ञान शाकुंतल नाटक हें आबालवृद्धांस माहीत आहे. याच्या योग्यतेविषयीं जितकें लिहावें तितकें थोडेंच. या नाटकाची कीर्ति आमच्या लोकांत तर होतीच, पण इंग्रजी भाषेंत सर वुइल्यम जोन्स साहेबांनीं भाषांतर केल्यानें तर ती सर्व युरोपभर पसरली.

शाकुंतल नाटकाचीं भाषांतरें युरोपच्या बहुतेक सर्व भाषेंत झालीं आहेत."

भाषांतरें करण्यांत कोशाखेरीज कोणाची मदत घेऊं नये हें बरें असें मला वाटतें.

आपला धाकटा भाऊ

**हरी आपटे**

ता. क. चरित्राच्या १००० प्रति काढविल्या आहेत. चरित्र दसऱ्यालाच होईल असें जरी सांगवत नाहीं, तरी आपण ह्मणतां त्याच्या निम्मेही दिवस लागणार नाहींत असें वाटतें. मधें मधें विशेषनामें मोठ्या टाइपांत नसावीं असें मला कळविलें असतें तर तें केलें असतें. आतां उपयोग नाहीं. इन्डक्स तयार होत आहे.

---

## २३

तीर्थस्वरूप सौभाग्यवती काशीताई मु. नेवासें

वडिलांचे सेवेशी

बालकाचे शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष. परवां पत्र टाकलें आहे त्यावरूनच चरित्रें सुखरूप पोचल्याचें कळलेंच असेल. आतां एक मोठा महत्वाचा प्रश्न तुमच्या पुढें ठेवावयाचा आहे, तो ठेवतों; आणि नंतर मग आपण आपल्या इतर गप्पांकडे वळूं. तो प्रश्न हा---

आम्हीं कांहीं मंडळी मिळून आतां एक पुस्तकें प्रसिद्ध करणारी मंडळी केली आहे. मंडळी सध्यां फार नाहीं व पुढेंही पुष्कळ करावयाचा विचार नाहीं. दहा बारा भागीदार झाले म्हणजे झालें. या मंडळींनींच **आज कालच्या गोष्टी, गोष्ट पहिली** हें पुस्तक छापून प्रसिद्ध केलें. नफ्यातोट्यासंबंधानें ती मंडळी जबाबदार आहे. नशिबानें आज तें पुस्तक चांगलें खपून त्याचा खर्चवेंच निखालस बाहेर पडला. कारण १००० प्रती पार संपल्या. खर्चाची मूळ तजवीज कशी केली होती हें मी तुह्मांस पुढें एखाद्या पत्रीं लिहीन. सध्यां मंडळींत पांच असामी आहेत त्यांत मी एक आहें; आणखी एक मनुष्य थोडेच दिवसांत येऊन मिळणार आहे. ही मंडळी अजून रजि-

स्टर मात्र झाली नाहीं व तिचें भांडवल चांगलें होईपर्यंत रजिस्टर करण्याचा विचार नाहीं. अस्तु. या मंडळीच्या मनांतून आपलें पुस्तक विकत घेऊन छापावें असें आहे.

त्यांत गोष्ट एवढीच कीं, आपल्यास त्याचा मोबदला आजच देण्याची मंडळीला ताकद नाहीं. पुस्तक खपून खर्चवेंच निघून नफा उरला ह्मणजे आपला मोबदला ठरेल त्या प्रमाणानें आपल्यास मिळेल; किंवा आपण सांगाल त्याप्रमाणें त्याचा विनियोग केला जाईल. नफा झाला नाहीं तर कोणासच कांहीं नाहीं. पुस्तक जितकें सुंदर निघेल तितकें काढण्याची तजवीज केली जाईल हें उघड आहे. मंडळी नीट तऱ्हेनें चालण्यास एकापाठीमागून एक पुस्तकें निघालीं पाहिजेत. आज इतर ग्रंथकारांपासून एकदम पैसे देऊन ग्रंथ विकत घेण्याची मंडळीस ताकद नाहीं. मंडळीचें हित इच्छिणाऱ्या आपल्यासारख्या ग्रंथकारांकडून ग्रंथ अशा सोयीवार रीतीनें मिळाले ह्मणजे थोडें बरें होणार आहे. तेव्हां या प्रश्नासंबंधानें आपलें दोघांचेंहि काय ह्मणणें आहे हें नीट विचार करून तावडतोब कळवावें. शिवाय पुस्तक छापत असतांना एखादे वेळेस—बहुशा लागणार नाहींतच ही खात्री आहे परंतु—शंभर पासून दोनशें रुपयांपर्यंत कर्जाऊ रुपये लागले तर आपण देऊं शकाल किंवा कसें हेंही विचार करून कळवावें. हें विचारणें एवढ्याकरितांच आहे कीं, पुस्तक छापत असतांना कांहीं अनपेक्षित अडचण आल्यास थोडीबहुत सोय केलेली असावी. आज जो आह्मीं विचार केलेला आहे, त्यांत कोठें अशी अडचण येईल असें दिसत नाहीं. परंतु सावधगिरी असावी. ह्मणून हें विचारून ठेवलें आहे.

आपले पुस्तकांत घातलेलें भांडवल निघालें ह्मणजे लागलीच आह्मी '**थोर लोक**' या नांवाची चरित्रग्रंथाची मालिका काढणार आहों. तिचे विनंतिपत्र चांगल्या चांगल्या ग्रंथकारांकडे पाठविणार आहों. विनंति एवढीच कीं, आपण या मालिकेंत अमुक पृष्ठांचें कोणाचें तरी चरित्र लिहून द्यावें; आपणांस अमुक रुपये मिळतील.

या प्रयत्नांत यश कितपत येईल तें पाहिलें पाहिजे. तर आपण वर लिहिलेल्या गोष्टींचा विचार करून उत्तर जरूर जरूर लवकर पाठवावें.

बस्स्, पुरे झाला गंभीरपणा आतां. ज्यास्त वेळ टिकतच नाहीं तो. आणखी त्याची जरूरही नाहीं. पण ताईसाहेब, आपण आतांशा करीत असतां काय ? चरित्र संपलें, आतां तरी कांहीं वाचायला घ्या. तें आर्ट व नेचरचें पुस्तक आहे कां स्मरणांत ? कां विसरलांत ? अहो पुंजी नसली तर खर्चणार काय ? पुंजी करण्याकडे कांहीं तरी लक्ष द्या. नुसती स्वतांची बुद्धीच खरचाल तर शेवट ? उधळ्यासारखी नाहीं कां स्थिती होणार ? मी तुह्मांला दोन पुस्तकें पाठविणार आहें. दोन्ही चरित्र ग्रंथ आहेत. एक शेलेचे चरित्र आहे. तें आपले येथें असतांना वाचलेल्या पुस्तकापेक्षांही गोड आहे. रावसाहेबांना सांगा तें अवश्य वाचा. पण असें सांगावयाला नकोच. ते वाचतीलच. आपण मात्र वाचा ह्मणजे झालें. कळो न कळो, वाचीत सुटा. एवढी ही माझी गोष्ट तुह्मीं ऐकाच. आपोआप कळूं लागेल. पुस्तक हातीं घ्यावें कीं शेवटपर्यंत ओढावें; न कळेना. पण ते आपला गुण केल्याखेरीज रहाणार नाहीं--- पण हा काय माझा वेडेपणा. कानामागून आला आणि तिखट झाला अशा सारखेंच माझें हें करणें आहे. मी लहान, आपण वडील ( आपण कितीही केलें तरी मी हेंच नातें बाळगणार. कारण आम्ही पुरुषजन्मांत आहोंत; तेव्हां त्याप्रमाणेंच वागण्याचा प्रयत्न केल्यास आह्मांस अडचणी नाहींत. आपणांस अनेक अडचणी असून त्यास न जुमानतां आपण आपला अभ्यासक्रम चालविला आहे हें पाहून कोणीही आपल्याकडे वडीलपणा देईल ) तेव्हां हें असें लिहिणें शोभत नाहीं. पण ताईसाहेब, " वाचा " ह्मणून मी आपणांस सांगणारच.

चरित्र वाचावयास ते दिवशींच प्रारंभ केला. आतां तें छापायला देण्याचा विचार आपल्या पत्रावर अवलंबून आहे. होडालच्या चरित्राचा सांचा धरला तर आपल्यास आवडावयाचा नाहीं. परंतु इंग्रजी पुस्तकांपैकीं ८ पुस्तकें त्या सांच्याचींच असतात. मीं आपणांकडे सर्व तऱ्हेच्या सांच्याचीं पुस्तकें आपलें उत्तर आल्यावर पाठवीन

कोणता तो पसंत करून आपण कळवा. चरित्रांत घालण्याकरितां जो फोटो आपणांस मिळाला आहे तो अगदीं गचाळ आहे. मला मुळींच आवडला नाहीं. माझ्याजवळ एक फारच सुंदर फोटो आहे. परंतु त्याचें आतां काय ? पुढच्यापुढें पाहतां येईल.

ठाकूरचें पत्र आलें, त्यांत त्यानें नव्या अंकाविषयीं आपलें चांगलें मत दिलें आहे. आमच्या वडिलांनीं दोन महिन्यांची रजा घेतली आहे. उद्यांपासून सुरूं होणार आहे. येथें १५ दिवसांनीं येतील. नवल विशेष कांहीं नाहीं.

आपला धाकटा भाऊ

**हरी आपटे**

ता. कलम— दुसऱ्या भागावरील अर्पणपत्रिकेची एक नक्कल पलीकडल्या बाजूस दिली आहे; त्यांत कांहीं फेरबदल हवा असल्यास ताबडतोब कळवावें.

---

## २४

पुणें, डेक्कन कॉलेज १०-१०-८८

बा. सा. नमस्कार वि. वि.

ताईसाहेब, मनुष्याच्या मनांतून टाळाटाळी करावयाची असली ह्मणजे ती कशी तेव्हांच करायला येते. अक्षर लागलें नाहीं ही सबब कांहीं तरी नाहीं तर काय ? कोणाची मदत घेतल्याशिवाय भाषांतर करावें असें मीं लिहिलें खरें, परंतु तेवढ्यावरून एकादा शब्द न लागल्यास तोही दुसऱ्या कोणाला विचारूं नये असें झालें कीं काय ? आपल्याला वेळ झाला नाहीं तेव्हां कशीतरी वेळ मारून नेण्याचा हा यत्न आहे असें मीं ह्मणतों. बरें मीं ह्मणतों इंग्रजी एक लागलें नाहीं, ह्मणून मराठीही लागलें नाहीं अं ? मग मात्र मोठें आश्चर्य आहे खरें ! मराठी भाषांतर तरी पाठवायचें होतें! ह्मणजे मग त्या सबबीला कांहीं तरी वजन आलें असतें. आतां त्या सबबीला कांहीं वजन देऊं नये असें माझें मन मला सांगतें. तेव्हां

आपल्याला कळविणें भाग आहे. कारण मनांतली एकही गोष्ट आपल्याला कळविल्यावांचून रहायचें नाहीं असा माझा निश्चय आहे. तेव्हां आतां कांहीं लटपट न करतां परवां पाठविलेला मज़कूर व आज या पत्रासोबत पाठवलेला, दोन्ही भाषांतर करून मला सोमवारला किंवा मंगळवारला येथें मिळाले पाहिजेत. सबबी ऐकणार नाहीं. Art & Nature चें काय झालें तें कळविलें नाहीं. नाहीं झाला वेळ तर नाहीं झाला, अशा तुट ह्मणतां तुटून जाणाऱ्या सबबी कशाला ? पुरे यासंबंधीं !

परवां कीं तेरवां पाठविलेले ८ फर्मे आपल्याला पोंचलेच असतील. आपलें पुस्तक दसऱ्यालाच जरी नाहीं तरी लवकर निघेल अशी खात्री आहे. आपण मजकडे थोडाबहुत अधिकार दिल्याकारणें मीं कांहीं फेर-फार केले आहेत. ( पुस्तकांत नव्हे हो ! पुस्तकांत शुद्धाशुद्धतेखेरीज कांहीं नाहींत ) प्रत्येक भागावर आपलें जें एकच हेडिंग होतें, तें काढून पुष्कळ घातलीं; ' भाग ' शब्द होता तेथें ' प्रकरण ' शब्द घातला. प्रत्येक भागावर जी त्या भागांची समरी दिली आहे ती आपल्या एका हेडिंगा-पेक्षां बरी वाटली. आपणांस कसें वाटतें ? ' भाग ' हा शब्द काढून 'प्रकरण' हा कां घातला हें माझें मलाच कळत नाहीं. तरी पण मी आपल्या मतानें ' भाग ', ' प्रकरण ' या शब्दांस कांहीं ठराविक अर्थ दिले आहेत. एका ग्रंथाच्या निरनिराळ्या Volumes ना भाग ह्मणावें, किंवा पुष्कळशीं प्रकरणें मिळून जो एक तुकडा पडतो त्यास भाग ह्मणावें. हा माझा भेद Arbitrary आहे; त्याला कारण नाहीं; असो.

ज्ञानप्रकाशांतील विधवेचें आपणांस पत्र आलें हें पाहून मला आनंद झाला. ती बाई कोण हें मला मुळींच ठाऊक नाहीं. तिचें नांव गांव कळल्यास, माहिती असली तर आपणांस कळवीन. पण ज्याअर्थी त्या बाईची आपलें नांव गुप्त ठेवण्याची इच्छा आहे, व याप्रमाणें तिनें आपणांस कळविलें आहे, त्याअर्थी, मला जरी तिचें नांव वगैरे कळवून घेण्याची अति उत्कट इच्छा आहे तरी, आपणांस तें नांव विचारण्याचा हक्क मला पोंचत नाहीं. व मला वाटतें आपणांस तें सांगण्याचा अधिकार नसावा.

आतां कंपनीविषयींची गोष्ट राहिली तीः—कुलकर्णी आणि मंडळींचे मेंबर्स १०० रुपयांच्या शेअर्सचे ३० असावेत असा विचार आहे. ती मंडळी जानेवारीच्या आधींच निघावी असें मला वाटतें. सर्व मेंबरांनीं आपले शेअर्स जानेवारी १ च्या आंत पाठवावे. कंपनीचे नियम मिळून इतकेच कीं, एका मनुष्याच्या नांवावर एकापेक्षां अधिक शेअर्स असूं नयेत. कारण शेअर पाठीमागें Vote असल्याकारणानें, एकानें पुष्कळ शेअर घेतल्यास त्याला २–३–४ अशीं मतें जातील, आणि त्या योगानें समविचार होण्याचा संभव नाहीं. दुसरा नियम, कंपनीच्या capital ची व्यवस्था Directors कडे द्यावी. कंपनीच्या मतानें Directors निवडले जातील. असें जर न केलें तर कांहीं कांहीं गोष्टींत मोठी पंचाईत पडेल. समजा कीं एकाद्या मनुष्यानें एकादें पुस्तक लिहिलें, आणि कंपनीकडे विकत घेण्यास पाठवलें, तर काय तें पुस्तक प्रत्येक sharer कडे पाठवणार? तसा नियम ठेवल्यास पुस्तक कंपनीकडे आल्यापासून ३–३॥ वर्षांनीं मालकास त्याचा निकाल कळायचा. शिवाय जे कायदेशीर नियम करायचे ते कायदे जाणणाऱ्या मनुष्याकडून करून घेतां येतील. असा कंपनीसंबंधानें विचार आहे. आतां कंपनीला कामें काय मीं योजिलीं आहेत तींः—

१ **करमणूक** नांवाचा पेपर. हा पेपर जानेवारीच्या १ ल्या शनिवारीं प्रसिद्ध करून पुढें प्रत्येक शनिवारीं प्रसिद्ध करावा अशी इच्छा आहे. या पेपरमध्यें पुढील विषय येणार. ( १ ) मोठें novel ( २ ) २–३ खेपेंत संपेल अशी गोष्ट ( ३ ) नाटक ( ४ ) प्रहसन ( ५ ) चालू विषयावर छोट्या छोट्या विनोदी notes( ६ ) मनोरंजक चुटके, विनोद महदाख्यायिका ( ७ ) केव्हां नवीन कविता ( ८ ) इहवृत्त व वर्तमानसार.

या पेपरला खर्च येईल तो १००० वर्गणीदार झाल्यास निघणार नाहीं. निदान २००० तरी पाहिजेत. दुसऱ्या सालीं तितके मिळतील अशी आशा आहे. पहिल्या सालीं खर्च निदान २००० रु. येईल. प्रत्येक अंकाच्या २०००

प्रति काढल्यास दर आठवड्यास पुढीलप्रमाणें खर्च येतो;

| | | |
|---|---|---|
| छपाई २० रु. | } | एकूण ३० रु. |
| कागद ६ रु. | | |
| इतर व वांटणावळ ४ रु. | | |

५१×३०=१५३० निदान १५०० खरा. १००० प्रति काढल्यास १२०० येईल. परंतु तितक्या काढून कांहीं उपयोग नाहीं. या खर्चांत Editorial खर्च मुळींच धरला नाहीं. आतां या पत्रांच्या जाहिराती-संबंधें पुढील व्यवस्था योजिली आहे.

डिसेंबरच्या पहिल्या केसरींत लहानशी जाहिरात द्यावयाची कीं, **करमणूक** नांवाचें अमुक तऱ्हेचें वर्तमानपत्र आह्मीं अमुक तारखेपासून काढणार आहों. वर्गणी अमुक, सांचा अमुकः—

याच जाहिरातींत पुढील गोष्ट मोठ्या ठळक टैपांत त्याह्यायची.

सूचनाः— "या पत्राच्या पहिल्या अंकाच्या १५-२० हजार प्रति प्रॉस्पेक्टस ह्मणून फुकट वांटल्या जाणार आहेत, तरी ज्यास आपल्या पुस्तकाची अगर जिनसांची प्रसिद्धी व्हावी अशी इच्छा असेल त्यानें अमुक तारखेच्या आंत आपली जाहिरात व दराप्रमाणें पैसे पाठवून द्यावेत. १५ हजार प्रति वांटणें ह्मणजे जवळ जवळ १००००० लोकांत जाहिराती वांटणें आहे."

ही सूचना दिल्यानें व जाहिरातीचे दर अगदीं कमी ठेवल्या-कारणानें जाहिराती अतोनात येतलि असा माझा अंदाज आहे. व त्या जाहिरातींनीं पहिल्या अंकाच्या ज्या प्रति काढावयाच्या त्यांचा कांहीं तरी खर्च निघेल. आणि १५००० प्रति वांटल्या ह्मणजे पत्राचा प्रसा-रही अतोनात होईल; आणि दर तीन प्रतींस १ वर्गणीदार ह्मटला तर ५००० होतील. या पहिल्या अंकास खर्च व वांटणावळ मिळून ३०० रुपये खर्च येईल. तेव्हां १५००+३००=१८००+२००=२०००. हे २०० रुपये English news papers कडे घालावे लागतील, कारण त्याशिवाय पेपर चालणें कठीण. पहिल्या सालींच २००० वर्गणीदार झाल्यास Editorial खर्चाखेरीज सर्व खर्च निघेल. पुढें फार झालें तर

जाहिरातीचें उत्पन्न तेवढें Editorial खर्चाकडे घालतां येईल, आणि तें १००० रु. झाल्यास, २००० वर्गणीदारांत व १००० रु. जाहिरातीच्या उत्पन्नांत, Editorial सकट सर्व पेपर ऐटीनें चालेल. पुढें वर्गणीदार होतील ते व जाहिरातींचें उत्पन्न होईल तें सर्व कंपनीच्या नफ्यांत पडेल. ५००० वर्गणीदार झाल्यास [ आणि २–३ वर्षांत ते तितके होतील अशी माझ्या मनाची खात्री आहे ] कंपनीस दरसाल १०००--२००० नफा राहील. किंबहुना ज्यास्त पण कमी नाहीं. Editorial खर्चांत ४० रु. मुख्य Editor चा पगार, ३० दुसऱ्याचा, १५ तिसऱ्याचा. अगर कोणी गमतीदार असा मजकूर पाठवल्यास त्याला Remuneration ह्मणून देण्यास आणखी ५--७ रु. त्यांत घालून एडिटरच्या स्वाधीन करावे. ह्मणजे बाहेरून येणाऱ्या मजकुरास उत्तेजन दिलें जाईल. कंपनीस जसजसा नफा होईल तसतसा Editor चा पगार वाढविला जावा. ह्मणजे त्यांसही उत्तेजन मिळून Paper चांगल्या तऱ्हेनें चालेल. त्याचप्रमाणें बाहेरगांवच्या बातमीदारांसही थोडेंबहूत remuneration देण्याची तजवीज करावी.

या वर लिहिलेल्या गोष्टी आपणांस व रावसाहेबांस कदाचित् माझ्या कल्पनेचे निवळ खेळ आहेत असें वाटेल. परंतु त्यासंबंधीं विचार करकरून माझ्या मनाची पक्की खात्री झाली आहे कीं, या सर्व गोष्टी शक्य आहेत. इतकेंच नव्हे तर माझ्या ह्मणण्याचा विचार करून जर प्रथम २-३ वर्षे नफ्याकडे लक्ष न देतां कंपनी वरीलप्रमाणें करील, तर या सर्व गोष्टी अनुभवास आणून दिल्याखेरीज कधीं राहणार नाहीं. ग्रॅज्युएट लोक जें आपल्या डिग्रीच्या जोरावर करतील तें आमच्या सारख्यांनीं कष्टी मेहनत केल्यानेंही होऊं नये, असें मला वाटत नाहीं.

हो, मी वर एक गोष्ट लिहिण्यास विसरलों, ती ही. पेपरची वर्गणी १ रु. सांचा केसरी एवढा. मजकूर आंतलीं २ पानें भरून. त्यांत जाहिराती शिरणार नाहींत. बाहेरचीं ह्मणजे १ लें व ४ हीं पानें जाहिरातींचीं. आतां तुह्मी ह्मणाल कीं, कंपनीनें एवढें मोठें थोरलें काम हातीं घेण्यापेक्षां आधीं लहान कामें घेऊन मग हें केलें तर? या प्रश्नाचें उत्तर मी असें देतों.

समजा कीं, कंपनीनें लहान लहान ४।५ कामें घेतलीं पण तीं कामें हवीं तितकीं प्रसिद्धीस न्यायला जाहिरातींचा खर्च लागतो तो! तुमच्या चरित्रावरून पहा ३ महिने केसरींत जाहिरात ठेवली त्याचें Bill ३० रु. **आजकालच्या गोष्टीचा** जाहिरातीचा खर्च २५०।३०० रु. ! हा जो खर्च करून लोकांकडे जी भर करावयाची, तोच आपला 'करमणूक' सारखा ह्मणजे, आबालवृद्ध घेतील असा, (केसरी कितीही उत्कृष्ट असला तरीं कुणबी माळी घेतील असा नाहीं हें कोणीही कबूल करील) पेपर असल्यावर कंपनीच्या कामास प्रसिद्धी ह्मणजे हां हां ह्मणतां मिळेल. त्याच्याकरितां निराळी खटपट नको !

वर्गणी मात्र नेहमीं आगाऊ. वर्गणी आल्याखेरीज दोन अंकांपेक्षां ज्यास्त अंक जाणार नाहींत असा करडा नियम.

दुसरें काम जें मीं कंपनीकारितां योजिलें आहे तें आपल्या देशांतील व प्रसंगीं परदेशांतीलही मोठ्या लोकांचीं चरित्रें '**थोर लोक**' या नांवाच्या मालिकेंत निरनिराळ्या पुस्तकांच्या रूपानें प्रसिद्ध करावयाचीं. हीं चरित्रें नाणावलेल्यां लेखकांकडून लिहवून व त्यांस Remuneration ह्मणून पुस्तकापाठीमागें १०० रु. देऊन हक्कांसह विकत घ्यायचीं. या मालिकेचा plan कसा तो मागें मीं आपल्यास लिहिलाच. शिवाय तुमचें, माझें, व रावसाहेबांचें बोलणें झालेंच आहे. तेव्हां आतां ज्यास्त लिहीत नाहीं.

आतां या संबंधानें वर लिहिलेल्या प्रत्येक गोष्टीविषयीं आपलें व रावसाहेबांचें बोलणें होईलच. तेव्हां त्यांत ज्या ज्या कांहीं गोष्टी होतील त्या त्या सर्व मला कळाव्या, व आपलें सविस्तर मत कोणत्याही तऱ्हेच्या सबबी न सांगतां आपण मला बुधवारच्या आंत कळविलें पाहिजे.

आपण जेन ऑस्टेनचे ग्रंथ वाचतां हें फारच चांगलें आहे. एसा किती वाचून झाली ? मला स्वतःला तिच्या novels फार आवडतात. तिच्या novels चांगल्या कळण्यास एक किंवा दोन वाचनांनीं कांहीं होत नाहीं. तिचा अनुभव व शिक्षण दोन्हीं संकुचित होतीं. यामुळें लग्नें, Balls खेरीज गोष्टी तिच्या novels मध्यें क्वचित् दृष्टीस पडतात. त्याचप्रमाणें

मध्यम स्थितींतल्या लोकांचे गुणावगुण मात्र त्यांत दिसतात. तिची Humour फारच फक्कड. जॉर्ज इलिअटची गोष्ट निराळी. दोघांची योग्यता मोठी आहे. आपण मात्र अनुकरण करण्यास योग्य अशी पहिलीच असें माझें अजून मत आहे. कारण जेन ऑस्टेनचें अनुकरण करणें जितकें कठीण आहे तितकें जॉर्ज इलिअटचें नाहीं. We shall see another George Elliot before we see another Jane Austen.

* वाबळे हल्लीं काय करतो ? त्याचें पत्र कां नाहीं. ! . .

रावसाहेबांस शिरसा. नमस्कार. मुलांस आशिरवाद.

आपला भाऊ

**हरी आपटे**

ता० वरील सर्व गोष्टींवर विचार करून सविस्तर मत कळवावें. नुसतें बरें आहे असें उपयोगीं नाहीं.

ती. रा. नानासाहेब यांची रजा संपत आली; यास्तव ते सोमवारीं येथून गेले.

Dear Tatyasaheb,

I am very sorry to see that you do'nt write to me as often as I do to you. Yet when I am silent for more than a week both of you get vexed. Though you are so very fortunate in getting a wife of untiring energy and great intelligence, I do'nt think you should make her write all your letters to me. I want both of you to write to me. Had I been equally fortunate – but let it go.

---

* कै. रा. रा. कृष्णराव विनायक वाबळे कै. वा. हरिभाऊंचे एक कॉलेजांतील स्नेही हे नेवासे येथील वकिलांचे चिरंजीव होत.

का. का.

Do'nt you intend to come here to see the exhibition? Do come. That's all I want to say here.

Yours sincerely

Hari Apte.

---

२५

मुंबई, सदाशिव गल्ली, गिरगांव

गुरुवार ४।७।८९

ती. सौ. काशीताई कानिटकर यांस

बालकाचे शिरसाष्टांग नमस्कार वि. वि.

आपलीं पत्रें पावलीं. त्यांत आपण लिहिल्याप्रमाणें मीं आधींच तजविजींत होतों. पुस्तक महाराजांपर्यंत गेलें. त्यांचा, गायकवाडांचा Private Secretery माझ्या परिचयांतला आहे. त्यास मीं वेळोंवेळीं जागें करीन. मी संपतराव गायकवाडांस भेटलों होतों. ( रविवारीं ) त्यांचें माझें बोलणें झालें. त्यांत मीं त्यांस असें असें पुस्तक झालें आहे ह्मणून सांगून महाराजांकडून कांहीं आश्रय द्यावा ह्मणून विनंति केली. आश्रय कोणत्या तऱ्हेचा पाहिजे ह्मणून त्यांनीं मला विचारलें. तेव्हां मीं जरा बुचकळ्यांत पडलों. शेवटीं जें माझ्या मनाला योग्य वाटलें तें सांगितलें. आपणांस तें कसेंहि वाटो. मीं त्यांस असें सांगितलें कीं, ग्रंथकर्त्रीची संसारस्थिती चांगली असल्यामुळें त्यांस या पुस्तकाच्या आश्रयरूपानें ह्मणा, अगर पुस्तक खपून फायद्याच्या योगानें जी प्राप्ती होईल ती संसारास लावावी लागणार आहे असें नाहीं. पुस्तकाचा खर्चवेंच निघाल्यावर जो त्यांस फायदा होईल तो, व आश्रयरूपानें मिळालेल्या रकमा यांच्या सामर्थ्यानें चरित्र-नायिकेचें कांहींतरी स्मारक करून ठेवावें असा त्यांचा उद्देश आहे. यावर त्यांनीं मला स्मारक कोणतें करणार ह्मणून विचारलें; तेव्हां मीं ह्मटलें, हें आह्मांस आतांच सांगतां येणार नाहीं. जशी रकम जमा होईल तसें स्मारक काय करावयाचें तें ठरवितां येईल. त्यावर त्यांनीं मला विचारलें,

' बरें तुह्मीं स्मारक करणार तर कांहीं प्रॉस्पेक्टस वगैरे काढला आहे ? ' मीं त्यांस सांगितलें प्रोस्पक्टस वगैरे काढला नाहीं, कारण गरीब लोकांनीं अशा कृत्यास यावें काय ? शिवाय हें स्त्रीचें, त्यांतून अमेरिकेंतून आलेल्या. इतकें मीं बोलतों, तों त्यांस महाराजांकडून बोलावणें आलें व त्यामुळें त्यांस जावें लागलें. पुढें कांहींच बोलणें झालें नाहीं. पुस्तक महाराजांपर्यंत गेलें आहे. तर आपण स्वतः खुद्द राणीसाहेबांस याच अर्थाचें पत्र पाठवावें. मीं Private Secretary स पाठवीनच.

होळकर सरकारांकडे खटपट केली होती; परंतु होळकर महाराज एकाएकीं कोठून तार आल्यामुळें निघून गेले. पुनः केव्हां तरी पाहूं. काय मौज आहे पहा ! पुठ्यास घालण्याकरितां मनाजोगें कव्हरही मुंबईस-अर्थात हिंदुस्थानांत-मिळू नये ! एम्बॉसिंग करून छापून काढूं ह्मटल्यास त्याचें यंत्रहि मिळू नये ! पुस्तकें बांधण्यास गेलीं. डिप्लोमा छापून झाला. रा. रा. कुलकर्णी यांची बायको अतोनात आजारी असल्यामुळें ते अद्यापि अलीबागेसच आहेत. यामुळें कामाचा नुसता चुथडा उडाला आहे. कसें होणार असेल तें होवो. मीं हल्लीं Robert Eldmere वाचीत आहें. पुस्तक मीं मागें एकवेळ अर्धवट वाचलें होतें. त्या वेळेपेक्षां या खेपेस गला तें फारच आवडत आहे. रावसाहेबांस सांगावें आपण तें अवश्य वाचाच. त्याविषयीं व येथें येण्याविषयीं सर्व हकीकतीचें पत्र पुढील खेपेस पाठवीन.

आपला भाऊ
**हरि आपटे**

---

## २६

मुंबईः–गिरगांव ब्याक्रोड––सदाशिवगल्ली
१९—८—८४

ती. सौ. काशीताई कानिटकर यांसः--

बालकाचा दोन्ही कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार वि. वि. आपलेकडून पंडिताबाईंच्या आक्षेपांस उत्तर ह्मणून जें इंदुप्रकाशांत पाठविण्याकरितां पत्र आलें तें पावलें. ( काय त्रास आहे पहा ! यावेळीं माझ्या शेजारीं एक आमच्या ओळखीचा जुन्नरचा जोशीभट बसला आहे. तो

पुनः पुनः मधें बोलून मला पत्रच लिहूं देत नाहीं. बघा मजा. त्यानें मला इतक्यांत विचारलें, कोणाला पत्र लिहितां ? मीं त्यास सांगितलें, आमचे स्नेही डहाणूस मुन्सफ आहेत त्यांस लिहितों आहे. तो विचारतो, ते कोण आहेत ? मीं त्यास म्हटलें, मुन्सफ आहेत ते. त्यावर तो एकदम ह्मणतो, " वाहवा बाहवा, खाशी सोय झाली. मला त्या बाजूला जायचें आहे तर आपण त्यांना एक शिफारसपत्र द्या. माझ्या लेकीचें लग्न कर्तव्य आहे. मुलगी मोठी झाली आहे. जवळ पैसा नाहीं. अनायासें गरीबाचें काम होईल ५--२५ रु. मिळाले तर. " अशी भिक्षा मागून पोरीचें आपल्या हातानें वाईट बरें करून देण्यापेक्षां तिला शारदासदनांत पाठवून कां सुशिक्षित करीत नाहीं ? असा प्रश्न माझ्या अगदीं जिव्हाग्रीं आलेला आहे; पण मीं कपाळाला आंठ्या घालून, तुझें बसणें यावेळीं मला नको आहे हें जिकडून दाखवतां येईल तिकडून दाखवून, त्याच्या बोलण्यास हो हो करीत आहें.-- मला वाटतें माझा हेतु त्याला कळला असावा. मी या गेल्या वाक्यांत शेवटले २--३ शब्द लिहीत होतों तों ' चला जावं आतां ' असें ह्मणून तो उठून चालता झाला ) जाऊं द्या. मला आतां पत्राकडे वळूं द्या. थोडीबहूत धिट्टाई करून मीं एक गोष्ट केली आहे. ती ही कीं, आपलें पत्र या अंकांत छापण्यासाठीं दिलें नाहीं. कारण तें पत्र छापण्यायोग्य असें मला वाटलें नाहीं. तुमचें माझें कित्येक बाबतींत जुळत नाहीं ह्मणून मला तें पत्र अयोग्य वाटलें असें नाहीं. तर तुमचेंच मत कां होईना, पण तें फार पुळपुळीतपणानें लिहिलें आहे, इतकेंच नव्हे तर पुष्कळ ठिकाणीं ( पुढील शब्द लिहितों याबद्दल माफी करालच ) पोरकट दिसतें; ह्मणून मला तें पत्र तुमच्या सहीनें प्रसिद्ध होणें बरें वाटत नाहीं. माझें मत असें कां झालें याबद्दल थोडेसें लिहितों.

* रमाबाई व तुह्मी दोघीही चरित्रांतील दोषांचा बोजा माहिती

---

* पंडिता रमाबाई या माझ्या मैत्रिणीपैकीं एक होत्या. त्या व डॉ आनंदीबाई जोशी या अमेरिकेंत डीन बॉडले यांचें येथें रहात असत. त्यावरून त्यांना डॉ. आनंदीबाईची चांगली माहिती होती.

का. का.

देणारावरच ठेवतां. परंतु माहिती देणारानें दिलेली माहिती खरी किंवा खोटी हें पाहणें काम कोणाचें ? तुह्मी इतिहास लिहिणार. तुमच्यापुढें आलेल्या साक्षीदारांत खरें खोटें कोण हें पहाणें तुमचें काम ना ? माहिती देणाराकडे दोष आहे असें सिद्ध करण्यापूर्वी माहिती देणारावर आह्मी भरंवसा कां ठेवला हें सांगावयास नको काय ? निदान एवढें तरी सांगितलें पाहिजे कीं, माहिती देणाराच्या शब्दावर भरंवसा ठेवण्यास हरकत नव्हती. तो अगदीं भरंवशालायख मनुष्य होता इतकेंच नव्हे तर त्यानें दिलेल्या माहितीबद्दल खरेंखोटें कळण्यास मार्ग नव्हता. तेव्हां अर्थातच माहिती देणारावर सर्व प्रकारें भरंवसा ठेवावा लागला.

२ पुढें तुह्मीं आणखी लिहितां कीं " डॉ. आनंदीबाईबद्दल जसा मजकूर कळत गेला त्या मानानें माझ्या हातून मजकूर येत गेला. " काय विलक्षण कबुलीजबाब हा ! चरित्र लिहिणाराच्या मनोवृत्ति जर बदलत गेल्या तर त्याचें हातून चरित्र चांगलें व्हावें कसें ? चरित्र इतिहास लिहिणाऱ्यानें मनोवृत्ति माझ्या ताब्यांत नाहीं ह्मणणें ह्मणजे काय ह्मणण्यासारखें आहे तें तुमचें तुह्मीच पहा. यांत एक ध्वनि तर असा निघतो कीं, कित्येक गोष्टींसंबंधानें ग्रंथकर्त्रीचीं मूळचीं कांहींच मतें नव्हतीं. आनंदीबाईचें चरित्र लिहितांना ज्या कांहीं गोष्टी दृष्टोत्पत्तीस आल्या, त्यावरून मतें तयार झालीं.

बोटीवरच्या इंजिनियरच्या गोष्टीसंबंधानें आपलें लिहिणें यथास्थित आहे.

" ख्रिस्ती मिशनरी लोकांसंबंधानें ' एका शितावरून भाताची परीक्षा होते ' या ह्मणीप्रमाणें माझें मत झालें व अजूनही अंशतः आहे. ख्रिस्ती लोकही खालच्या प्रतीच्या लोकांच्या वर्तनावरून सर्व हिंदूंचा आचारविचार असाच आहे असें मत ठोकून देतात " हें वाक्य वाचून मला त्यांतील पोरकट विचारांचें अतिशय हंसूं आलें व अजूनही येत आहे. ( माफी करा ) अहो ! मनुष्यस्वभावाचा पुरा परिचय होण्यास एक जन्म पुरावयाचा नाहीं ही गोष्ट कोणीही कबूल करील; पण ख्रिस्ती लोक नीच प्रतीच्या

लोकांचें वर्तन पाहून सर्व हिंदूंबद्दल मत ठोकून देतात ह्मणून आपणही तसेंच करणें वाजवी होईल काय ? काय पण कार्यकारण भाव ? ज्याबद्दल तुह्मीं त्यांना दोष लावतां तीच गोष्ट तुह्मी करतां, आणि ती करण्याला आधार काय तर ते लोक तसेंच करतात ! मग पुणेवैभवासारखीं भिकारडीं पत्रें एका शाळेंत जाणाऱ्या मुलीच्या दुर्वतनावरून सर्व शिक्षित मुलींबद्दल तर्क करतात त्यांनाही कां शिव्या देतां ? त्याचप्रमाणें एका शितावरून भाताची परीक्षा आणि एका व्यक्तिवरून समाजाची परीक्षा या दोन्ही गोष्टी सारख्याच काय ? असें जर असतें तर Sociology इतकी भयंकर complex कां झाली असती ? बिचारा भात एकाच धातूच्या, अतएव ज्याची उष्णता-वाहकता सारखी आहे अशा भांड्यांत, एकाच उष्णतोगमस्थानाजवळून ऊष्णता घेऊन शिजत असतो. आणि समाज--पण मी हें कशाला लिहूं ? काय तुह्माला माहीत नाहीं ह्मणून लिहावयाचें ? " वर्तमानपत्रांवरून व चरित्र लिहितांना जी ख्रिस्तमिंडळी आढळलीं तीं तीं मीं ह्मणतें अशांतलींच आढळलीं." कबूल. पण इकडे पहा. आपल्या वर्तमानपत्रांत ख्रिस्ती लोकांच्या दुर्वतनाचें एकादें उदाहरण घेऊन लिहिलेलें जसें आढळलें, तसें त्यांच्या सत्कृत्याबद्दल कधीं वाचलेलें आपणांस आठवतें काय ? आमचीं वर्तमानपत्रें निवळ त्यांचे दोष पहात बसून त्यांजवर खल करीत बसतात; पण त्यांच्या सत्कृत्यांबद्दल कोणी कांहीं लिहिलें आहे काय ! दोषांबद्दल लिहिल्यानें दोष तुमच्या नजरेस आले. पण गुण मात्र आले नाहींत. कारण तुमचें मतच वाईट झालेलें ! हजारों लोकांस शिक्षण देण्यासाठीं झटणाऱ्या लोकांत १०-२० लोक तुमच्या नजरेस आले त्यावरून सरसहा तुह्मीं त्याच मालिकेंत गोंवतां? अहो, मिशनरी ह्मणजे सद्गुणाचे पुतळे असें माझें मुळींच ह्मणणें नाहीं. तेही आमच्याप्रमाणें मनुष्यच आहेत; त्यांच्यांतही आमच्याप्रमाणें दोष आहेत. ज्या महारमांगांस सर्व हिंदू लोक तुच्छ मानून ईश्वरदर्शनाचाही लाभ घडूं देत नाहींत, ज्यांची सावलीही आपल्या अंगावर पडूं देत नाहींत, त्यांना शिक्षण देणारे दुष्ट, आणि तुह्मीं चांगले ? आपल्या स्वजातीयांस रानटी अवस्थेंतून काढून त्यांची स्थिती सुधारून त्यांना ईश्वरकृपेचा लाभ करून देणारे, आफ्रिकेच्या अंतर्भागांत जाऊन परोपकारार्थ झटणारे मिशनरी

कोणीकडे ? आणि रानावनांत बसून अप्पलपोटेपणानें तप करून ईश्वरप्राप्ती करून घेण्यास झटणारे भट कोणीकडे ? ख्रिस्ती धर्मांचा प्रसार होण्यास त्याचें मूलतत्व जें मानवप्रेम तेंच कारण होय.

राजाश्रयानें धर्म पसरतो, किंवा राजधर्मा लोकांचें हातून सत्कृत्यें विशेष होतात असें आपलें मत आहे. यांत जर खरेपणा असेल तर तो थोडा आहे. सत्कृत्यास उदार आश्रय देणारे राजे आजपर्यंत किती झाले याचा विचार कराल काय ? ख्रिस्ती धर्म काय किंवा बुद्धधर्म काय राजाश्रयामुळें कुठेंच पसरला नाहीं. उलट State नें Church शीं किती संबंध ठेवावयाचा याबद्दल वाद आहे. दोन्ही धर्मांचा प्रसार निव्वळ लोकाश्रयानें झाला. जर त्यांच्यापासून सत् न होतां असत् झालें असतें तर एवढा प्रचंड व्यूह रचला गेला नसता. राजाश्रय हें एक साधन आहे. पण साध्य हेतु तरी मिशनरी काढतातना ? तो हेतु तुह्मीं काढीत नाहींना ? आमचे लोक अनेक गोष्टींत सरकारापाशीं दाद मागतां मागतां कंटाळले ह्मणून आतां त्यांनीं सरकारजवळ गाऱ्हाणीं नेण्याचें सोडलें ही गोष्ट मला प्रथमच कळली. अहाहा, दाद मागून कंटाळण्याइतका दीर्घोद्योग आमच्या लोकांत असता तर काय पाहिजे होतें ? अहो, माझ्या देशबंधूंनो ! माझी ताई ह्मणते त्याप्रमाणें खरोखरच जर तुमच्या अंगांतील अनुपम दीर्घोद्योग संपून तुह्मी कंटाळलां असाल तर स्वदेशसुधारणेची आशा सोडा. कां कीं इतक्यांतच तुह्मी कंटाळलां. अजून तुह्मीं केलें आहे काय ? सुधारणानगरींतील प्रज्वलित दीपांचा एक लक्षांश प्रकाश तरी तुह्मांस मिळाला आहे काय ? बाबांनो ! अजून तुह्मांला लाखों मैल प्रवास करावयाचा आहे रे ! ताईसाहेब, मी आजपर्यंत असें समजत होतों कीं, मिशनरी लोकांचा दीर्घोद्योग व बंधुप्रीति या दोन गोष्टींची आमच्यांत उणीव आहे; त्याचा बीजांकुर उद्भवत आहे. पण आपण ह्मणतां त्याप्रमाणें त्यांचें झाड होऊन वठून जाऊन त्याचा सत्यनाशही झाला असेल, तर मग स्वदेशसुधारणेसंबंधीं

**हताशे आशे तूं निघ निघ, नको संग लवही**

असेंच ह्मणावें लागेल. मिठाचें आपण उदाहरण दिलें, पण

तें कसें लागूं पडतें तें मला कळत नाहीं. मिशनरी लोकांचा दारूविरुद्ध प्रयत्न चालला आहे त्यांत त्यांस यश आलें आहे काय ! ज्या ठिकाणीं पैशाचा संबंध आहे त्या ठिकाणीं मिशनरी काय किंवा सरकार काय दोन्ही सारखेच.

राजाश्रयामुळें मिशनऱ्यांनीं काय केलें मला कळत नाहीं. राजाश्रय मिशनऱ्यांना आहे असें ह्मणण्यापेक्षां तुह्मांलाच ( negative ) आहे असें तुह्मी समजा. तुह्मांला राजाश्रय आहे. तुमच्या रीतीभातींत राज्यकर्ते पडत नाहींत, ( हाच Negative राजाश्रय ) ह्मणूनच तुह्मी आपल्या बायकांस पाहिजे त्या तऱ्हेनें वागवतां; दुर्दैवी बालविधवा १४-१५ वर्षांची झाली नाहीं तोंच तिला तीर्थ, पुण्यनदी अशीं मोठमोठीं नांवें देऊन ब्राह्मणांच्या पडशा भरण्याकरितां त्यांनींच केलेल्या जागांत नेऊन न्हाव्याकडून भादरवतां; शिव शिव, मला पुढें लिहवत नाहीं. जरा टांक खालीं ठेवितों. ताई, हें Negative राजसहाय्य जर तुह्मांला नसतें, आपल्या ह्मणण्याप्रमाणें मिशनरी लोकांचे स्वधर्मी राजे जर त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें सर्वथा करते, तर खरोखर वरच्यासारखा दुर्धर प्रसंग येऊन कानाकोपऱ्यांत तोंड दडवण्याची पाळी आज एकाही विधवेवर आली नसती. काय जें वाईट झालें असतें तें एवढेंच कीं, जुलमानें किंवा आपखुशीनें लोक ख्रिस्ती झाले असते; आणि हिंदू हे हिंदू झाले काय किंवा ख्रिस्ती झाले काय मला सर्वच सारखें ! कारण माझें धर्माविषयीं मत काय आहे हें तुह्मांस ठाऊक आहेच. तेव्हां ताईसाहेब, मिशनरी लोकांच्या हातून सत्कृत्यें होण्यास राजाश्रय कारण आहे हें म्हणणें मुळीच खरें नाहीं. हिंदू असो कीं मिशनरी असो, ज्या गोष्टींत ऐकावयाचें त्याच गोष्टीत सरकार ऐकेल. आमच्यांतील वाईट रीती मोडण्यास सरकारनें हात घालावा असें मिशनरीच नव्हे पण आमच्यांतील कित्येक लोकही ह्मणतात. पण नाहीं सरकार हात घालीत ! जिथें Political reasons किंवा Financial reasons आलीं, तिथें मिशनरींच्या दीर्घोद्योगाचाही उपयोग होत नाहीं; तर आमचा, पाण्यावरील बुडबुड्याइतकें ज्याचें जीवित, तो उद्योग कसा टिकेल ?

Contageous Diseases बद्दल ओरड कोणी नेटिव्ह पत्रानें केलेली आठवते काय.? ती ओरड मिशनरीनींच केली व त्यांस सिद्धीही आली. याचें कारण मिशनरी लोकांचा दीर्घोद्योग व त्यामध्यें Political किंवा financial reasons चा अभाव. राजपक्षाचा संबंध कांहीं नाहीं. सद्धेतु पाहिजे. आमच्यांत तो नाहीं. Selfishness आमच्यांत फार. कारण बहुतांशीं धर्मशिक्षण तसें.

४ अहो, बनामाच्या चुकीबद्दल तुह्मी कांहींच लिहूं नका. तुमच्याजवळ त्यावेळीं वेबस्टर कोश नव्हता तर त्याचा उपकार लोकांना काय ? चुकी आहेना ? पुढें मला पुष्कळ ल्याह्यायचें आहे. पण टपालाची वेळ झाली. वर लिहिलें आहे यावरून जर पत्रांत कांहीं बदल करावा असें वाटलें तर तो करून पत्र पाठवून द्या; ह्मणजे पुढील अंकीं छापीन. नसला कांहीं बदल करावयाचा तर तसेंच पाठवा. तसेंच नेऊन देईन. पण बनामाची चूक बिलकुल गाळा कशी. त्याचप्रमाणें पहिल्या आंकड्यांतही मी सांगितल्याप्रमाणें बदल करा. मीं आतां पुरें करतों, कारण टपालाची वेळ झाली.

आपला भाऊ

**हरी आपटे**

सर्व व्यर्थ ! माझा मोठा हेतू होता कीं माझें हें पत्र आणि इंदुप्रकाश बरोबर तुमच्या हातांत पडावें, ह्मणजे इंदुप्रकाशांत पत्र कां आलें नाहीं असें तुह्मांस वाटावयास नको. सही करून पत्र पोष्टांत नेलें पण आतां तें पत्र बडोद्यास * जात नाहीं असें जेव्हां पोष्टमास्तरनें सांगितलें तेव्हां परत आणलें. नाइलाजाची गोष्ट झाली; असो. तेव्हां आतां तसेंच पुढें लिहितों ह्मणजे झालें. नाहीं तरी एक मोठा मुद्दा लिहावयाचा राहिलाच होता तो असाः—

" आपल्या लोकांत अनेक धर्म व जाति आहेत त्यामुळें आमच्यांत ऐक्य होण्याची मारामार पडते; आणि त्यांत या ख्रिस्ती धर्मामुळें भर पडत

* मीं कांहीं कामानिमित्य बडोद्यास जाणार होतें. पण सुरतेहूनच परत फिरलें. त्यामुळें मला पत्रें उशीरां डहाणूस आल्यावर पोहचलीं.

का. का.

चालली आहे हें आमचें नुकसान ह्मणावयाचें कां फायदा ह्मणावयाचा ? ” असा आपला प्रश्न आहे. याच्याच शेजारीं मी आपला प्रश्न ठेवतों याचें उत्तर आपण काय देतां तें पाहूं !

आमच्या लोकांत पाश्चिमात्य विद्येचा प्रसार नव्हता तेव्हां लोक सनातन धर्माप्रमाणें वर्तन करीत. परंतु इंग्रजी विद्या आल्यापासून सर्व धर्म बुडाला. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं असें झालें. शूद्र लोक बिचारे वर डोकीं करीत नसत, ते आतां ब्राह्मणांशीं स्पर्धा करून त्यांचा अवमान करूं लागले. ब्राह्मणाब्राह्मणांतच काय पण प्रत्येक जातींत जुना व नवा असे पक्ष झाले, ह्मणजे मूळ जेथें १० जाती होत्या तेथें आतां २० झाल्या. प्रत्येक वर्गाचे पक्ष २. एक नवा ह्मणजे सुधारक आणि दुसरा जुना ह्मणजे सद्यस्थितीचे कैवारी यांचा. तर मग या पाश्चिमात्य विद्येचा आमच्यांत प्रवेश झाला हा फायदा ह्मणावयाचा कीं तोटा ? अहो, काय या इंग्रजी विद्येनें आमच्या समाजांत प्रलय करून सोडला आहे ? आमची एकी व्हावी कशी ? आमच्या बायका कीं हो आमच्या बरोबर नांदेनाशा झाल्या ! फिर्यादी करा कीं कांहीं करा, त्या साफ येत नाहीं ह्मणून सांगतात. हवी ती उठते आणि विलायतेस जाते. एक उठतो आणि आपल्या बायकोस अमेरिकेस पाठवतो. दुसरी बाई उठते आणि बेधडक आपला नवरा सोडून विलायतला जाऊन राहाते. शिव शिव कोण हा अनर्थ या इंग्रजांच्या विद्येनें केला आहे ! नको ही इंग्रजी विद्या ! असें जर कोणी ह्मटलें तर तुह्मी होस हो द्याल, नव्हे ! जर तुह्मी इंग्रजी विद्येला नांवें ठेवणार नाहीं, जर तुह्मी रखमाबाई-सारखीला * उत्तेजन देतां, आनंदीबाईसारख्या स्त्रिया आणखी निपजाव्या ह्मणून इच्छा बाळगतां, तर मग ख्रिस्ती धर्मावरच कां हो एवढें तुमचें हत्यार! ख्रिस्ती धर्म ज्ञानप्रसार करून बंधुप्रेमाचें शिक्षण देतो, जी इंग्रजी विद्या

---

* हा उल्लेख दादाजी वि. रखमाबाई या दाव्याबद्दल असला पाहिजे. या दाव्यानें त्यावेळीं समाजांत मोठीच खळबळ उडाविली होती. त्याची सविस्तर हकीकत केळकरकृत टिळकचरित्र--प्र. ८ पृ. १८६--९२ यांत दिली आहे. वा. ना. दे.

एवढी तुम्हांला आवडते, जी तुमच्या दृष्टीस पडल्याबरोबर, नवी बाहुली मिळालेलें मूल आपल्या जुन्या बाहुलीकडे ढुंकूनही पहात नाहीं, त्याप्रमाणें आपल्या जुन्या विद्येची स्थिती तुम्ही करून टाकली, मातृविद्येचें नांवही घेत नाहीं, तीच इंग्रजी विद्या— तुमच्या सुधारणेचें कारण, तुह्मांस मिळालेल्या प्रकाशनाचा उगम, धर्मकर्मसंबंधीं दुर्ग्रहरूप शृंखलांस तोडून टाकणारी, पण कोणच्याही विशेष विद्येच्या मार्गावर उपयोगी पडणारी मशाल, पारतंत्र्यमग्न जन जे लोहासारखे त्यांस स्वातंत्र्यरूपी सुवर्णमय करून टाकणारा परीस— अशी जी इंग्रजी विद्या तिचाच मिशनरी लोक प्रसार करीत आहेतना ? Love thy brothers खेरीज ते कांहीं शिकवतात काय ? तुह्मांस आपापसांत भांडा म्हणून सांगतात काय ? तसें ते तर सांगत नाहींतच; पण तुमची भगवद्गीता बरीक सांगते खरी ! भगवान् परमेश्वर म्हणतात " बा अर्जुना, अरे कसले आले आहेत मामे काके ! सोड बाण ! " आणि हें पूर्णपणें अर्जुनाच्या मनावर बिंबवण्यास १८ अध्याय गीता ! Religion of Amity जितका ख्रिस्ती लोकांत आहे तितका आमच्या लोकांत नाहीं — कारण एका ग्रंथांत एकाच ग्रंथाच्या एका भागांत जर Religion of Amity तर पुढच्याच भागांत Religion of enmity! ख्रिस्ती धर्माचे जे Dogmas आहेत ते सोडून द्या; पण त्यांचें मुख्य महत्त्व ख्रिस्ताचें उपदेशसार Love thy brothers हें आहे. याला कुठेंही विसंगतता नाहीं ! माझे मित्र व शिक्षक Father Rivington हे ते व मी एकवेळ बोलतां बोलतां म्हणाले कीं " आम्ही तुम्हां हिंदू लोकांपुढें दोन गोष्टी ठेवतों, Bible and Bottle. तुम्ही पहिली घेत नाहीं. दुसरी मात्र ताबडतोब उचलतां. " मीं त्यांस तत्काळ उत्तर दिलें कीं तुम्हीं म्हणतां ही गोष्ट खरी आहे. दोन्ही न घेणारे थोडे. कांहींतरी एक घेणारे आतिशय. त्या आतिशयपणाला मर्यादाच नाहीं. त्यावेळीं मीं त्यांस इतकेंच ह्मटलें, परंतु मी आज तुह्मांला असें सांगतों कीं, जितके ह्मणून या आपल्या देशांत बाटली घेणारे लोक आहेत तितक्यांनीं ती सोडून जर बायबल घेतलें तर मला वाईट वाट-

णार नाहीं. इतकेंच नव्हे उलट अतोनात आनंद होईल. ख्रिस्ती धर्मातील Dogmas कांहींहि असोत, आमच्या धर्मापेक्षां कल्पनेंत उदात्त तत्वांत तो कितीहि नीच असो; पण त्याचें आदितत्व जी बंधुप्रीति ती निःसंशय उदारमार्गीय आहे. दुर्बळांस व पतितांस उद्धरण देण्याचें काम आमच्या धर्मापेक्षां ख्रिस्ती धर्मानेंच अधिक केलें आहे. गरीबगुरीबांच्या उपयोगी पडणें आणि तेंही अंगमेहनतीनें असें तुमच्या हातून कधीं झालें आहे काय? शेजारच्या घरचें माणूस मेलें असतां त्याचेबरोबर पोंचवण्याचा प्रसंग येऊं नये ह्मणून कड्याकुलपें लावून बसणाऱ्या भटांनीं ख्रिस्ती धर्मास अत्यंत निंद्य ह्मणून शिव्या देणें फारच शोभतें! कोणत्याही धर्मांत जा, धर्मतत्वें दोन. एक आशा आणि दुसरी भीति. ईश्वराच्या कृपेची आशा आणि त्याच्या दंडाची भीति.ज्या धर्मांत आशादर्शन अधिक तो धर्म चांगला.आह्मीं पडलो अप्पलपोटे, आह्मी लोकांस दूर सारतों. आमच्या मतें आमचा धर्म चांगला. खरा ईश्वरप्राप्तीचा मार्ग तोच. असें जर आहे तर कां हो इतरांना आव्हान करून सुखाचा वांटा देत नाहीं? कां हो त्यांना दूर ढकलतां? ख्रिस्ती धर्म असें करतो काय? त्यांचा ईश्वर एकास अलीकडे ये आणि दुसऱ्यास पलीकडे जा असें ह्मणतो काय? पुराणांतरीं तुह्मीच सांगतां कीं 'अजामिळ, अघासुर, व्रजवधू, बकी, पिंगळा, अशा गति दिली–'. परंतु आज एखाद्याच्या हातून यःकश्चित् चुकी झाली किंवा तो परदेशगमन करून आला, तरीही तुह्मीं त्यास दूर लोटून पंक्तिपावन करूं नये, इत्यादि तुमच्या कृती मुळींच दुही माजवणाऱ्या नव्हेत! एक वेळ कळून वा नकळून ह्मणा, चुकी झालेल्या लोकांस–पतितांस ह्मणा पाहिजे तर–नरकवासाच्या भीतीखेरीज कांहींही न देणारा, व म्हणून निराशा करून त्याच पापांत गटंगळ्या खाण्यास लावणारा तुमचा धर्म तुह्मांस फायदेशीर जास्त असेल तर तुमचा तुह्मांस लखलाभ होवो.

तुह्मी म्हणाल, आह्मीं आपल्या पुराणांत अशा अनेक गोष्टी वर्णन करून ठेवल्या आहेत कीं, अमुक असुर अत्यंत पापी पण त्यास ईश्वरानें उद्धारलें हें उत्तेजन काय थोडें झालें? कबूल, तुह्मीं ह्मणतां त्याचप्रमाणें

पुराणांतरीं लिहिलें आहे. पण त्याचा उपयोग काय? जे तुह्मी आमचे धर्मबंधू धर्मोपदेशक हरहमेश, लहानसान कां होईना पण, पापाचरण केल्याखेरीज रहात नाहीं, खोटें बोलल्याशिवाय एक घटकाही जात नाहीं, पोरांना धाकदपटशा दाखवतांना 'तो पहा आला बाऊ आतां टाकते त्याच्याजवळ तुला' इत्यादि बोलून तरी निदान खोटेपणा पदरीं घेतां, पापाचराणावांचून व्यवहार होत नाहीं (मग तें पाप किती कां यःकश्चित असेना, पण पाप तर खरें?) असें स्पष्ट म्हणतां, पाप ह्मणजे काय, तें माणसाच्या हातून कसें घडतें हें तुह्मांला माहीत असूनसुद्धां तुह्मीं जर होईल तेवढीसुद्धां क्षमा करीत नाहीं; पापी लोकांस किंबहुना दारिद्र्यपाप ज्यांच्या पदरीं पडलें आहे अशांसही दूर लोटून कुशब्द बोलून धर्मबाह्य करतां; तर ज्या ईश्वरास पापकर्माचा अत्यंत तिटकारा; जो अत्यंत शुद्ध; तो ती क्षमा करील असें तुमचें सांगणें लोकांस तेव्हांच खरें वाटेल नव्हे? ख्रिस्ति धर्म असें करीत नाहीं. तो सर्वांस आशा दाखवितो; कोणाला दूर लोटीत नाहीं 'या मानव हो, आपण सर्वजण मिळून ईश्वरप्राप्ती करून घेऊं. आपल्यापैकीं अशक्त असतील त्यांस या जीवितमार्गावरून प्रवास करण्यांत मदत करूं. जे वाट चुकून जातील त्यांस परत मार्गावर आणूं व आपल्यांत घेऊं' असें शिकवणारा ख्रिस्ती धर्म जर दुही माजविणारा, तर मग तुमच्या धर्मास काय ह्मणावें? अहो, ईश्वराच्या घरीं सर्व सारखे तर आपण तसेंच मानून सर्वांस ज्ञानदान करूं; सर्वांस त्यांचे हक्क शिकवूं; एकमेकांच्या उपयोगी पडण्यास लावूं; अंतीं त्यांस सद्गति देऊं: 'इहलोके सुखं भुक्त्वा चांते सत्यपुरं ययौ' असें करूं; असें सतत ह्मणणाऱ्या व त्याप्रमाणें करणाऱ्या मिशनरी लोकांवर दुही माजविण्याचा आरोप ठेवणें म्हणजे इंग्रजींतील एका म्हणीप्रमाणें आचरण करणें होय. Give a a dog bad name and hang him. कुत्र्याला गोळी घालायचें मनांत आलें म्हणजे त्याला कांहींतरी नांवें ठेवावीं आणि मारून टाकावें. तुम्हीं म्हणतां अशी दुही राष्ट्राला विघातक आहे. मी म्हणतों विघातक नाहीं इतकेंच नव्हे तर उलट सहायकारिणी आहे. एकतर 'गाडाभर

ओझ्यांत सुपाची काय कथा' या म्हणीप्रमाणें तुमच्या या १८००० भेदांत या नव्या भेदाची काय कथा ? ज्यावेळीं मुसलमान, पारशी, फार कशाला ब्राम्हण, शेणवी, इत्यादि लोक अगदीं एक होतील त्यावेळीं ख्रिस्ती लोक मागें घेतील व राष्ट्राच्या कार्याला विघ्न आणतील हें तुम्हीं मनांत सुद्धां आणूं नका. ज्यांनीं ही राष्ट्रहिताची कल्पना तुमच्या डोक्यांत घातली ते देखील ख्रिस्तीच होते; आणि त्यांचे अनुयायी तुमच्या विरुद्ध जातील असें कां म्हणतां ? राष्ट्रीयसभेविरुद्ध मुसलमान उठले, पारशी उठले, ब्राम्हणही होते; किंबहुना शेणवी पुढाकार घेणार असतील तर आम्ही त्यांत मन घालणार नाहीं असें ह्मणणारे ब्राह्मणही येथें आहेत. परंतु हिंदुधर्मी हिंदु त्यांत आहेत तर आम्हीं त्यांत मन घालणार नाहीं असें म्हणणारा किंवा राष्ट्रीय सभेच्याविरुद्ध Native Christian एक तरी आढळला आहे काय ? उलट ख्रिस्ती त्यांत खटपट करणारे आहेत. राष्ट्रहिताला एक धर्म लागतो असें नाहीं. तर Identity of Political Interests पाहिजे. तें असलें ह्मणजे ऐक्य तेव्हांच होतें. मी कांहीं दिवसांपूर्वी What is a Nation? (Qu'est ce qu'une Nation) या नांवाचें M. Revan यांनीं लिहिलेलें व्याख्यान वाचलें. त्यांत त्यांनीं बहुतांशीं असेंच सिद्ध केलें आहे. ख्रिस्ती मंडळीपासून आह्मांस साह्य मिळेल असें मी ह्मणतों याचें कारण इतकेंच. ती शिक्षित झालेली असते. राष्ट्रहित त्यांस कळतें. तेव्हां अर्थातच त्यांचा व त्यांच्यासंबंधें इतर मिशनरींचा आम्हांला उपयोग करून घेतां येईल. मिशनरींच्या उपयोगानें आमच्यांत दुही माजेल असें ह्मणत असाल, तर पाश्चिमात्य विद्येवर तोच आरोप ठेवून तिच्यापासून आमचें अत्यंत नुकसान झालें असें विधान करण्यास तयार व्हा. तसें नसेल तर मिशनरी लोकांवरून तो आरोप काढून घेण्यास तयार व्हा. माफ करा. तुह्मी ख्रिस्ती धर्म स्वीकारला नाहीं; फक्त इंग्रजी विद्येनें, नवराबायकोनें हिंडावयास जाण्यास काय हरकत आहे, ओंवळ्यानें जेवलें म्हणून काय झालें, कुत्र्यास शिवलें म्हणून काय होतें, असे विचार तुमच्या मनांत उद्भवून प्रत्येक सुधारकानें जी गोष्ट केली पाहिजे, ( आपल्या

विचाराप्रमाणें आचार ठेवावा ) ती तुम्ही करतां; व त्यामुळें गांवांत कुणा बायांच्या घरीं गेलांत कीं त्या तुम्हांस कुंकूहि लावीत नाहींत; [ तुम्हांला शिवायचें नाहीं असा त्यांचा हेतु ] हें दुहीस कारण नाहीं कां हो ? नावडतीचें मीठ आळणी या ह्मणीप्रमाणें कां उगाच ख्रिस्ती धर्मावर आग पाखडतां ? वाईट गोष्टी त्यांच्यांत होतात, नाहीं कोण ह्मणतो ? पण बऱ्या वाईटाची वजाबाकी करून बाकी जें राहील त्यावरून जर बरेवाईटपणा पहावयाचा असेल तर ख्रिस्ती धर्माचे मिशनरी आमचें पुष्कळ हित करीत आहेत असें ह्मटलें पाहिजे.

धर्मखातें हिंदुस्तानांत आहे, पण त्याचा व मिशनरी लोकांचा कांहीं-एक संबंध नाहीं. फक्त सरकारी पगाराचे Bishop, Lord Bishop वगैरे लोक आहेत. त्यांचा व मिशनरींचा साधर्म्याखेरीज कांहीं संबंध नाहीं. सरकारची मिशनरी लोकांस एवढीच मदत आहे कीं, त्यांच्या शाळांस Grants in aid सढळ हातानें मिळतात; त्यांना शाळेसाठीं इमारती बांधावयाच्या झाल्यास त्यांनीं तयार केलेली रकम देण्यास फार-आढेवेढे घेत नाहींत. आह्मांलाही अशा मदती मिळतात, पण थोडा त्रास करावा लागतो. या शिवाय कांहीं मदत सरकारांतून मिशनरी लोकांस होत नाहीं. त्यांना चर्चें बांधण्यास किंवा कोणास बाटवण्यास मुळींच पैसा मिळत नाहीं. उघडपणें हो ! मग गुप्तपणें मिळत असल्यास त्याची माहिती मला नाहीं. आणि मला वाटतें तुह्मांलाहि नसेल.

तुम्हांला Aunt या शब्दाचा अर्थ ठाऊक नाहीं ह्मटलें कोणीं ? जर कोणीं असें ह्मटलें नाहीं तर मग तुह्मी त्या शब्दावर एवढी चर्चा कां करतां ? तुम्ही म्हणतां Aunt या शब्दाचा अर्थ करण्यांत तुमची चूक नाही. कां नाहीं ? प्रत्यक्ष रमाबाई सांगतात कीं, माझें व आनंदीबाईचें नातें मावशीभाचीचें. आतेभाचीचें नव्हे. तुह्मीं लिहिलें आहे आतेभाचीचें. मग तुमची चूक नाहीं कशी? तुमचा समज असा झाला. तुह्मांला अमक्यानें असें सांगितलें नाहीं, तुमची कल्पना तशी झाली, असें म्हणण्यांत तात्पर्य

काय ? ज्यां परीक्षेंत आमचें उदाहरण चुकलें आणि आम्हीं जर त्या परीक्षकांस म्हटलें " अहो ही माझी चूक नाहीं; जेथें कागदांत x आहे, तेथें मला y वाटला, आणि माझा असा समज Superviser नें दूर करावयाचा तो केला नाहीं " तर काय उपयोग होईल ? फार झालें तर एवढें म्हणतील कीं " होय बुआ, तुझ्या हातून तशी चूक होण्याचा संभव होता खरा. " पण एवढ्यावरून माझी चूक नव्हे असें सिद्ध होतें काय ?

येथपर्यंत तुमच्या पत्रासंबंधींच मजकूर झाला. मला कांहीं खाजगी मजकूर लिहावयाचा होता. माझ्या मनाच्या सद्यःस्थितीबद्दल लिहावयाचें होतें तें राहिलेंच. असूंद्या. पुनः लवकरच पत्र लिहीन त्यांत लिहीन.

Tuesday, August, 20

Recieved [1] Balasaheb's quite obviously autobiographical story. I am very much delighted with his diction and art of painting. I have liked the story very much; but then do you guarantee that the next part will follow very soon ? If not, I am not for publishing it. We have already got some unfinished things. What will the subscribers say if we add on to that sum ? You blame me for leaving my essay unfinished; our Mogre's pieces are unfinished. My novel has not as yet got to its end. And who knows ? Balasaheb may not send in the उत्तरार्ध. The story s beautiful. I have liked it most; but then if it

---

१ हे बाळासाहेब कोण मला आठवत नाहींत. कदाचित प्रवरा संगमचें एक पूर्व पिढीचें श्रीमंत गृहस्थ, खालावलेले, मोठे रसिक, बुद्धिवान् असे येत असत. त्यांनीं त्या गोष्टी लिहिल्या असाव्या. त्यांचे नांव बाळासाहेब होतें.

का. का.

remains unfinished what will be the use? How are the subscribers to put faith in our promises? If you see no weight in these objections of mine, please write to Mr. Kulkarni to send the story to the press. I have sent it to him and have written to the effect that he should defer sending the story to the press until he receives some word from you. माझी इच्छा फार आहे कीं, ती गोष्ट आपल्या पुस्तकांत अवश्य यावी. त्या योगें एका भावी ग्रंथकाराची महाराष्ट्र-जनांना ओळख होईल; जर कां ती माझ्या निबंधाप्रमाणें अगर मोगऱ्यांच्या कवितांप्रमाणें असमाप्तच राहिली तर काय होईल याचा विचार करा. त्यांतून आणखी, निबंधांची व कवितांची गोष्ट निराळी. त्यांचेकडे लोकांचें लक्ष नसतें. गोष्टींकडे लोकांचें लक्ष फार. त्यांतून ही गोष्ट विशेष चटकदार अशी आहे. याचा विचार करून तुमचें दोघांचें काय तें ठरतांच कुलकर्णी यांस पत्र लिहा. ह्मणजे तुह्मी मला लिहून मी त्यांस लिहिण्याइतका वेळ जाऊं नये. त्याचप्रमाणें मलाही त्याच वेळीं पत्र टाका.

आपला भाऊ

**हरि आपटे**

आपल्या भावजयीची प्रकृति बरी आहे.

---

२६

मुंबई, गिरगांव-सदाशिव गल्ली,

सप्टेंबर ता. ४ सन १८८९

ती. सौ. काशीताई कानिटकर

वडिलांचे सेवेशीं

बालकाचे शिरसाष्टांग नमस्कार वि. वि. आपलीं एक दोन कार्डे आलीं. त्याप्रमाणें मी आपणांस पत्र पाठवावयाचें, परंतु कामरेजचा पत्ता काय लिहावा हें मला कळेना. आजच डाहाणूहून तात्यांचें पत्र आलें त्यांत

त्यांनीं "रा. रा. [1] वामनराव पंडित यांनीं कामरेजेस मंडळींस सुखरूप पोहों-चविल्याचें" लिहिलें आहे. तेवढ्यावरून मी हें पत्र त्यांच्या पत्त्यावर लिहित आहें. नाहींतर मला कांहीं नांव आठवलें नव्हतें. अस्तु. आपण लिहिल्या-प्रमाणें आपलेकडे पुस्तक पाठविण्याविषयीं रा. कुळकर्णी यांस लिहिलें आहे. मि. रा. बाबा यांस First Principles विषयीं पत्र लिहिलें. त्याचें उत्तरही आलें. खरोखर ह्मटलें ह्मणजे मी आपणांस याचे पूर्वीच एक मोठें पत्र लिहिणार होतों, परंतु आपलें मागलें पत्र आल्यावर कांहीं कारणामुळें लिहिलें नाहीं. आणि याही पत्रांत मी विशेष कांहीच लिहि-णार नाहीं. कारण आपण त्या ठिकाणीं मित्रमंडळींच्या सुखसमागमांत गर्क झाल्यामुळें असें उगीच चऱ्हाटासारखें लांबच लांब पत्र पाठविणें, आणि तें आपणांसच वाचण्यास लावणें मला प्रशस्त वाटत नाहीं. आपण Mrs. Haliburton's Troubles पाठविलें तें पावलें. आपणांस तें कसें काय वाटलें तें आपण लिहिलें नाहीं. मी हल्लीं जिब्लासचें चरित्र वाचीत असतों. त्याचीं शंभर एक पानें राहिलीं आहेत. काल रोजीं मी एक फार मजेदार पुस्तक विकत घेतलें आहे. त्याचें नांव Jacques Bon homme (भला बिचारा जाक्). हें John Bull and his Island च्या कर्त्यानें लिहिलें आहे. इंग्रजांचें टोपण नांव जसें 'जॉन् बुल्' आहे तसेंच फ्रेंचांचें टोपण नांव "जाक् बॉनॉम्". आहे. त्यांत कर्त्यानें फ्रेंच लोकांची एकंदर माहिती दिली आहे.

भाषा फारच चटकदार व विनोदी आहे. आपण वाचून पहावें असें मला वाटतें. माझें वाचन झालें ह्मणजे पाठवून देऊं ? आपल्या भावजयीची प्रकृती बरी आहे. रा. रा. वामनराव पंडित यांची व माझी ओळख नाहीं.

---

१ कै. वामन सखाराम पंडित हे गृहस्थ बडोदे राज्यांत पोलीस खात्यांत नोकरी होते. त्यांची वडील कन्या ताईबाई पंडित ही कवयित्री होती; तिची माझी पत्रोंपत्रीं ओळख होती. ती प्रत्यक्ष व्हावी ह्मणून मी त्यांचे-कडे कामरेज येथें गेलें होतें. हें गांव तापी नदीच्या कांठीं सुरत जिल्हा काठोर तालुक्यांत आहे.

का. का.

तरी त्यांची ओळख व्हावी असें मी इच्छितों असें त्यांस सांगा. त्यांची कन्या ताईबाई यांसही आपणांस योग्य वाटल्यास माझे नमस्कार सांगा. इतर नवल वि. कांहीं नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

आपला भाऊ

**हरि आपटे**

---

२७

Dear Sister,

What do you think of this act [१] of Mr. Agarkar? Did you know of it before? Is it not an act worthy of a great man? In these days of servile obedience to custom and public opinion, are not those men great, who unflinchingly come forward, try to break the fetters, and advise others to do the same? I was so very glad to read the prospectus, that my first thought was to go and give my respects to the worthy professor with these words. "Well done, Prof. Agarkar, you are a great man. Expose those jackdaws under the garb of peacocks, and if you allow me, I shall very gladly and enthusiastically assist you in plucking off their false feathers." But unfortunately I am no one since I am not a

---

१ कै. प्रो. आगरकर व लोकमान्य टिळक यांच्यांत केसरींतील लेखांबद्दल मतभेद होत असे. आगरकर सामाजिक सुधारणांवर लेख लिहीत ते लोकमान्यांना पसंत पडत नसत, नापसंत लेख फाडून टाकण्यांत येई. या मतभेदापेक्षां आपण आपले विचार स्वतंत्र पत्र काढून प्रतिपादावें म्हणून प्रो. आगरकरांनीं **सुधारक** काढला ही गोष्ट वर उल्लेखिली आहे. का. का.

आगरकरांचा केसरीशीं संबंध २५ आक्टोबर १८८० रोजीं सुटला व त्या नंतर १८८८ सालीं त्यांनीं सुधारक काढला. वा. ना. दे.

३८३०

graduate. Day will soon dawn when I shall have a paper of mine. It is not distant. Till then good bye to you, my thoughts of reform and civilisation !

What do you think of the letter on केशवपन in the ज्ञानप्रकाश ? I don't know whether it is really from the pen of a lady. I Shall let you know if I get the information. I am very glad to tell you that my book[1] is a great success. More than 800 copies are already sold . Subscribers from all sides of India almost poured in. And it is not yet 2 months. The first copy was dispatahed ( and that to you) on, I think, the 23rd of June. Bombay alone bought 350 and wants 150 more. What do you think of the business ? The number of ज्ञानप्रकाश you want will be sent soon. The Editor has promised me to give a copy soon. Do you receive the paper in exchange for our Magazine ? The Manager promises to send it. Nothing more from your dear brother

Hari N. Apte.

---

२८

लोणावळें:

मार्च ता० २५ सन १८९२

प्रिय ताल्या व ताई,

आपल्या प्रकृतींचा कालच्या पत्रांतील मजकूर वाचून माझी काय स्थिति झाली असेल याची तुह्मींच कल्पना करा. माझी स्वतःची विशेषशी सुधारली नाहीं. आज बरेच दिवस सकाळच्या प्रहरीं अंथरुणावरून उठतांना माझी पाठ जड होते, व उगीच पडूनच राहावें असें वाटतें. जर मी आपो-

---

१ हें पुस्तक ह्मणजे बहुधा " **आजकालच्या गोष्टी-मधली स्थिति**" हें असावें.
वा. ना. दे.

आप जागा झालों तर नुसतें उठवत नाहीं एवढेंच. परंतु आवाज होऊन अगर कोणी हांका मारल्यावरून जर जागा झालों, तर चक्कर येऊन पुढें दिसत नाहीं व उठून उभें राहवत नाहीं. सुमारें अर्ध मिनिट असें होतें. मग कांहीं वाटत नाहीं. दिवस वाचण्याविचण्यांत बरा जातो. संध्याकाळीं मी हिंडायला देखील जातों, पण पहिल्यासारखें जोरानें चालतां येत नाहीं. बाकी जेवण बरें जातें. झोंप बरी येते. इतर सर्व व्यापार ठीक होतात. पाठ-दुखणें, खांदे दुखणें, डावा हात, पायाचे चवडे हें चाललें आहे. बरा, पहि-ल्याप्रमाणें होईन तेव्हां खरा.

'**खरी कां खोटी**' तुझी वाचून तुम्हांला आवडली हें वाचून मला आनंदापेक्षां आश्चर्य फार वाटलें. मला ती गोष्ट आपल्या हातून बरी वठली आहे असें वाटत नाहीं. याचें कारण सांगतों. 'पाडव्याला भेट' ज्यावेळीं लिहिली त्यावेळीं राधाबाई, कृष्णराव वगैरे मंडळी मला अगदीं खरी अशी भासून त्यांच्या आनंदाबरोबर आनंद, शोकाबरोबर शोक याप्रमाणें माझ्या मनाचें तादात्म्य झालें. तिसरें प्रकरण लिहित असतां मी कितीतरी वेळां लिहीत असलेला कागद पलीकडे सारून डोळ्यांवाटे गालांवर घळघळणारे अश्रु पुसण्याकरतां उपरणें घेतलें असेल. पुरी झाली तेव्हां मी आपल्या स्वतःशीं असा उद्गार काढला कीं, "जरी सर्व दुनियेनें या गोष्टीस नीरस म्हटलें तरीं मी कालत्रयींही म्हणणार नाहीं." "**खरी कां खोटी**" ही गोष्ट मीं ५ दिवसांत लिहिली. पण मला त्यांतलीं पात्रें कळसूत्री बाहुल्याप्रमाणें आहेत असें वाटलें. खरीं वाटेनात. मला रडूं तर कोठेंही आलेलें नाहीं. असो. एकंदर लोकांस व वर्तमानपत्रांस जर बरी वाटली तर चांगलेंच झालें म्हणावयाचें ! अगोदर यंदां मासिक पुस्तकाच्या नियामितपणांत हयगय झाली आहे. त्यांतही पाडव्याचा अंक न निघता तर मग **मनोरंजनाची** फार फजीती झाली असती. तो प्रसंग टळला एवढ्यानेंच मी आनंद मानतों. वरकड नवल वि. कांहीं नाहीं.

आपला भाऊ

**हरि आपटे**

लुच्च्या गुलामा * वामना, तुला रोज रोज गोष्टी वाचायला पाहिजेत काय ? दम धर तुझी माझी गांठ पडूं दे, म्हणजे तुला सांगेन गोष्टी! तुझें तें आनंदवृत्त कसें, काय चाललें आहे ? आम्हांला त्याचा अंक येत नाहीं, याबद्दल आम्ही आपलें **मनोरंजन** तुझ्या हातीं पडूं नये अशी तजवीज करणार आहों, समजलास! माधवरावाची प्रकृति कशी काय आहे ? त्या किशीला एक फारच चांगला नवरा पाहिला आहे असा माझा तिला निरोप सांग.

---

## २९

पुणें बुधवार पेठ

नोव्हेंबर ता. ६ सन १८९२

बालकाचें मनःपूर्वक साष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष. ताई, आज किती दिवस पत्र लिहीन, लिहीन असें म्हणतों आहे. आपल्याकडून पत्र आलें कीं त्याचें सविस्तर उत्तर **उद्यां** लिहावयाचें असा बेत झाल्याखेरीज एक दिवस–एक संधी–देखील गेली नाहीं. परंतु आळसाच्या अतिरेकानें–प्रेमाच्या ऱ्हासामुळें नव्हे हो, खास नव्हे–ती **उद्यां** कधींच उजाडली नाहीं. सविस्तर पत्र लिहावयाचें म्हणून लहानसान पत्र लिहिण्यांत तात्पर्य नाहीं. आणि सविस्तर पत्र लिहिण्यास त्या कधीं न उगवणाऱ्या **उद्यां** खेरीज वेळ नव्हता. मग आतां आपल्याला दोष देण्याला जागा कोणची? सांगा. मी ‘ जाऊं द्या कीं, लिहूं सावकास पत्र! ’ असें कधीं मनानें सुद्धां म्हटलें असेल, तर मग बेलाशक कानउघाडणी करण्यासाठीं त्याला पिळून झाडावा; पण तसें कधींच झालें नाहीं. मी त्या कामाला जो वेळ नेमला तो अगदीं नजीकचा ‘ **उद्यां** ’. त्यापेक्षां अगदीं नजीकचा वेळ काय तो एकच ‘ **आतां** ’. पण तो माझ्या ताब्यांत नव्हता. त्याचा धनी निराळा होता. तो स्पष्ट मला सांगे कीं, बाबारे ‘ **आतां**’चा वेळ माझा;

---

* माझा मधला मुलगा; तो एक हस्तलिखित छोटेसें मासिक काढीत असे; त्यावेळीं त्याचें वय ९ वर्षांचें होतें.

का. का.

'**उद्यां**' चा तुझा. आणखी मी तर सर्वथा त्याच्याच स्वाधीन सांपडल्यामुळें **आत्तां**च्या खालोखाल जवळ जो '**मग**' उर्फ '**उद्यां**' त्यावर आपलीं कामें टाकून '**आत्तांच्या**' धन्याची सेवाचाकरी करण्यांत गढून जात असें; व त्या सेवाचाकरीनें दमलों ह्मणजे थकवा जाऊन हुषारी येण्यासाठीं **उद्यां**च्या मृगजळाचे दोन घुटके घेतले कीं, कामच झालें. मग पुनः तहान लागेपर्यंत आळसमहाराजांची यथासांग सेवा करण्याला हरकत नाहींच. असो आपल्याला विनंती एवढीच करावयाची कीं, पहिलें मन्वंतर बदलून, आतां, आपल्यासारख्या परमपूज्य मित्रालाही दूर सारून दुसऱ्या एक सदानिकट-अगदीं शरीरस्थच--( ज्याला नीच लोक 'शरीरस्थो महारिपुः' असें ह्मणून व्यर्थ निंदतात ) अशा महासुहृदानें चित्त हरण केल्यामुळें, आपल्या सारख्यांससुद्धां उद्यांवर लोटून देण्याची मला दिक्कत वाटत नाहींशी झाली आहे. **करमणूक** गुरुवार झाला कीं कानच जेव्हां पिळते, तेव्हां मुकाट्यानें डोळे उघडावे लागतात; आणि तिचें भावंड **मनोरंजन** ही आपल्या बहिणीचेंच अनुकरण खास करणार. तें त्या दोघांनाही सर्व साधो एवढीच इच्छा आहे. पुनः एकदां असो.

दिवाळीच्या आधीं आपलें पत्र आलें. त्यांत आपण मला येण्याविषयीं लिहिलें होतें. पण पहा अं ? ज्यावेळीं इतरांचे सुटीचे दिवस, त्या वेळीं आमचे यजमान आनंदाश्रमाचे मालक येथें आल्यामुळें कोठें हलण्याचा संभवच खुंटतो. इतर एखादी वेळ साधावी, तर आह्मी मालक यामुळें हलायची पंचाईत ! मिळून काय झालें तें पहा ह्मणजे झालें. बाकी माझा जीव असा तळमळला, आणखी तळमळतो आहे, कीं कांहीं सांगायला येत नाहीं. आपल्याला पाहिल्याभेटल्याखेरीज दोन चार महिने झाले कीं, केव्हां एकदां आपली भेट होऊन चार घटका शांतपणें बोलत बसायला सांपडेल असें होतें. गतवर्षी नागपुरास गांठ पडली त्यावेळीं मला किती आनंद झाला तें मी कितीदां बरें बोलून दाखविलें. गेल्या मे महिन्यांत आपण येथें असून नसून सारखेंच झालें. दुसऱ्याच्या घरीं ती मंडळी समक्ष असतांना बोलत बसण्यानें जें काय समाधान व्हावयाचें तेवढ्यावर संतुष्ट राहणारें माझें मन नसल्यामुळें मला फारफारसें यावेसें वाटेना. तुह्मी व मी एकटे स्वतंत्र जागीं असतांना ह्मणजे कांहीं मोठीं हितगुजें असतात असा तर भाग नाहींना, परंतु दुसऱ्याच्या देखत मनाला मोकळेपणा

वाटतच नाहीं त्याला काय करणार? मी तुमच्या घरीं येऊन महिना महिना राहणें, हें जेव्हां शक्य होतें तेव्हां घडलेंच, आणखी केव्हां घडलें तर घडेल, अशक्य नाहीं. परंतु तुह्मीं **माझ्या घरीं** ( हे दोन शब्द लिहितांनाच मला विषाद वाटून हसूं येतें आहे ) येणें या जन्मांत तर कांहीं शक्य नाहीं. पुनर्जन्म आहे ह्मणणाऱ्यांचें ह्मणणें जर खरें असलें, आणि त्यांच्या ह्मणण्याप्रमाणेंच या जन्मीं ज्यांची कांहीं आशा राहिली असेल त्यांची ती आशा दुसऱ्या जन्मांत पुरी होते हेंही जर खरें असेल, तर त्यावर भिस्त ठेवून इथून लवकर जातों केव्हां? एवढीच वाट पहाण्यांत समाधान मानून घ्यावें. कारण **माझें घर** या जन्मांत माझ्या हातून होईलसें दिसत नाहीं. हें माझें लिहिणें भागूबाईसारखें वाटेल. नव्हे? पण करावयाचें काय? आपल्या जवळ उघड बोलायचें नाहीं, तर बोलायचें केव्हां? पण छेः, असल्या असमाधानाच्या व असंतोषाच्या गोष्टी काढून आपल्याला उद्विग्नता आणणें हेंही बरें नव्हें; तेव्हां हेंही असोच.

* करमणुकीनें बिचारीनें यंदांही तोटाच आणला. वर्गणीदार पुरे हजार नाहींत. आणखी खर्च १४००. दुःखांत सुख एवढेंच कीं यंदां बरें ह्मणून

---

* '**करमणूक**' पत्र काढावयाचा रा. हरीभाऊंचा फार दिवस विचार चालू होता. प्रथम जेव्हां **मनोरंजन** काढलें तेव्हां कानिटकर आणि मंडळी या नांवानें तें निघावें, पुढे शेअर वगैरे काढून पुस्तक प्रसिद्ध करणारी मंडळी काढावी असा त्यांचा विचार झाला. व त्याच प्रसिद्ध करणाऱ्या मंडळीमार्फत डॉ. जोशींचें चरित्र त्यांनीं प्रसिद्ध केलें. नंतर **करमणुकी**चा बेत होऊन ती त्याच मंडळीच्या मार्फत निघूं लागली. मंडळीच्या भागीदारांत हरीभाऊ एक होते व मीही होतें. **करमणूक** चांगली चालत असून हरीभाऊंचा पाय सदोदित त्यापायीं खोलांतच होता.! एखादी कादंबरी छापावी आणि तिचें उत्पन्न **करमणुकीच्या** पडलेल्या भगदाडांत भरावें असें त्यांचें शेवटपर्यंत चालू होतें. कुळकर्णी मंडळी स्नेहांतली होती; पण हरीभाऊंना हा असा अनुभव आला! पुढें रा. बाबाजी सखारामानें आपलेकडे **करमणूक** घेऊनही त्याचप्रमाणें कृती केली!! आणि करमणुकीच्या पायीं हरीभाऊंच्या सर्व कादंबऱ्या पराधीन झाल्या!! का. का.

घेतलें. गतवर्षीप्रमाणें कोणीं नाकें मुरडलीं नांहींत. आतां **करमणुकीचें** अक्षरशः " नच खलु परिभोक्तुं नापि शक्नोमि हातुम् " असें झालें आहे. **'पण लक्षांत कोण घेतो'** चें पुस्तक एवढ्या जलदी काढण्याचें कारण काय? तर ज्याप्रमाणें उरलेल्या **आजकालच्या गोष्टी**च्या प्रतींच्या विक्रीचा पैसा गतवर्षीच्या तोट्याच्या खड्यांत घातला, त्याप्रमाणें यंदांचा खड्डा भरण्यासाठीं याचें उत्पन्न तयार करावयाचें ! ज्याप्रमाणें वर एक गोष्ट या जन्मांत होईलसें वाटत नाहीं ह्मणून ह्मटलें, त्याचप्रमाणें कोणत्याही कामांत यश आणि मी यांचीही सांगड त्या अवधींत होईलसें दिसत नाहीं.

" अहो, घरांत नव्या विचारांचीं माणसें असणार एक नाहीं तर दोन, आणि बाकी असणार भाराभर. तेव्हां ते कसलं प्रत्येकाला जुळणार ? नुसता रूढीच्या विरुद्ध शब्द काढायचा अवकाश कीं, आलींच सारीं कावकाव करून चोंचींनीं टवके काढायला ! " [१]हें वाक्य मीं कालच लिहिलें आणि हा पहा आज बिचारा वामन [२]जवळच्या खुर्चीवर रडत: बसला आहे, व त्याचें आणखी एक उदाहरण देऊन असती नसती शंका दूर करीत आहे. त्याच्या मनांत पर्शिअन् शिकवायचें आहे, तर आतां त्याची तशी सोय करावी वगैरे मजकुराचें आपलें पत्र येतांच मी त्याला बोलावून आणून विचारून न्यू इंग्लिश स्कूलमध्यें जाण्याविषयीं सल्ला दिली. परंतु उपयोग काय ? त्यानें घरीं ती गोष्ट काढतांच काकासाहेबांनीं [३]" बरें, तर तूं येथें हैस्कुलांतच जवळच्या जवळ जा. I do not want you to be a reformer. We do not want our boys to be so. If you go to the New School you are sure to be one. " असा हुकूम केला. तोही कसा ? बिचाऱ्याला दादांशीं [४]बोलायला सांपडूं नये ह्मणून त्यांच्या देखतच " कां दादा, असंच कीं नाहीं " असें ह्मणून, दादांनीं काय " हो तुला ठाऊकच आहे कां तें; आमचीं पोरं नको-

१ ' पण लक्षांत कोण घेतो ' प्र. ६९ पृ. ३७१. आवृत्ति ४

२ माझा मधला मुलगा पुण्यांत होता. का. का.

३ कै. वा. नारायण बापुजी. का. का.

४ माझे श्वशुर कै. वा. रा. ब. वासुदेव बापुजी का. का.

तच सुधारक व्हायला. " असें उद्गार काढले. आतां काय करणार ? वामनच्या मनांतून तर हायस्कुलांत मुळींच जायचें नाहीं. तेव्हां तो आतां बिचारा जेथल्या तेथेंच राहून संस्कृताचाच अभ्यास करूं ह्मणतो. काय करणार ? " न्यू स्कूल काय, हैस्कूल काय ? तूं त्यांच्याप्रमाणें कर. पुनः उद्यां पांचवी यत्ता संपल्यावर ही शाळा सोडण्याचे वेळीं तरी हा प्रश्न येणारच ना ? मग नानासाहेबांच्याच ताब्यांत राहून तुम्हांला ते सांगतील त्याप्रमाणेंच करावें लागेल ना ? " असें ह्मणून मी त्याचें समाधान करूं लागलों. पण तो कसला ऐकतो. तो आपली पर्शिअन शिकण्याची इच्छा दाबायला तयार झाला आहे. ' वहिनी इथें असती, तर तिनें त्यांचें कांहीं चालूं दिलें नसतें ' असें म्हणतो. तेव्हां पहा तुमच्या हातून कांहीं झालें तर, दुसरें काय ? मला तर कांहीं युक्ती सुचत नाहीं. आमच्या याच शाळेंत राहून खासगी मास्तरांजवळ वर्ष दोन वर्षें पर्शिअन शिकला तर आहे. बाकी कांहीं गत्यन्तर नाहीं. आपलें उत्तर फार ताबडतोब यावें, वामनच्या एकंदर प्रकरणाबद्दल काय ह्मणतां, त्याची वाट पाहतों आहें.

हो, बरी आठवण झाली. मामानें लेख लिहावा, आणखी भाच्यानें चित्र द्यावें, * असें आपण माझ्याविषयीं व माधवरावाविषयीं कितीदां बोलून मनांत मांडे खाल्ले! पण ते मनांतच न राहतां गेल्या **करमणुकींत** खरोखर वाटले गेले. हें वाचल्याबरोबर माझ्यापेक्षां आपल्याला किती तरी धन्यता वाटेल बरें. **करमणुकी**च्या पहिल्या अंकांतलें चित्र माधवरावानें मजजवळच्या एका चित्रावरून खोदून काढलें तें मला फार आवडलें. शिवाय इकडला

---

* हें चित्र माझा वडील मुलगा चि. माधव हा नूतन मराठी विद्यालयांत इंग्रजी चौथ्या इयत्तेंत असतांना " खेंकडा कां खेकडेश्वर " या नांवाचें त्यानें १८९२ सालीं काढिलें. यानंतर **रूपनगरची राजकन्या** व **सूर्योदय** या दोन हरीभाऊंच्या कादंबऱ्या चित्रशाळेनें छापल्या; त्यांतील सर्व चित्रें या ' भाच्या 'नें काढलीं आहेत; व लेख " मामांनीं " लिहिलें आहेत. हरीभाऊ ' मामा ' व माधव ' भाचा ' हा संबंध सांगावयास नकोच ! का. का.

नाद असून तो आपल्या वर्गातल्या कामांतहि अति उत्तम, पहिला किंवा दुसरा असतो, ही गोष्ट कशी बरें भूषणावह वाटणार नाहीं ? गेल्या वार्षिक परिक्षेंत तो सर्व विषयांत चांगला पास झाला आहे इतकेंच नाहीं, तर कांहीं विषयांत पहिला, कांहीं विषयांत दुसरा असा त्याचा नंबर आला आहे. चि. वामनरावही त्याचप्रमाणें आपल्या कामांत हुषार आहे. तो परीक्षेचें वेळीं आजारी असल्यामुळें परिक्षेला बसतां आलें नाहीं. परंतु त्याचा रिझल्ट उत्तम झाला असता याबद्दल शंका नाहीं. सहामाहीच्या परिक्षेचे वेळीं त्याचा अनुभव आला होता. इंग्रजींत त्यानें ४० पैकीं ३९ मार्क मिळविलें होते. अशीच दोघांचीही प्रगती अविच्छिन्न चालो म्हणजे झालें. चिरंजीव बनी कशी काय आहे ?

मला वाटतें आता पुरेंच करावें. फार दिवस उपास केले असतां एकदम अचरटपणानें खाऊं नये हा मार्ग उत्तम. नाहींतर बरेच दिवस त्रास काढावे लागायचे ! आपली गांठ कधीं पडेल, आणि मनसोक्त बोलण्यास कधीं सांपडेल अशाविषयीं अत्यंत उत्सुक

आपला भाऊ
**हरी आपटे.**

---

## ३०

ता. २७ जून १८९२ मंगळवार

तीं. सौ. काशीताई कानिटकर मु. मांढें
वडिलांचे सेवेशी

बालके हरीचे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष. आपण बुधवारीं गेलां, आणि गुरुवारीं पाऊस थोडासा थांबला. शुक्रवारपासून अजिबात थांबला आहे. परंतु माझी काय त्रेधा! गुरुवारपासून घशाच्या दुखण्यानें आजारी पडलों. मागें माझें घशाचें दुखणें होतें तें एकीकडे राहून या खेपेला निराळेंच निघालें. मागें घसा भरून आल्यासारखें होई. दम कोंडल्यासारखें होई. घसा दुखत नसे. परंतु या खेपेला घसा दुखूं लागला, तो इतका कीं, मी दोन रात्रीं जेवलों नाहीं. साबूदाण्याचे

लापशीवर राहिलों! आठ दिवसांत चार रुपयांचीं औषधें झालीं. काल पासून बरा आहे. दुखणें अगदीं नाहीसें झालें. हा रोग जन्माचा चिकटून केव्हां तरी असा दम कोंडूनच इतिश्री होणार कीं, काय समजत नाहीं.

परवांचे दिवशीं मी आपले भावोजी चिंतामणराव यांचे समाचारास गेलों होतों. त्यांची आदले दिवसाची पाळी जरा कमी जोरानें थंडी वाजून आली. आणि कालची पाळी मुळींच आली नाहीं. आतां ते लौकर बरे होतील. रावसाहेब गाडगीळ यांचें ' संसारसुख ' हें पुस्तक बाहेर पडलें. आपण त्या पुस्तकासाठीं वर्गणी भरली आहे काय? भरली नसल्यास कांहीं अल्प किंमतीत मला तें पुस्तक मिळेल. पुस्तक फार चांगलें झालें आहे असें दिसतें. मी अजून वाचलें नाहीं. फक्त चाळून पाहिलें. सर जॉन् लबकच्या मूळ पुस्तकांत choice of books या भागांत इंग्रजी ग्रंथां-पैकीं शंभर निवडक पुस्तकें दिली आहेत. त्याप्रमाणें रावसाहेब गाडगिळां-नींही आपल्या पुस्तकांत मराठींतलि शंभर सवाशें निवडक पुस्तकांची यादी दिली आहे. असें करण्याची कल्पना त्यांना चांगली सुचली, नाहीं बरें? ती यादी मी मुद्दाम चाळून पाहिली. तींत आपलें ' डॉ. जोशी यांचें चरित्र ' आहे. रावसाहेबांची ' स्त्रियांची परवशता ' व ' मोक्षमूलरचीं व्याख्यानें ' हीं पुस्तकें आहेत. मिस् मोरचें ' पुष्पकरंडक ' आहे, आणि "आजकालच्या गोष्टी" ही आहेत. यादीपैकीं कांहीं ग्रंथ मात्र मला चमत्कारिक वाटले. उदा-हरणार्थ मोरोपंत सगळा. वामन सगळा. मुक्तेश्वर सगळा. यांत काय तात्पर्य आहे? मोरोपंताचे, वामनाचे समग्र ग्रंथ वाचण्याइतका सवुरपणा किती लोकांत सांपडेल? यांचे.वेंचे ह्मटलें असतें तर ठीक होतें. तुह्मांला काय वाटतें? निबंधमालेचे वेंचे ह्मटलें आहे तें मात्र अगदीं यथार्थ असें कोण ह्मणणार नाहीं?

मी हल्लीं मारी कोरेलीचें चवथें नॉव्हेल वाचतों आहे. अहाहा! किती नॉव्हेल उत्तम आहे? संविधानक अतिशय उदात्त, परंतु भयंकर आहे. पण बाईचा आपल्या स्त्रीजातीवर फार कटाक्ष! इतका कीं कांहीं पुसूं नये. मीं त्या पुस्तकाचीं ३७५ पानें वाचलीं. अजून सुमारें शंभर वाचाव-

याचीं आहेत. आतां तिचें एकच पुस्तक वाचावयाचें राहिलें. लवकरच वाचीन ह्मणतों. कारण या नॉव्हेलाप्रमाणेंच तेंही मला विकत घ्यावें लागणार नाहीं. एका गृहस्थानें देण्याचें कबूल केलें आहे. मागलीं तीन प्रत्येकीं चार रुपये दोन आणे देऊन विकत घेतलीं ! दारूच्या बाटल्याच त्या. एकदां चटक लागली कीं सोडवत नाहींत. इतिहासासंबंधीं वाचन या आठवड्यांत बंद; एक तर आजारी आणि दुसरी ही नॉव्हेल-रूप बाटली. मग काय विचारतां ! **करमणुकी**च्यावेगळा नाहीं ह्मणायला **गणपतरावा**चा फार्म लिहिला. जशी एखाद्याला पैशाची हांव लागते कीं नाहीं, तशी मला सध्यां कामाची हांव लागल्यासारखें झालें आहे. पण तें एवढ्यापुरतेंच कीं " काय बोआ, आपण काम करीत नाहीं " अशी एक-सारखी हळहळ करावी; बाकी हातून काम होत नाहीं काडीभरसुद्धां. एखादवेळ वाटतें कीं आपला जन्म व्यर्थ. पैसाही नाहीं आणि कामही नाहीं.

**हांसत कर्म करावें भोगावें रडत तींचि परिणामीं.**

तुह्मी येथून गेल्यापासून कांहीं विशेष झालें नसेल हें उघडच आहे. एक तर[1] जगन्नाथ आजारी, तेव्हां त्याचा परामर्ष घेणें. घरांतलें काम करणें. तरी बरें मुलींना[2] बरोबर नेले आहेत, त्या कांहींतरी हातभार लावीत असतील. आणखी आमची बनी[3] तर ज्या त्या कामाला खास हातफार लावीत असेल. तिनें हात फार लावल्याशिवाय तुह्मां साऱ्यांना कामें व्हावीं कशीं ? आतां जगन्नाथाचें कसें काय आहे ? इकडील सर्व मंडळी खुशाल आहेत. इतकें विचारून व सांगून आतां पत्र पुरेंच करतों. तुह्मांला वाचायला तरी वेळ सांपडेल कां नाहीं कोणास ठाऊक ? इत्यलम् !

आपला

**हरी आपटे**

---

१ हा माझें घरचा आचारी २ या पैकीं किशी ही माझी वडील मुलगी दुसरी पुतणी ३ ही माझी मधली मुलगी, जिला हरीभाऊंनीं आपली ह्मटलें होतें. आतां त्या दोघीतिघींही या लोकीं नाहींत । का. का.

३१

Poona, Budhwar Peth
August 30, 1893.

My dear Kashitai,

We reached Pcona by 3-30 last Monday. The train was detained on one of the intermediate stations for a couple of hours, and hence the delay. 25 Maca-ears were sent in the morning to [1] Nana Bapat. They are all well and so are your boys. Our exhibition[2] is a decided success though the exhibits are not many; and I expect at least about 75 or 100 Rs. will be raised up for some work of charity. Now let me know what works of charity I should propose as deserving of such monetary aid. The idea of holding such an exhibition came to my mind about a year ago, and at that time I had the Sharada-sadan[3] in my mind. Now however it is not meet even to mention the name of that institution. Nobody will vote even a farthing for it. So it is useless to put that forward. What I think I should propose is:-

---

१ डॉ. नीलकंठ कृष्ण बापट, माझा एक भाऊ.

२ स्त्रियांच्या कलाकौशल्याचें प्रदर्शन.

३ पंडिता रमाबाईचें शारदासदन मुंबईहून पुण्यास आलेलें होतें. पण त्यांत खिस्ती करण्याची सुरुवात झाली होती असा बोभाटा झाला होता. म्हणून बरेच लोक त्या संस्थेच्याविरुद्ध होते. का. का.

1 That the sum should be handed over to another Sadan conducted by strictly Hindu agency, if such an institution be started.

2 That it should be given to the fund of the Home classes.

3 That it should be kept as the nucleus of a permanent fund for holding such exhibitions annually; and that such a fund should be started and subscriptions gathered for it.

If you think of any other thing please let me know it by Thursday or Friday at least, as I expect to put forth the proposals in the next number of the Karamanuk. I so much wished to have some work from you for the exhibition and charity. I hope you will send some for the next exhibition. Well, I don't mind if you did not send any work, but do send something for charity; it need not be much. I do so wish that there should be some such permanent institution for fancy work.

I shall send a copy of the Marathi Arabian Nights soon. But before I do that I must receive a reminding letter from dear little Kishi as promised by her at the Ry. station.

You are going to Sholapur by Thursday and will be at Karmala by the 3rd or the 4th. All right. I expect your long letter by Tuesday next. But you must write to me about what I have asked you above.

Good bye till Tuesday then.

Ever yours sincerely

H. N. Apte

# ३२

॥ श्री ॥ पुणें, आनंदाश्रम

ता. १२-११-९७

तीर्थस्वरूप सौभाग्यवती काशीताई यांस

हरी नारायण आपटे याचे कृ० शि. सा. न. वि. वि. आपलें कृपाकार्ड आलें तें पावलें

सोलापुराबद्दल पुण्यानें आणि पुण्याबद्दल सोलापुरानें, आणि दोघांनीं मिळून आणखी आणखी कित्येक ठिकाणांबद्दल हळहळ करीत बसण्यापलीकडे कांहींच राहिलें नाहीं. सोलापूरची जी हकीकत कानीं येते, तीवरून तेथेंही जारीनेंच प्लेगमहाराज आपला नरमेध यज्ञाचा समारंभ करूं लागले आहेत असें समजतें. आमचे येथें तर अशी स्थिति झाली आहे कीं, आज एक गेला उद्यां कोणाची पाळी येते कोण जाणें. "आपल्या येथें दुखतें काय ? आपल्याला ताप येईल काय ? " अशा शंका दिवसांतून दोन चार वेळां तरी आल्या नाहींत असा दिवस जात नाहीं. परंतु अशी शंका आली, कीं मीं एक आपल्याशींच ह्मणून मनाचें समाधान करून घेण्यास महामंत्र तयार करून ठेवला आहे तो ह्मणतों, आणि मनाची अस्वस्थता दूर सारतों. " या विश्वांत एक परमाणु अधिक झाला काय किंवा कमी झाला काय; त्याची ही जागा होती, ती ती झाली काय; किंवा आणखी कांहीं काळ हीच राहिली काय; एकच. त्याप्रमाणें या पृथ्वीवर एक माणूस मेला काय आणि जगला काय पृथ्वींला सारखेंच. तेव्हां आपल्याला नसतें महत्व घेऊन तडफडण्यांत मुळींच तात्पर्य नाहीं. " हा विचार वाटतो बरा, नव्हे ? पण अगदीं प्रसंगच येऊन ठेपला तर कितपत टिकेल याची शंकाच आहे. त्यावेळीं कदाचित् " अरेरे, आपली ती अमुक महत्वाकांक्षा तृप्त होण्याची राहिली ! " असें वाटावयाचें. जणूं काय तेवढी महत्वाकांक्षा तृप्त झाल्यानें नित्य अशी तृप्ति मिळणार आहे ! आणि सगळें जग दोन बोटें वर उचललें जाणार आहे ! !

Now proud man—now where is thy
great cup fled?
What art thou in the scale
universe?
Less, Less, than nothing.
*-Henry Kirk White.*

... मृत्यूनें आपला प्रभाव दाखविला ह्मणजे तत्त्वज्ञान सुचूं लागतें नव्हे? दाखवूं या. अद्यापपर्यंत तर आमची प्रकृती बरी आहे. उद्यां काय होईल कोण जाणे? रावसाहेबांची बदली झाली हें एका अर्थी तात्पुरतें बरेंच झालें ह्मणावयाचें. तिकडे अलिबागेस जाण्यास आपण केव्हां निघणार? पुण्यास येणार किंवा कसें? आलांत तर उतरण्याला माझ्या येथेंच या. आपली सर्व व्यवस्था होईल. आणि कदाचित् मी तुमचेबरोबर मुंबईपर्यंतही येईन. वरकड अधिकोत्तर कांहीं नाहीं. लोभ आहेच तो कायम असावा. हे विनंति.

हरी आपटे

ता. क. हेच पत्रीं मित्रवर्य रा. रा. डॉ. किर्लोस्कर[१] यांस व दुर्गाताईस[२] सा. न. प्रविष्ट करावें. व दुर्गाताईस कळवावें कीं पार्वतीबाईंची[३] प्रकृती बरी आहे. त्या येथेंच आमचे घरीं आहेत.

हरी आपटे

---

१ डॉ. वासुदेव काशिनाथ किर्लोसकर

२ त्यांची बहीण.

३ कै. रा. महादेव दिनकर जोशी कै. रा. हरिभाऊचे एक स्नेही, त्यांच्या पत्नी पार्वतीबाई या होत. यांनाही हरिभाऊंनीं आपली बहीण म्हटली होती.

का. का.

## ३३

पुणें, आनंदाश्रम

७—२—९९

ती. सौ. काशीताई कानिटकर, मुक्काम अलिबाग

वडिलांचे सेवेशीं

हरि नारायण आपटे याचे कृ. शि. सा. न. वि. वि. आपलें पत्र आतांच पोंचलें. आपण जेथें हल्लीं राहतां त्या उपवनाचें वर्णन वाचून खरोखर तिकडे येण्याची उत्कट इच्छा झाली आहे. परंतु सध्यां येणें कसें होतें ? प्लेग पुन्हां सुरू झाला आहे. आणि तो कोणच्या प्रमाणावर जाईल हें कांहींच सांगवत नाही. तेव्हां मागल्या दोन सालांप्रमाणें याही सालीं आपल्या हातून लोकांस कांहीं मदत झाली तर बरें असें वाटतें. दुसरें काय ? मीं पुन्हां व्हॉलंटिअरचें काम पतकरिलें आहे.

चि. माधवरावास स्कीम पाठविली नाही. परंतु फुरसतीनें आठचार दिवसांत पाठवीन. त्याची तरी अजून घाई दिसत नाहीं. कारण तशी घाई असल्यास तूं मला आठवणीदाखल कार्ड पाठव असें बजावून सांगितलें आहे. काल रोजीं ती. रा. रा. दादासाहेब भेटले होते. सर्वत्र मंडळी कुशल आहेत, असें त्यांनीं सांगितलें. गेल्या इंग्लिश मेलनें मी जर्मनींतून मागविलेलें एक महाभारतावरलें निबंधरूप जर्मन पुस्तक आलें. तें वाचण्यास सुरवात केलीं आहे. तें पुस्तक पाहून जर्मन लोकांच्या परिश्रमाबद्दलचें माझें मत शतगुणित वाढलें आहे. काम करावें तर त्यांच्याप्रमाणेंच करावें. नाहीं तर आह्मीं आज कित्येक वर्षे कामच करीत आलों. ! काय ?

माझी प्रकृती बरी आहे. लोभ आहेच तो कायम ठेवावा व त्याची वृद्धि शक्य असल्यास होऊं द्यावी हे वि.

आपला भाऊ

**हरी नारायण आपटे**

ता. क. आपले कडून १ नारळीचें रोप व २ केळींचे कोंब आले ते पावले. आमच्या वडिलांनीं ते सुस्थळीं लाविले आहेत.

## ३४

## एक अपूर्ण पत्रः—

गांवाजवळ गेल्यावर तेथील मंडळी पाठीस लागली. आमचे उपाध्ये आहेत ते कळण्याकरितां आह्मांस आधींपासूनच हा त्रास पाठीमागें लागेल ह्मणून कळलें होतें. शिवाय नाशिक, त्र्यंबक, प्रयाग, वेरुळ वगैरे ठिकाणचा आह्मांस अनुभव होताच. मग आह्मीं असल्या त्रासाला कां भितों? एकदां अनोळखी मनुष्य तेथें–तेथें काय आणि कुठें काय सर्व स्थळें सारखींच-गेला, ह्मणजे हे उपाध्ये ह्मणविणारे यात्रेकरूंस छळछळून घेतात. प्रत्येकास आपले नांव गांव सांगतां तोंड दुखून येतें. आधींच उशीर झाल्यामुळें मुक्कामाचें गांव आतां येईल, अंमळशानें येईल अशाविषयीं यात्रेकरूंस उत्कंठा लागलेली असते; आणि तशांत हा गांवकऱ्यांचा त्रास; यामुळें डोकें इतकें भणाणून जातें कीं सांगतां पुरवत नाहीं. ह्मणतात ना ' आधींच उल्हास तशांत फाल्गुनमास ' अशी गत होऊन जाते.

तुळजापूर हें देवीचें स्थान असून इतिहासप्रसिद्ध आहे. येथें जाववयास डोंगर चढून जावें लागतें. डोंगरावर एका बाजूस चढून गेल्यावर शेजारच्या खिंडारांत किंवा दरींत खोल देवीचें देऊळ आहे. गांव डोंगरावर असून खालीं पायऱ्या उतरून गेल्यावर डावे हातास एक कुंड आहे. तेथें लोक तीर्थ म्हणून स्नान करतात. उजवे हातास आणखी कांहीं पायऱ्या चढून गेलें म्हणजे स्वच्छ पाणी गायमुखांतून पडत असतें; तेथेंही लोक आंघोळ करतात. देवळास जातांना डाव्या हातास जें कुंड आहे ह्मणून सांगितलें तें चांगलें १५–३० हात लांब असून ५-७ रुंद आहे. पाणी वाईट आहे. लोक तीर्थ ह्मणून स्नानें करीत. ब्राह्मणास मात्र स्नान करण्यास परवाना आहे. इतर जातीचे लोकांस ५ आ. कर द्यावा लागतो. गायमुखांतून पडणाऱ्या पाण्यानें स्नान केल्यावर आह्मीं देवाचे दर्शनास गेलों. देऊळ साधारण मोठें असून ठेंगणें आहे व हेमाडपंती घाटावर आहे. भोंवतालीं पटांगण असून त्यापलीकडे ओंवऱ्याही मोठाल्या आहेत. या क्षेत्रीं महारोगी देवळांत

फार दिसतात त्यामुळें किळस येते. देवीपुढें एक सांबाचें लिंग आहे, त्याचें दार देवीपुढें आहे. त्याचे बाहेर एक कुंड आहे, तेथें मोठा यज्ञ होत असतो ह्मणतात. दर्शन घेऊन माघारीं फिरतों तों त्या होमकुंडापुढें कांहींजण एक कोंकराचें पिल्लूं घेऊन आले. याचा काय चमत्कार होतो हें पहाण्याकरितां आह्मीं उभें राहिलों. पहातों तों एका घटकेंत त्याची मान लोंबूं लागून रक्ताची चिळकांडी उडाली, व सारखी धार सुरूं झाली. मग एका मुलानें सांचलेल्या रक्तांत पंजा बुडवून त्या होमकुंडाचे भिंतीवर ठोकला, व नमस्कार करून सर्व मंडळी चालती झाली. हा प्रकार पाहून मनांत जें कांहीं झालें तें सांगतां पुरवत नाहीं. आमचे बरोबर बायका होत्या, त्यांनीं तें लाल रक्त पाहतांच नाकें मुरडून देवळाबाहेरचा रस्ता धरला. देवळांत गेलें असतां जें एक प्रकारचें पूज्य व भव्य स्वरूप दिसत असतें तें आतां भयंकर वाटूं लागलें. चहूंकडे भयाण दिसूं लागलें. तें कोंकरूं कापलेलें पाहिल्यावर हॅम्लेट अथवा वीरसेन नाटकांतल्या खड्डेकऱ्याची आठवण झाली. हॅमलेट आपल्या मित्रास विचारतो 'या खड्डेकऱ्यांस स्मशानांत खड्डे खणण्याचें कांहींच वाटत नाहीं काय? कारण तो खड्डे खणतांना आनंदानें गाणें गात आहे.' मित्र ह्मणाला, 'हें त्याच्या संवयींतलें आहे त्यामुळें त्यास त्याचें कांहींच वाटत नाहीं.'

---

## ३५

## दुसरें एक अपूर्ण पत्रः—

मीं अद्याप तें वाचलें नाहीं व जर तें आपल्या मतें चांगलें नसेल तर माझी वाचण्याची इच्छाही नाहीं. मीं इंग्रजींत त्याचीं एक दोन चरित्रें वाचलीं आहेत. शिवाजीचें एक मल्हारराव चिटणीस यांनीं केलेलें एक सप्तप्रकरणात्मक चरित्र मिळतें तें फारच चांगलें आहे. नेपोलिअनच्या अंगीं मोठा दोष काय तो एकच होता; आणि तो ह्मणजे महत्वाकांक्षेचा अतिरेक हा होय. बाकी प्रत्येक गुणानें तो शिवाजीहून वरचढ होता. नेपोलिअनहूनही

शिवाजीच मोठा असें विविधज्ञानविस्तारांतील ' मराठेशाही ' विस्ताराचे निबंध ज्यांनीं लिहिले त्यांचेंही ह्मणणें आहे. कसें तें मात्र त्यांनीं दाखवलेलें नाहीं.

परवांच्या पुणेंवैभवाबरोबर जाहिराती वांटल्या गेल्या. आतां पुस्तक बाहेर पडलेच. परंतु त्या जाहीरातीवर जुलैपासून सुरू असें लिहिलें आहे. काय हेतु कांहीं समजत नाहीं. मीं आपला मजकूर उद्यां पाठवीन. मला त्यांचें जुलैपासून सुरू असें सांगणें नाहीं. त्यामुळें मीं स्वस्थ निजलों होतों. काय मजा आहे पहा, आतां आगस्टचा अंक केव्हां निघणार ? दर महिन्याच्या आठवीस मजकूर पाठवायचा असा करार. त्यामुळें आगस्टच्या आठवीपावेतों मजकूर पाठविला ह्मणजे झालें असें मी समजत होतों. बरें आगस्टमध्यें नाहीं, जुलैमध्येंच निघणार अशी सूचना तरी ठाकूर यांनीं मला करावयाची होती. तीही नाहीं. मीं आपल्या हातून होतां होईतों चुकणार नव्हतों, अजूनही चुकणार नाहीं.

अंक अजून मजकडे आला नाहीं. इकडे पाऊस बराच आहे. बाबा अजून येथेंच आहे कोठें गेला नाहीं. आपलें पत्र आज यावयाचें तें आलें नाहीं. हें पत्र पावतांच उत्तर यावें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

आपला भाऊ

**हरि आपटे**

3830
REFBK-0003830

## शुद्धिपत्र

पृ. १ ओळ. २. सन १८८५ तेथें १८८६ असें वाचावें.

पृ. १०० टीप ओळ ६. सन १८८० तेथें १८८७ असें वाचावें.

ऐक्यसंपादनमंडळाच्या नेतृत्वाखालीं

दर रविवारीं सकाळीं

प्रसिद्ध होणारें

साप्ताहिक

# ऐक्य

ऐक्यसंपादनमंडळाचे अध्यक्षः-- **रावबहादूर रा. रा. काळे**

एस्. एल्. सी. ॲड्व्होकेट

राजकारणांतील कोणत्याहि पक्षाभिनिवेशास बळी न पडतां, राजकारणाची निःपक्षपातानें, निर्भिडपणानें आणि व्यापक दृष्टीनें चर्चा करणारें महाराष्ट्रांतील पहिलेंच

**साप्ताहिक**

सामाजिक, औद्योगिक, व आर्थिक प्रगतीचा पुरस्कार करून सर्वांगीण राष्ट्रोन्नतीसाठी झटणें हें या पत्राचें ध्येय आहे.

**सातारा जिल्ह्यांतील खडान् खडा बातम्या.**

महाराष्ट्रांत व विशेषतः सातारा जिल्ह्यांत माल खपविणें असेल तर

## ऐक्यांतच जाहिरात द्या !

मॅनेजर ऐक्य

सातारा.

# रयतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न

नीट समजून घ्यावयाचा असेल तर

रावबहादूर रा. रा. काळे एम्. एल्. सी, ॲड्व्होकेट

यांचें

## मुंबई इलाख्यांतील

# जमीनधारा--पद्धति

हें पुस्तक वाचा !

हें पुस्तक शेतकरी वर्गास घेतां यावें यासाठीं पुस्तकाची किंमत मुद्दाम ॥८ आणे ठेविली आहे.

मिळण्याचीं ठिकाणें:
- सर्व्हंटस् ऑफ् इंडिया सोसायटी मुंबई ४.
- ऐक्य ऑफिस् सातारा
- आर्यभूषण प्रेस--पुणें
- सेक्रेटरी लँड् लीग; केसरी ऑफिस पुणें. २

---

# सुख-स्वप्नें

( पांच सामाजिक गोष्टी )

लेखक:-- वाग्भट नारायण देशपांडे. एल्. एल्. बी. ॲडव्होकेट

प्रस्तावनालेखिका:-- श्री. कमलाबाई देशपांडे, बी. ए.

" स्त्रियांना शिक्षण मिळून त्या अधिक सुसंस्कृत व नवीन जीवनक्रमाचें आकलन करण्यास जर त्या अधिक समर्थ होतील तर समाजांत काय फरक होईल, गृहसौख्यांत कोणत्या सुखाची भर पडेल, व एकंदरींत स्त्री आपल्या पतिपुत्रबंधूंना कशी मदत करणारी व मार्गदर्शिका होईल यांचें स्वप्नरूपानें हें कल्पनाचित्र मांडलें आहे." किं. रु. १।.

**मिळण्याचीं ठिकाणें**

प्रकाशक
गणेश महादेव आणि कं.
६०८ सदाशिव पेठ; पुणें

म्यानेजर;
**ऐक्य ऑफिस्.**
सातारा.